CMYK




सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह
धाराशिव | बुधवार, ७ जानेवारी २०२६ | वर्ष ३ रे अंक ३०८ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




## विचारपुष्प



नि आपल्या क्षेत्रात काम वाढविण्यासाठी सर्वप्रथम आपल्या कार्यक्षेत्राचा अभ्यास करावा. कार्यक्षेत्रात व्यापक संपर्क ठेवून अनेक स्वयंसेवकांशी मैत्री करावी. या मैत्रीच्या आधारे कार्यकर्त्यांना सक्रिय करावे. मंडळ स्थानापर्यंत शाखा करायच्या असे आपण ठरविले आहे, म्हणून आपला प्रवास ठरविताना जेथे आपल्या शाखा नाहीत अशा स्थानी प्रवास ठरवावा. नवीन स्थानी प्रवास करून संपर्क स्थापित करावा.

**- श्रीकृष्ण मोतलग**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. प्रचारक प्रमुख

३ नेपाळमध्ये पुन्हा हिंसाचार
४ चढता 'पारा' आणि घसरती 'पातळी'! (अग्रलेख)

# उमर-शरजीलसाठी मध्यरात्री 'जेएनयूत' निदर्शने

## मोदी-शाह यांच्या विरोधात आक्षेपार्ह घोषणा | विद्यार्थ्यांवर वसंत कुंज पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल

◆ **नवी दिल्ली, ६ जानेवारी**

सर्वोच्च न्यायालयाने उमर खालिद आणि शरजील इमामचा जामीन फेटाळल्यानंतर सोमवारी मध्यरात्रीनंतर जेएनयू विद्यापीठाच्या परिसरात विद्यार्थ्यांच्या एका गटाने निदर्शने केली. यावेळी त्यांनी पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री शाह यांच्याविरोधात आक्षेपार्ह घोषणा दिल्या. या प्रकरणी वसंत कुंज पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले तसेच विद्यापीठ प्रशासनाने निदर्शक विद्यार्थ्यांना निलंबित करण्याचा निर्णय घेतला आहे.

उमर आणि शरजीलच्या समर्थनात आणि त्यांना जामीन देण्याच्या मागणीसाठी जेएनयूमधील विद्यार्थ्यांच्या एका गटाने मध्यरात्री तीव्र निदर्शने केली. याची चित्रफीत समाज माध्यमांवर प्रसारित झाली आहे. निदर्शनाच्या कथित चित्रफितीत पंतप्रधान आणि



गृहमंत्र्यांच्याविरोधात आक्षेपार्ह घोषणा दिल्या.

विद्यार्थ्यांच्या एका गटाने जामीन नाकारल्याबद्दल संताप व्यक्त केला. याची दखल घेत विद्यापीठ प्रशासनाने चौकशी सुरू केली आणि पोलिसांना पत्र लिहून निदर्शने करणाऱ्या विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्ष आदिती मिश्रा यांनी सांगितले की, दरवर्षी ५ जानेवारी २०२० रोजी विद्यापीठ परिसरात झालेल्या हिंसाचाराचा निषेध करण्यासाठी विद्यार्थी निदर्शने करतात. सोमवारी रात्री निदर्शनादरम्यान विद्यार्थ्यांनी आक्षेपार्ह घोषणा दिल्या, हा प्रकार योग्य नाही. पोलिसांनी कठोर कारवाई करावी अशी आमची मागणी आहे. निदर्शने करणाऱ्या विद्यार्थ्यांची ओळख पटविण्यात आली आहे. ◀(*वृत्तसंस्था*)

### तुकडे-तुकडे गँगचा कट : गिरीराजसिंह

**»केंद्रीय मंत्री गिरीराजसिंह म्हणाले, जेएनयूमध्ये जे घडले त्यामागे तुकडे-तुकडे गँगचा हात आहे. राहुल गांधींसारखे देशविरोधी मानसिकतेचे लोक दहशतवाद आणि नक्षलवादाला प्रोत्साहन देतात. पाकिस्तानी विचारसरणीचे हे लोक दुर्दैवाने भारताच्या विभाजनासाठी काम करीत आहे आणि त्यांच्याविरोधात देशद्रोहाचे खटले दाखल करायला हवे.** ■

# दुर्मिळ रक्तगटामुळे तारिकची त्रिचीत काढली किडनी

## आरोपी डॉ. गोविंदस्वामी आणि डॉ. सिंग यांच्या विरोधात भक्कम पुरावे

◆ **चंद्रपूर, ६ जानेवारी**

महाराष्ट्रासह देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या किडनी विक्री रॅकेट प्रकरणातील लखनौचा आणखी एक पीडित तारिक अहमद याचीही किडनी तामिळनाडूच्या त्रिची रुग्णालयातच काढल्याचे स्पष्ट झाले आहे. सुरुवातीला तारिकला कंबोडियात नेण्यात आले होते. मात्र, त्यांचा रक्तगट 'ओ निगेटिव्ह' असल्याने तेथे रक्त सहज उपलब्ध होऊ शकले नाही. अखेर त्यांना भारतात आणून त्रिची येथील स्टार किम्स रुग्णालयात किडनी काढली. या रुग्णालयाचे संचालक डॉ. राजरत्नम गोविंदस्वामी आणि दिल्लीतील डॉ. रवींद्रपाल सिंग यांच्या विरोधात आता एसआयटीकडे भक्कम पुरावे गोळा झाले आहेत.



मिंथूर येथील पीडित शेतकरी रोशन कुळे यांनी दिलेल्या तक्रारीनंतर चंद्रपूर पोलिसांनी आतापर्यंत आठ आरोपींना अटक केली. या रॅकेटचा मुख्य दलाल 'डॉ. कृष्णा' उर्फ रामकृष्ण सुंचू याच्या माध्यमातून देशभरात हे रॅकेट चालविले जात असल्याचे समोर आले. कंबोडियात किडनी काढण्यासाठी रोशन कुळे यांच्यासोबत गेलेल्या पाच जणांमध्ये गोपाल व तारिक अहमदही होता. कंबोडियात गेल्यानंतर या पाच जणांपैकी चार जणांची किडनी काढण्यात आली. मात्र, तारिकच्या 'ओ निगेटिव्ह' या दुर्मिळ रक्तगटाचे दाते मिळाले नसल्याने त्याला परत भारतात आणावे लागले. भारतात आल्यानंतर रामकृष्ण सुंचूने महिनाभरात पुन्हा तारिकशी संपर्क साधला आणि त्रिची येथील स्टार किम्समध्ये नेले. तिथे तारिकची किडनी काढून त्याला केवळ पाच लाख रुपये देण्यात आल्याची माहिती आहे. ◀(*तभा वृत्तसेवा*)

### तारिकही कर्जबाजारी

» तारिक अहमदचा ट्रॅव्हल्स एजन्सीचा, तर त्यांच्या वडिलांचा 'हॉर्डवेअर'चा व्यवसाय होता. मात्र, कोरोना काळात दोघांचे व्यवसाय डबघाईस आल्याने कर्जाचा डोंगर झाला होता. समाज माध्यमावरून आरोपी रामकृष्णशी संपर्क झाल्यानंतर किडनी विकण्याचा निर्णय तारिकने घेतला होता. ■

### डॉ. रवींद्रपाल प्रकरणी आज निकाल

» डॉ. रवींद्रपाल सिंग चंद्रपूरच्या न्यायालयात हजर झाल्यानंतर त्याला तात्पुरता जामीन देण्यात आला होता. मात्र, मंगळवारी त्यावर अंतिम निर्णय येणार होता. आता बुधवारी त्यावर निकाल अपेक्षित आहे. ■

## बाजारात सलग दुसऱ्या दिवशी घसरण

**मुंबई :** भारतीय शेअर बाजारात सलग दुसऱ्या दिवशी मंदीचे सावट पाहायला मिळाले. दिवसाच्या सुरुवातीपासूनच बाजारात विक्रीचा दबाव दिसून आला. ज्यामुळे निर्देशांक आणि निफ्टी दोन्ही लाल निशाणीत बंद झाले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर टॅरिफ वाढविण्याबाबत दिलेल्या संकेतामुळे गुंतवणूकदारांनी हात आखडता घेतला. त्यामुळे बाजारात मंदीचे सावट पसरले. सततच्या विक्रीमुळे बाजार भांडवलातील सुमारे १.३५ लाख कोटी रुपये एकाच दिवसात कमी झाले. ■

# सुरेश कलमाडी यांचे निधन

◆ **पुणे, ६ जानेवारी**



पुण्याचे माजी खासदार आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुरेश कलमाडी यांचे मंगळवारी दीर्घ आजाराने आजाराने निधन झाले. ते ८१ वर्षांचे होते. मागील काही दिवसांपासून त्यांची प्रकृती सातत्याने खालावत होती. त्यामुळे त्यांच्यावर येथीलच एका रुग्णालयात उपचार सुरू होते. तिथेच त्यांनी अखेरचा श्वास घेतला. कलमाडी यांच्या पार्थिवावर मंगळवारी सायंकाळी वैकुंठ स्मशानभूमी, नवी पेठ, पुणे येथे अन्त्यसंस्कार करण्यात आला.

१ मे १९४४ रोजी जन्मलेल्या सुरेश कलमाडी यांनी राजकारणात प्रवेश करण्यापूर्वी भारतीय वायुदलात वैमानिक म्हणून सहा वर्षांहून अधिक काळ सेवा दिली. वायुदलातून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षातून राजकीय कारकीर्दीला सुरुवात केली. त्यांनी पुण्याचे खासदार म्हणून दीर्घकाळ प्रतिनिधित्व केले. ◀(*वृत्तसंस्था*)



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### आक्षेपार्ह वक्तव्याप्रकरणी राहुल गांधींना समन्स

**सुलतानपूर** : गृहमंत्री अमित शाह यांच्याविरोधात आक्षेपार्ह टिप्पणी केल्याप्रकरणी काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्याविरोधात मंगळवारी सुलतानपूर येथील न्यायालयात सुनावणी झाली. सुमारे ४० मिनिटे चाललेल्या सुनावणीनंतर न्यायालयाने राहुल गांधींना समन्स बजावले आहे. त्यांना १९ जानेवारी रोजी न्यायालयात हजर राहण्यास सांगितले आहे. राहुल गांधींचे वकील काशी शुक्ला यांनी साक्षीदार रामचंद्र दुबे यांची उलटतपासणी पूर्ण केली. तक्रारदार विजय मिश्रा यांचे वकील संतोष पांडे म्हणाले की, आता आमच्याकडून कोणताही साक्षीदार हजर केला जाणार नाही. न्यायाधीश शुभम वर्मा यांनी कलम ३१३ अंतर्गत राहुल गांधींना समन्स बजावले आहे. त्यांना स्वतः न्यायालयात यावे लागेल. याचा अर्थ असा की, न्यायालयाने राहुल यांना त्यांच्याविरुद्ध आलेल्या पुराव्यांवर स्पष्टीकरण देण्याची संधी दिली आहे, जेणेकरून कोणालाही न ऐकता दोषी ठरवले जाऊ नये. राहुल यांच्या विरोधात हे प्रकरण सात वर्षांपूर्वी कर्नाटकमध्ये अमित शाह यांच्या विरोधात केलेल्या कथित अपमानजनक टिप्पणीशी संबंधित आहे.

### अमेरिकेच्या कारवाईची चिनी सोशल मीडियावर स्तुती

**बीजिंग** : अमेरिकेने व्हेनेझुएलावर केलेल्या लष्करी कारवाईची जगभरातून निंदा झाली. स्वतः चीननेही याचा निषेध केला. मात्र, या घटनेनंतर चीन जरी चिंतित आणि नाराज असला तरी, तेथील सोशल मीडियावर ऑपरेशन व्हेनेझुएलाचे कौतुक होत आहे. अनेक वापरकर्ते याला तैवानवर चिनी लष्करी ताब्यासाठी एक मॉडेल म्हणून पाहत आहेत. चीनच्या सोशल मीडियावर अमेरिकेच्या कारवाईबाबत प्रचंड खळबळ आणि चर्चा दिसून आली. अनेक लोक प्रश्न विचारत आहेत की, जर अमेरिका आपल्या (मागील अंगणातील) भागातील एखाद्या देशाच्या नेत्याला पकडू शकत असेल, तर चीन असे का करू शकत नाही?

### मणिपूर स्फोटांचा तपास एनआयएकडे


**इम्फाळ** : मणिपूर सरकारने बिष्णुपूर जिल्ह्यातील सलग दोन स्फोटांच्या घटनेचा तपास राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे (एनआयए) सोपवला आहे. सोमवारी झालेल्या या स्फोटांमध्ये एका महिलेसह दोन जण जखमी झाले होते. हे स्फोट स्थानिक पातळीवर बनवलेल्या आयईडीद्वारे घडवून आणले होते. पोलिस महानिरीक्षक (आयजीपी) आणि बिष्णुपूर जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक यांच्यासह वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी स्फोट झालेल्या ठिकाणांना भेट दिली. या घटनेत सामील असलेल्या दोषींना पकडण्यासाठी मंगळवारी सलग दुसऱ्या दिवशीही आजूबाजूच्या परिसरात शोधमोहीम सुरू राहिली.

### विक्रम भट्ट यांची एफआयआर रद्दची मागणी फेटाळली

**जयपूर** : चित्रपट निर्माता विक्रम भट्ट आणि त्यांची पत्नी कोट्यवधींच्या फसवणुकीच्या प्रकरणात तुरुंगात आहेत. अलिकडेच विक्रम भट्ट आणि त्यांच्या पत्नीविरुद्ध एफआयआर रद्द करण्यासाठी एक याचिका दाखल करण्यात आली होती, जी राजस्थान उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. राजस्थान उच्च न्यायालयात याचिकेवरील सुनावणीदरम्यान, न्या. समीर जैन यांनी या प्रकरणात हस्तक्षेप करण्यास नकार दिला आणि सांगितले की, फसवणुकीचे हे प्रकरण केवळ कराराचे उल्लंघन नाही, तर ती जाणूनबुजून केलेली फसवणूक आहे. या प्रकरणात पोलिस तपास सुरू राहील.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८५,०६३.३४ (-३७६.२८) |
| निफ्टी | २६,१७८.७० (-७१.६०) |



### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,३७,३०० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु. २,४४,९०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३०.४ | १५.७ |
| अमरावती | ३०.४ | ९.२ |
| भंडारा | २८.० | १०.० |
| बुलडाणा | २९.० | १५.० |
| चंद्रपूर | ३०.२ | १२.५ |
| गडचिरोली | २९.० | ११.२ |
| गोंदिया | २६.० | ७.० |
| नागपूर | २७.८ | ७.६ |
| वर्धा | २८.० | ८.४ |
| वाशीम | ३०.२ | ११.८ |
| यवतमाळ | २८.४ | १५.० |

# हिंदू बांगलादेश सोडण्याच्या तयारीत

### मानवाधिकार कार्यकर्त्यांची माहिती
### सरकारकडून कट्टरवाद्यांना प्रोत्साहन

◆ **ढाका, ६ जानेवारी**

बांगलादेशात मागील १८ दिवसांत सहा हिंदूंच्या हत्येमुळे येथील समुदायात दहशत निर्माण झाली आहे. जीव वाचविण्यासाठी हजारो हिंदू बांगलादेश सोडण्याच्या तयारीत आहेत. सरकारचे हिंदूंच्या संरक्षणाकडे दुर्लक्ष आहे, तर कट्टरवाद्यांना प्रोत्साहन दिले जात असल्याने परिस्थिती अतिशय भीषण असल्याचा आरोप मानवाधिकार कार्यकर्ते आणि हिंद संघटनेचे नेते बप्पादित्य बसू यांनी केला.

बसू म्हणाले, कट्टरपंथीयांकडून हिंदूंना धमकावले जात आहे. १८ दिवसांत सहा हिंदूंची हत्या करण्यात आली, मात्र आरोपी अजूनही मोकाट आहे. हिंदू नागरिकांना सुरक्षेसाठी उपाययोजना करण्यासाठी आम्ही बांगलादेश सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांना पत्र पाठविले, पोलिस आणि प्रशासनाला निवेदने दिली. मात्र, याची दखल घेण्यात आलेली नाही.




### ...तर बांगलादेशातील हिंदूंचे अस्तित्वच संपेल

बांगलादेश सरकारचे हिंदू नागरिकांसंदर्भातील धोरण कायम राहिल्यास आणि कट्टरपंथीयांचा उद्रेक असाच सुरू राहिल्यास काही वर्षांत बांगलादेशातील हिंदूंचे अस्तित्वच संपून जाईल. मोहम्मद युनूस यांचे सरकार हिंदूंच्या हत्येला पाठिंबा देत आहे. हिंदू नागरिकांना जीवे मारण्याच्या धमक्या देणे आणि व्यावसायिकांना खंडणी मागण्याचे प्रकार सुरू आहे. पोलिस तक्रार केल्यास कुटुंबातील महिलांचे अपहरण करण्याच्या धमक्या दिल्या जात आहे.

झेनाइदह जिल्ह्यातील कालीगंज परिसरात सोमवारी एका ४४ वर्षांच्या हिंदू विधवा महिलेवर सामूहिक बलात्कार करण्यात आला. आरोपींनी बलात्कारानंतर तिला झाडाला बांधून मारहाण केली. यासंदर्भात तक्रार दाखल करूनही अद्याप आरोपींना पकडण्यात आलेले नाही. कट्टरवाद्यांच्या हौदोसाने हिंदू नागरिक कमालीचे दहशतीत आहे. हजारो लोक देश सोडण्याची तयारीत आहे, भारत सरकारने हस्तक्षेप करून हिंदूंच्या सुरक्षेसाठी आणि त्यांना आश्रय देण्यासाठी पाऊले उचलावी अशी आमची मागणी आहे.

**'हिंदूंची हत्या ही एक किरकोळ घटना'**

बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीचे नेते मिर्झा फखरूल इस्लाम यांनी एक धक्कादायक विधान केले आहे. हिंदूंची हत्या या किरकोळ आणि क्षुल्लक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. हिंदूंच्या हत्या म्हणजे माध्यमांनी मोठी केलेली प्रकरणे असल्याचे फखरूल इस्लामने म्हटले. या फक्त किरकोळ घटना आहेत. हिंसाचाराच्या घटना कोणत्याही एका समुदायापुरत्या मर्यादित नाहीत. मोहम्मद युनूस यांच्या अंतरिम सरकारच्या काळात मुस्लिमही सुरक्षित नसल्याचा दावा त्यांनी केला. (वृत्तसंस्था)

### इंडिया आघाडीतील नेत्यांची दातखिळी

तेलंगणा भाजपाचे प्रदेशाध्यक्ष एन. रामचंद्र राव म्हणाले, बांगलादेशात हिंदूंच्या हत्या दिवसेंदिवस वाढत आहेत. संपूर्ण देश तेथील अल्पसंख्यकांच्या पाठीशी उभा असताना काँग्रेस आणि इंडिया आघाडीच्या नेत्यांची याप्रकरणी दातखिळी बसली आहे. पॅलेस्टाईन, व्हेनेझुएलातील घटनांवर बोलतात, पण बांगलादेशात हिंदूंवर होणाऱ्या अत्याचारांचा निषेध करायला ते तयार नाही, यातून त्यांची मानसिकता दिसून येते.



# गोंदिया गारठला
## तापमान ७ अंश सेल्सिअस

### विदर्भात सर्वाधिक थंड

◆ **गोंदिया, ६ जानेवारी**

गत महिनाभरापासून शहरासह जिल्ह्याच्या तापमानात तढ-उतार दिसत आहे. गत महिन्यात यंदाच्या मोसमातील नीचांकी तापमान ८ अंश सेल्सिअस नोंदले गेले होते. तर मंगळवारी जिल्ह्याचे किमान तापमान ७ अंश नोंदले गेले, जे यंदाच्या मोसमातील सर्वांत कमी आहे.

वातावरणात सकाळी धुक्याची चादर पसरल्याचे चित्र होते. थंडीने चांगलाच जोर पकडल्याने नागरिकांना गरम कपडे घालूनच बाहेर पडावे लागत आहे. शहरासह ग्रामीण भागात शेकोट्यांजवळ नागरिक ऊब घेतानाचे चित्र आहे.

यंदा पावसाळा लांबल्यामुळे थंडीला उशिराने सुरुवात झाली. ढगाळी वातावरण निवळल्यानंतर नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात



जिल्ह्यात बोचऱ्या थंडीला सुरुवात झाली. १९ डिसेंबर रोजी यंदाच्या मोसमातील सर्वांत कमी ८ अंश तापमान नोंदण्यात आले होत. त्यानंतर आज ७ अंश किमान तापमानाची नोंद झाली. यानंतर आजचे कमी तापमान नागपूरचे ७.६ अंश, तर वर्ध्याचे तापमान ८.४ अंश राहिले.

देशाच्या उत्तर भागात सुरू असलेले हिमपात व वाहणारे थंड वारे यामुळे सर्वत्र शीतलहर पसरली असल्याचे हवामान विभागाच्या सूत्रांनी सांगितले. थंडीचा जोर वाढल्याने सर्दी, खोकला व तापाचे रूग्ण निघू लागले आहेत. (तभा वृत्तसेवा)

# समाज माध्यमावरील मोनू राणा निघाला 'गफ्फार'

◆ **कर्नाल, ६ जानेवारी**

हरयाणातील कर्नालमध्ये एका हिंदू महिलेला बनावट ओळख सांगून जाळ्यात ओढल्याचा, लग्नाचे आमिष दाखवून शारीरिक शोषण आणि नंतर खाजगी क्षणांचे व्हिडीओ बनवून ब्लॅकमेल केल्याचा प्रकार समोर आला आहे. गफ्फार नावाच्या आरोपीने समाज माध्यमावर मोनू राणा नावाचे खाते तयार केले होते.

३४ वर्षीय पीडितेचे म्हणणे आहे की, समाज माध्यमावर संपर्क झाल्यानंतर आरोपीने स्वतःला हिंदू असल्याचे सांगून तिचा विश्वास जिंकला. दोघे एकत्र राहू लागले. याच दरम्यान त्याने खाजगी क्षणांचे व्हिडीओ-फोटो स्वतःकडे ठेवले. नंतर मोनू राणा हा 'गफ्फार' असल्याचे सत्य समोर आले.

पीडिता घटस्फोटित असून १४ वर्षांच्या मुलीची आई आहे. तिचा आरोप आहे की, आरोपीने तिला लग्नाचे आमिष दाखवले. नंतर त्याचे वर्तन बदलले आणि तो तिला त्रास देऊ लागला. त्याने खोल्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावले होते, ज्याद्वारे त्याने खाजगी क्षणांचे व्हिडीओ आपल्या मोबाईलमध्ये रेकॉर्ड केले. दरम्यान, महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे. (वृत्तसंस्था)

# पिलिभीत अभयारण्यात ११ वर्षांत ११ वाघ-वाघिणींना 'जन्मठेप'

◆ **पिलिभीत, ६ जानेवारी**

पिलिभीत व्याघ्र प्रकल्पाने (पीटीआर) केवळ रोहिलखंडमध्येच नव्हे तर, जागतिक स्तरावर वाघ पाहण्यासाठी आणि पर्यटनासाठी एक वेगळी प्रतिष्ठा मिळवली आहे. येथील पर्यटकांना वाघ पाहण्याची जवळजवळ हमी दिली जाते. या प्रकल्पाचा आणखी एक पैलू आहे जो फार कमी लोकांना माहिती आहे. येथील काही वाघांना जंगलातून वाचवल्यानंतर त्यांचे स्वातंत्र्य परत मिळू शकले नाही आणि त्यांना प्राणीसंग्रहालयात जीवन जगावे लागले.

पीटीआरमधील वाघांचा स्वभाव इतर व्याघ्र प्रकल्पांपेक्षा काहीसा वेगळा असल्याचे म्हटले जाते. अनेक वाघ मानवी वस्तीजवळ राहूनही मानवांना हानी पोहोचवत नाहीत. तथापि, काही प्रकरणांमध्ये, अनधिकृत पर्यटकांवर हल्ले झाल्याची नोंद झाली आहे. अशा प्रकरणांमध्ये, वन विभागाला वाघांना वाचवावे लागले आहे आणि त्यांचे स्थलांतर करावे लागले आहे. म्हणूनच, गेल्या ११ वर्षांत, ११ वाघ आणि वाघिणींना प्राणीसंग्रहालयात पाठवावे लागले आहे, ही पद्धत वन विभागाच्या भाषेत 'जन्मठेपेची शिक्षा' म्हणून ओळखली जाते. पिलिभीत व्याघ्र प्रकल्पाच्या आकडेवारीनुसार, २०१४ मध्ये राखीव घोषित झाल्यापासून एकूण २६ बचाव मोहिमा राबवण्यात आल्या आहेत. या मोहिमांमध्ये, पाच शावकांसह एकूण २३ वाघ आणि वाघिणींना पकडण्यात आले. (वृत्तसंस्था)

# तिरुप्परनकुंड्रम मंदिरात दीप प्रज्वलित करण्यास परवानगी

### उच्च न्यायालयाची स्टॅलिन सरकारला चपराक

◆ **चेन्नई, ६ जानेवारी**

तमिळनाडूच्या मद्रास उच्च न्यायालयाच्या मदुराई खंडपीठाने मंगळवारी तिरुप्परनकुंड्रम मंदिरात टेकडीवरील दर्ग्याजवळच्या दीपस्तंभावर (दीपथून) दिवा लावण्याची परवानगी दिली आहे. न्या. जी. जयचंद्रन् आणि न्या. के. के. रामकृष्णन् यांच्या खंडपीठाने न्या. जी. आर. स्वामीनाथन् यांच्या एकलपीठाचा निर्णय कायम ठेवला.

दिवा लावण्याच्या मुद्याला राजकीय रंग देण्यात आला, तर हा दीर्घकाळापासून चालत आलेल्या धार्मिक परंपरेशी संबंधित मामला आहे, असे न्यायालयाने म्हटले.

हे प्रकरण हिंदू तमिळ पक्षाचे नेते राम रविकुमार यांच्या याचिकेशी संबंधित आहे, ज्यात कार्तिगई दीपम उत्सवादरम्यान टेकडीवर असलेल्या दगडाच्या खांबावर दिवा लावण्याची परवानगी मागण्यात आली होती. गेल्या वर्षी १ डिसेंबर रोजी न्या. स्वामीनाथन् यांनी याचिका स्वीकारून दीपम लावण्याचा आदेश दिला होता. मात्र, तामिळनाडूच्या



स्टॅलिन सरकारने कायदा आणि सुव्यवस्थेच्या भीतीचे कारण देत आदेश लागू करण्यास नकार दिला होता. सरकारने न्या. स्वामीनाथन् यांच्या निर्णयावर आरोप केला की, न्या. स्वामीनाथन् जातीय तणाव भडकावत आहेत. सरकारने या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

**दीपम प्रज्वलित करण्याच्या जागेवरून वाद**

तामिळनाडूच्या मदुराईपासून १० किमी दक्षिणेला तिरुप्परनकुंड्रम शहर आहे. हे भगवान मुरुगनच्या सहा निवासस्थानांपैकी एक मानले जाते. येथील तिरुप्परनकुंड्रम टेकडीवर सुब्रमण्य स्वामी मंदिर आहे, जे सहाव्या शतकातील मानले जाते. टेकडीच्या सर्वांत उंच शिखरावर दीपस्तंभ आहे. अशी मान्यता आहे की, ऐतिहासिक काळापासून तमिळ महिना कार्तिगईच्या पौर्णिमेला (नोव्हेंबर-डिसेंबर दरम्यान) कार्तिगई दीपम उत्सवादरम्यान स्तंभावर दिवा लावला जात आहे. १७ व्या शतकात टेकडीवर सिकंदर बधूषा दर्ग्याचे बांधकाम करण्यात आले होते.

दर्ग्यापासून दीपस्तंभ सुमारे १५ मीटर अंतरावर आहे. दर्ग्याच्या बांधकामानंतर तेथे दिवा लावण्यावरून मंदिर प्रशासन आणि दर्ग्यामध्ये वाद सुरू झाला होता. दर्गा व्यवस्थापनाचा दावा आहे की, मंदिराशेजारील उची पिल्लैयार मंडपमजवळ दीर्घकाळापासून दिवा लावण्याची प्रथा आहे. (वृत्तसंस्था)

# समृद्धी महामार्गावर खाजगी बस जळून खाक



जळून खाक झालेली खासजी बस

### सुदैवाने जीवितहानी टळली
### ३५ प्रवासी सुखरूप

◆ **मेहकर, ६ जानेवारी**

समृद्धी महामार्गावर नागपूरहून मुंबईकडे जाणाऱ्या एका खाजगी प्रवासी बसला अचानक आग लागली. मात्र, चालकाच्या प्रसंगावधानामुळे बस तत्काळ थांबवण्यात आली आणि आरडाओरड करून सर्व प्रवाशांना खाली उतरवण्यात आले. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली. ३५ प्रवासी सुखरूप आहेत.

नागपूर येथून मुंबईकडे जाणाऱ्या खुराणा ट्रव्हॅल्सच्या बसला आग लागल्याचे लक्षात येताच चालकाने रस्त्याच्या कडेला बस उभी केली आणि काही मिनिटांतच बस जळून खाक झाली. सर्व प्रवासी सुरक्षित बाहेर पडले असले, तरी काही प्रवाशांना किरकोळ दुखापत झाल्याची प्राथमिक माहिती आहे. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मेहेकर तालुक्यातील शिवणी पिसा गावाजवळ ही घटना सोमवारी मध्यरात्री घडली. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट असून, शॉर्टसर्किट किंवा तांत्रिक बिघाडामुळे आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस, महामार्ग पोलिस आणि अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले आणि आग आटोक्यात आणली, तोपर्यंत बस पूर्णपणे जळून खाक झाली होती.

या घटनेमुळे काही काळ समृद्धी महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी तत्काळ वाहतूक नियंत्रित करून पर्यायी मार्गाने वाहने वळवली. दोन वर्षांपूर्वी समृद्धी महामार्गावर खाजगी बसला आग लागून २६ प्रवाशांचा मृत्यू झाला होता. बुलढाणा जिल्ह्यातून जाणाऱ्या समृद्धी महामार्गावर अपघातांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. (तभा वृत्तसेवा)

### पीव्हीसी आधार कार्ड बनवण्याचे शुल्क वाढले

**नवी दिल्ली** : भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाने आधार पीव्हीसी कार्ड बनवण्याचे शुल्क वाढवले आहे. आता यासाठी ५० रुपयांऐवजी ७५ रुपये द्यावे लागतील. नवीन दर १ जानेवारी २०२६ पासून लागू झाले आहेत. नुसार, साहित्य, छपाई आणि सुरक्षित वितरणाचा खर्च वाढल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.

### मुंबईचा महापौर हा श्रमिकांचा आवाज असेल : शेलार

मुंबई : मुंबईचा महापौर हा महायुतीचाच,मराठी आणि हिंदूच असेल. तो मुंबईतील कामगार, कष्टकरी, श्रमिकांचा 'आवाज' म्हणून काम करेल, अशी ग्वाही मुंबई उपनगर पालकमंत्री तथा भाजपाचे मुंबई महापालिका निवडणूक प्रभारी आशिष शेलार यांनी मंगळवारी दिली. बेस्ट वर्कर्स युनियन आणि मुंबई ऑटो रिक्षा टॅक्सी मेन्स युनियनने आज गोरेगाव येथे कामगार नेते शशांक राव यांच्या नेतृत्वाखाली घेतलेल्या मेळाव्यात महायुतीला जाहीर पाठींबा दिला.

बेस्ट, महापालिका कामगार, श्रमिक, रिक्षावाले आणि टॅक्सीवाले यांचे प्रश्न सोडवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच मुंबई अँड आशिष शेलार यांनी वेळोवेळी घेतलेल्या सकारात्मक भूमिकांमुळे महायुतीला युनियन पाठींबा देत असल्याचे त्यांनी जाहीर केले. दरम्यान, आशिष शेलार यांनी सकाळी वांद्रे पश्चिम वॉर्ड क्रमांक १०० च्या महायुतीच्या उमेदवार स्वप्ना म्हात्रे यांचा यांच्या प्रचारार्थ पदयात्रा केली. तर दुपार नंतर पश्चिम उपनगरात गोरेगाव येथे कामगार मेळाव्याला संबोधित केले. त्यानंतर महायुतीचे उमेदवार संदिप पटेल, सौ अनुराधा पेंडणेकर, विप्लव अवसारे, उज्वला मोडक, उमेश राणे आणि कमलेश राय यांच्या प्रचारात सहभागी होऊन मुंबईकरांशी संवाद साधला.

# 'आयएसआय'कडून बालकांचा वापर

### हेरगिरीबाबत गुप्तचर यंत्रणांचा गंभीर इशारा

◆ **नवी दिल्ली, ६ जानेवारी**

पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय आता हेरगिरीसाठी भारतातील बालकांना लक्ष्य करीत आहे. त्यांना अडकवण्याचा कट रचत आहे, असा इशारा गुप्तचर यंत्रणांनी दिला आहे.

पठाणकोट पोलिसांनी हेरगिरीच्या आरोपाखाली एका १५ वर्षीय मुलाला अटक केली. तो वर्षभरापासून पाकिस्तानमधील आयएसआयच्या सूत्रधारांना भारताबद्दल माहिती देत होता. अटक केलेल्या मुलासह पंजाबमधील इतर मुलेही आयएसआयशी संबंधित आहेत. पोलिसांनी पंजाबच्या विविध जिल्ह्यांना याबद्दल माहिती दिली आहे. अटक केलेला मुलगा सांबा (जम्मू) येथील रहिवासी आहे.

आपल्या नापाक कारवायांद्वारे भारताला हानी पोहोचवण्यासाठी भारतात विविध कारवाया करणाऱ्या पाकिस्तान आता भारतातील बालकांना लक्ष्य करीत आहे. पठाणकोटमध्येही अशीच एक घटना घडली. पठाणकोट पोलिसांनी गेल्या वर्षभरापासून पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेच्या संपर्कात असलेल्या १५ वर्षीय मुलाला अटक केली. तो पाकिस्तानला माहिती पाठवत होता. त्याच्या मोबाईलवरून मोठ्या प्रमाणात माहिती मिळवण्यात आली.

हा बालक जम्मूतील सांबा जिल्ह्यातील रहिवासी असल्याचे सांगितले जात आहे. त्याच्या अटकेनंतर पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. चौकशीदरम्यान पोलिसांना असेही कळले की, पंजाबमधील इतर अनेक जिल्ह्यांमधील लहान मुलेही आयएसआयच्या संपर्कात आहेत.

आयएसआयच्या संपर्कातील मुलांना वेळीच पकडून संवेदनशील माहिती आयएसआयला मिळू नये यासाठी पोलिसांनी पंजाबमधील विविध जिल्ह्यांना सतर्क केले आहे.

या घटनेची माहिती देताना पठाणकोट वरिष्ठ पोलिस अधीक्षकांनी सांगितले की, अटक करण्यात आलेला मुलगा पाकिस्तानमधील आयएसआयच्या संपर्कात होता. तो ही माहिती पाकिस्तानला कशी पुरवत होता, याबद्दल त्याच्याकडून बरीच माहिती मिळाली आहे.

पंजाबमधील इतर मुलेही यात सामील आहेत आणि पंजाबमधील विविध जिल्ह्यांतील पोलिसांना त्यांच्याबद्दल माहिती देण्यात आली आहे. लवकरच, ही मुलेही पोलिसांच्या ताब्यात असतील. (वृत्तसंस्था)

# तेलाचे टॅंकर पाठवतो म्हणून १५ लाख पाठविले; परंतु तेलाचे टॅंकर पाठविलेच नाही

### अक्कलकोटच्या व्यापाऱ्याची १५ लाखाची फसवणुक

**तभा वृत्तसेवा**

**अक्कलकोट, दि. ६ जानेवारी-**

अक्कलकोट येथील वेदांत टेडर्सचे विनित राठोड खादय तेलाचे व्यापारी यांना खाद्य तेलाची आवश्यकता असल्याने ब्रोकर मार्फत डी. जी. एन्टरप्रायजेसचे मालक यांचे बॅंक खात्यावर १५ लाख रुपये अदा केले. पण वारंवार खाद्य तेलाची मागणी करूनही तेलाच्या टॅंकरचे वितरण करण्यास टाळाटाळ करत असल्याचे निदर्शनास आल्याने याबाबत फसवणुक झाल्याने अक्कलकोट उत्तर पोलीसात फिर्याद दाखल झाली आहे.

अक्कलकोट उत्तर पोलीसात विनीत जयप्रकाश राठोड ( वय ३0, रा. अक्कलकोट) यांनी फिर्याद दाखल केली आहे. गु.र.न. व कलम- भाग ५गु.र.न. 0५/२०२६ कलम ३१८(४),३(५) प्रमाणे गुन्हाची नोंद अक्कलकोट उत्तर पोलीसात झाली आहे . डी.जी. एंटरप्राइजेस कॅनरा बॅंक मालाड ईस्ट मुंबई यांचे मालक त्याचा बॅंक अकाउंट नंबर ५०२१२०१०२१९९८० चे अकाउंटधारक राहणार दामू नगर कांदिवली पूर्व मुंबई व ब्रोकर प्रशांत दादासो पवार (राहणार थ्री ज्वेलर्स ए बिल्डिंग खोली नंबर ४०१ टिळेकरनगर कोंढवा पुणे) यांच्या विरोधात तक्रार दाखल झाली आहे.

ही घटना १४/0७/२0२५ रोजी दुपारी 0३/00 वा. चे ते १६/0७/२0२५ रोजी 0४/00 वा.चे.ते दिनांक/0७/२0२५ रोजी १४/00 वाचे दरम्यान घडली आहे. याबाबत उतर पोलीस सुत्राकडून मिळालेली माहिती अशी की फिर्यादी यांचे वेदांत ट्रेडर्स दुकान आहे. त्यांना खाद्यतेलाची आवश्यकता असते. यातील फिर्यादीने ब्रोकर प्रशांत पवार यांच्याशी संपर्क साधून डी.जी. इंटरप्राईजेस दामू नगर कांदिवली पूर्व मुंबई कॅनरा बॅंक अकाउंट मध्ये दिनांक १४/0७/२0२५ रोजी आयडीबीआय बॅंक शाखा अक्कलकोट अकाउंट नंबर १५८३ १0२000 00२५६१ वेदांत ट्रेडर्स या अकाउंट वरून ६ लाख रुपये पेमेन्ट केले दिनांक १६/0७/२0२५ रोजी खाद्यतेलाने टॅंकर भरून उभा आहे असे सांगितलेने ४ लाख रुपये आयडीबीआय बॅंक शाखा अक्कलकोट येथून पुन्हा पाठवले. त्यानंतर प्रशांत पवार यांनी फिर्यादीस दुसरे दिवशी १७/0७/२0२५ रोजी फोन करून पेमेंट कमी पडत आहे त्या पार्टीकडे अजून ५ लाख रुपये पाठवा गाडी सुटेल असे सांगितले.

यामुळे त्यावेळी फिर्यादी आणि निलेश गडकरी यांचे मोबाईलवर संपर्क साधून दिनांक १७/0७/ २0२५ रोजी सिद्धेश्वर बॅंक अक्कलकोट शाखेचे अकाउंट नंबर १00३0१४000८१४ वेदांत ट्रेडर्स या खात्यातून त्यांना पुन्हा पाच लाख रुपये आरटीजीएस ने पैसे पाठवले.

त्यानंतर गाडीची वाट पाहून तेलाची गाडी न आल्याने ब्रोकर प्रशांत पवार यांना त्यांचे मोबाईलवर संपर्क साधला. विचारणा केली असता त्यांनी त्या टॅंकरचा ड्रायव्हरचा मोबाईल नंबर ८७८७0८८१२१ दिल्याने फिर्यादीने त्या नंबर एन एल 0१ एल ८0९४ हा भरून उभा आहे. पेमेंट अजून झालेला नाही गाडी कंपनी सोडत नाही. त्यामुळे मी थांबून आहे, असे सांगितले.

त्यानंतर त्या कंपनीला गडकरी यांनी पेमेंट न पाठवल्याने कंपनीने दोन दिवस वाट पाहून कंपनीने खाद्यतेलाचे टॅंकर खाली करून घेतले असल्याबाबत सांगितले. त्यानंतर फिर्यादीने वारंवार ब्रोकर प्रशांत पवार व डी.जी. इंटरप्राईजेस दामू नगर कांदिवली पूर्व मुंबई यांना फोनवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला परंतु ते फोन उचलत नसल्याने फिर्यादीने त्यांचे मोबाईलवर मेसेज केले तुम्हाला उद्या होत नाही परवा पाठवतो असं सांगितले. त्यानंतर फिर्याने त्यांचे मोबाईलवर वारंवार फोन करून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता ते कधी फिर्यादीचा फोन घेऊन खाते तेल पाठवतो, असे सांगून त्यानंतर फिर्यादीचे फोन रिसीव करत नसल्याने व त्यांनी अद्याप पर्यंत खाद्यतेल पाठवून न दिल्याने त्यांनी फिर्यादीची फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने पोलीसात धाव घेतली. घटनेचा अधिक तपास पोनि भिताडे करीत आहेत.



अजित पवार यांच्या पक्षाला सावरकरांचे विचार मान्य असतील, तर तुमच्या बरोबर, नाही तर तुमच्याविना आणि विरोधात शिरलात तर, तुमच्या विरोधात आम्ही आमचे काम करू.
**आशिष शेलार**, सांस्कृतिक मंत्री


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

बुधवार, ७ जानेवारी २०२६






'बच्चन' ही माझी ओळख नाही. त्यामुळे मला दडपण जाणवत नाही. तो माझा वारसा नाही. माझे आडनाव नंदा आहे. मी आधी माझ्या वडिलांचा मुलगा आहे आणि त्यामुळे त्यांना अभिमान वाटेल, असे काम करण्याचा मी प्रयत्न करीत आहे.
**अगस्त्य नंदा**, अभिनेता



आकर्षक 'हेअर स्टाईल' केवळ मानवच करीत नाही, याचा प्रत्यय देणारे हे छायाचित्र. बिकानेर येथे होऊ घातलेल्या उंट उत्सवापूर्वी येथील एका उंटाची अशी नक्षीदार 'हेअर स्टाईल' करण्यात आली

## शासकीय वसाहतीला आग, तिघांचा मृत्यू

◆ **नवी दिल्ली, ६ जानेवारी**

दिल्लीतील आदर्शनगर भागातील दिल्ली मेट्रो कर्मचाऱ्यांसाठी बांधण्यात आलेल्या पाच मजली क्वार्टरला आग सोमवारी रात्री २.३९ वाजता लागली, यात एकाच कुटुंबातील तिघांचा होरपळून मृत्यू झाला. मृतकांमध्ये पती-पत्नी आणि दहा वर्षांच्या मुलीचा समावेश आहे.

एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, शासकीय क्वार्टरमध्ये आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन पथक आणि पोलिस घटनास्थळी पोहोचले. आगीवर नियंत्रण मिळवून अडकलेल्या २५ नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. चौथ्या माळ्यावर एक कुटुंब होरपळून जखमी झाले. त्यांना रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तिघांना मृत घोषित केले. आग विझवताना अग्निशमन विभागाचा एक कर्मचारी जखमी झाला. पोलिस या प्रकरणाचा तपास करीत आहेत. आगीचे कारण अजूनही समजलेले नाही. ◂(वृत्तसंस्था)

# नेपाळमध्ये पुन्हा उफाळला हिंसाचार

### भारतीय सीमेवर 'हाय अलर्ट' | परसा जिल्ह्यात मशीद उद्ध्वस्त | पोलिसांवर जमावाचा हल्ला



◆ **काठमांडू, ६ जानेवारी**

भारताच्या सीमेलगत नेपाळच्या परसा जिल्ह्यातील कमला परिसरात बेकायदेशीररीत्या बांधण्यात आलेली मशीद लोकांनी उद्ध्वस्त केल्यानंतर या भागात दोन गटांत हिंसाचार उसळला. मंगळवारी एका गटाने घटनेचा निषेध करीत शासकीय वाहने आणि इमारतीची जाळपोळ व तोडफोड केली. परसा, धनुषा येथील महामार्ग रोखल्याने वाहतूक बंद आहे. या भागात सध्या संचारबंदी लागू असतानाही हिंसक निदर्शने सुरूच आहे. भारताने सतर्कता बाळगत सीमेवर 'हाय अलर्ट' जारी केला असून, सीमा बंद केल्या.

परसा जिल्ह्याचे मुख्य जिल्हा अधिकारी भोला दहल यांनी सांगितले की, धनुषा जिल्ह्यात एका गटाने सोमवारी रात्री अतिक्रमित जागेवरील मशिदीची तोडफोड केली. याची चित्रफीत समाज माध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर दोन गटांत संघर्ष झाला. मशीद तोडल्याचा निषेध करीत दुसऱ्या गटाने बिरगंज, धनुषा, परसा भागात तीव्र निदर्शने केली.

पोलिसांनी निदर्शकांना रोखण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी शासकीय वाहने, इमारती आणि महामार्गावर जाळपोळ केल्याने राजधानी काठमांडू आणि भारताला जोडणारा मार्ग वाहतुकीसाठी बंद आहे. जमावाने पोलिसांवर दगडफेक केली. निदर्शकांना नियंत्रित करण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराचे गोळे डागले आणि लाठीचार्ज केला. दक्षिण नेपाळमधील हिंसाचाराच्या पृष्ठभूमीवर भारतीय सीमा बंद करण्यात आल्या, तसेच सुरक्षा दलाची अतिरिक्त तुकडी तैनात करण्यात आली. ◂(वृत्तसंस्था)

### गोळ्या घालण्याचा आदेश

» एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, समाज माध्यमांवर चित्रफीत प्रसारित करणाऱ्या दोन हैदर अन्सारी आणि अमानत अन्सारीसह हिंसक आंदोलनाप्रकरणी २५ जणांना ताब्यात घेतले आहे. या भागात अजूनही हिंसक घटना सुरू असून, पोलिसांचे अतिरिक्त पथक तैनात करण्यात आले. हिंसा करताना आढळल्यास गोळ्या घालण्याचा आदेश देण्यात आला. ■

### टिकटॉकवरील चित्रफितीमुळे परिस्थिती चिघळली

» मुख्य जिल्हा अधिकारी दहल यांनी वृत्तसंस्थेला सांगितले की, कमला परिसरात मशिदीची तोडफोड झाल्याचे आणि हिंदू नागरिकांनी एका गटावर हल्ला केल्याच्या एआय छायाचित्र आणि टिकटॉकवर अनेक चित्रफिती प्रसारित झाल्याने परिस्थिती चिघळली. अफवांमुळे एका गट रस्त्यावर उतरला आणि अनेक भागांत हिंसाचार झाला. परिस्थिती नियंत्रित करण्यासाठी तीन जिल्ह्यांत संचारबंदी लागू करण्यात आली. ■

## पतीचे अनैतिक संबंध आत्महत्येसाठी चिथावणी नाही

◆ **रायपूर, ६ जानेवारी**

पतीच्या अनैतिक संबंधांमुळे पत्नीने आत्महत्या केल्याच्या प्रकरणात छत्तीसगड उच्च न्यायालयाने पीडितेची याचिका फेटाळून लावली. न्यायालयाने म्हटले की, अनैतिक संबंध नैतिकदृष्ट्या चुकीचे असू शकतात. परंतु, आत्महत्येशी थेट आणि स्पष्ट संबंध सिद्ध होईपर्यंत त्यांना कलम ३०६ अंतर्गत दोषी ठरवता येत नाही. उच्च न्यायालयाने सत्र न्यायालयाच्या निर्णयाविरुद्धचे अपीलही फेटाळले.



**छत्तीसगड उच्च न्यायालयाचा निर्वाळा**

प्राप्त माहितीनुसार, कुंती नामक महिलेचा विवाह २०११ मध्ये रवीकुमार गायकवाडशी झाला होता. कुंतीच्या कुटुंबाने तिच्या पतीवर, मुले नसल्यामुळे, कमी हुंडा आणि अशिक्षित असल्याने छळ केल्याचा आरोप केला होता. तिच्या पतीचे एका महिलेशी अनैतिक संबंध असल्याचा आरोपही करण्यात आला होता. ४ जून २०१७ रोजी कुंतीने आत्महत्या केली. त्यानंतर तिच्या पती आणि त्याच्या मैत्रिणीविरुद्ध आत्महत्येला प्रवृत्त केल्याचा खटला दाखल करण्यात आला. परंतु, फिर्यादी छळ किंवा चिथावणीचा कोणताही पुरावा सादर करू शकले नाहीत. २२ जुलै २०२२ रोजी महासमुंद सत्र न्यायालयाने पती आणि त्याच्या मैत्रिणीला निर्दोष मुक्त केले. पीडितेच्या कुटुंबाने या निर्दोष मुक्ततेला आव्हान देत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. न्या. संजय श्याम अग्रवाल यांच्या एकलपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली.

न्यायालयाने स्पष्ट केले की, केवळ पतीचे अनैतिक संबंध आत्महत्येला प्रवृत्त करणारे मानले जाऊ शकत नाहीत. या आधारावर, मृत महिलेचा पती आणि त्याच्या मैत्रिणीला आयपीसीच्या कलम ३०६ अंतर्गत निर्दोष मुक्त करण्यात आले. ◂(वृत्तसंस्था)

# इस्रायलचे लेबनॉनवर हवाई हल्ले

### ● २२ नागरिक ठार, ५८ जखमी ● हिजबुल्लाहच्या अड्ड्यांवर ड्रोनचा मारा

◆ **बैरूत, ६ जानेवारी**

लेबनॉन सरकार आणि दहशतवादी संघटना हिजबुल्लाह यांच्यात गुरुवारी निःशस्त्रीकरणावर होणाऱ्या चर्चेपूर्वी इस्त्रायलच्या सैन्याने मंगळवारी पहाटे दक्षिण आणि पूर्व लेबनॉनमधील अनेक भागांत हवाई हल्ले केले, यात लेबनॉनमधील तिसरे सर्वांत मोठे शहर सिडॉनचा समावेश आहे. हिजबुल्लाहच्या अड्ड्यांना लक्ष्य करून झालेल्या हल्ल्यात २२ नागरिक ठार, तर ५८ जखमी झाल्याच्या वृत्ताला हिजबुल्लाहच्या प्रवक्त्याने दुजोरा दिला.

हिजबुल्लाहने समाज माध्यमावर प्रसारित चित्रफितीत म्हटले की, दक्षिण आणि पूर्व लेबनॉनमधील लितानी नदीच्या उत्तरेकडील गावांना लक्ष्य करीत इस्रायली हवाई दलाने हल्ले चढविले. यात अनेक इमारती आणि पायाभूत सुविधांचे नुकसान झाले. हल्ल्यात २२ नागरिकांना जीव गमवावा लागला, तर ५८ जखमींवर उपचार सुरू आहे.



दक्षिणेकडील किनारी शहर सिडॉनमध्ये पाच इमारती उद्ध्वस्त झाल्या. घटनास्थळी बचाव पथके तैनात करण्यात आली आणि ढिगाऱ्यात अडलेल्या नागरिकांना बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू आहे.

इस्रायली लष्कराचे प्रवक्ते अवीचाई अद्राई यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले की, हिजबुल्लाह आणि हमासच्या अड्ड्यांवर किमान दोन तास हवाई हल्ले करण्यात आले. यात त्यांचे शस्त्रसाठे, लपण्याची ठिकाणे आणि पायाभूत सुविधा उद्ध्वस्त करण्यात आल्या. ◂(वृत्तसंस्था)

# अर्धकुंभात गैर हिंदूंवर प्रवेशबंदी घालणार

### उत्तराखंड सरकार साधू-संतांशी चर्चा करून घेणार निर्णय

◆ **डेहराडून, ६ जानेवारी**

उत्तराखंडमधील हरिद्वारच्या गंगा घाटावर २०२७ मध्ये अर्धकुंभमेळा आयोजित केला जाणार आहे. यात गैर हिंदू नागरिकांना प्रवेशबंदी घालण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला. साधू-संत आणि मंदिरातील पुजाऱ्यांशी चर्चा करून प्रस्तावावर शिक्कामोर्तब केला जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी दिली.



धामी म्हणाले, हरिद्वारमध्ये अर्धकुंभमेळ्याची तयारी सरकारने सुरू केली आहे आणि यासाठी लवकरच निधी जाहीर करण्यात येईल. गर्दी टाळण्यासाठी आणि सुरक्षेचा मुद्दा लक्षात घेऊन अर्धकुंभात केवळ हिंदूंनाच प्रवेश देण्यासंदर्भात प्रस्ताव तयार करण्यात आला. प्रस्ताव अजून विचाराधीन असून, चर्चेनंतर अंतिम निर्णय घेण्यात येईल. २०२७ मध्ये होणाऱ्या अर्धकुंभात गैर हिंदूंना प्रवेशबंदी करण्याची मागणी श्री गंगा सभेचे अध्यक्ष नितीन गौतम यांनी सरकारकडे केली होती. त्यानंतर यासंदर्भात प्रस्ताव तयार करण्यात आला. या विषयावर संबंधित लोकांसोबत चर्चा करून निर्णय घेण्यात येईल. ◂(वृत्तसंस्था)

### सनातनशी संबंध नसणाऱ्यांना प्रवेश नकोच : नितीन गौतम

» गंगा घाटाचे व्यवस्थापन करणाऱ्या सभेचे अध्यक्ष नितीन गौतम यांनी म्हटले की, आता आपल्याला पुढील १०० वर्षांसाठी नियोजन करण्याची आवश्यकता आहे. ज्या लोकांचा सनातन, आपला धर्म, संस्कृती आणि भावनांशी संबंध नाही, त्यांना अर्धकुंभात प्रवेश देण्याचा प्रश्नच नाही. हा सनातनचा सर्वांत मोठा उत्सव आहे. बिगर-हिंदूंच्या प्रवेशामुळे सुरक्षेचा प्रश्न उद्भवू शकतो. ■

## चित्रपट वार्ता

### श्रद्धा आता इच्छाधारी नागीण!

**मुंबई** : 'स्त्री' आणि 'स्त्री-२'च्या यशानंतर श्रद्धा कपूरला अनेक मोठ्या चित्रपटांविषयी विचारणा झाली. त्यातच तिचा एक चित्रपट सहा वर्षांपासून रखडलेला होता. त्याचे काम आता सुरू होणार असल्याची माहिती आहे. चित्रपटाचे तात्पुरते नाव 'नागिन' असे ठेवण्यात आले आहे. याची घोषणा २०२० मध्येच झाली होती. त्यावेळी कोरोनाची आपत्ती कोसळली आणि नंतर सातत्याने या चित्रपटाच्या मार्गात अडचणी येत गेल्या. तरीही निर्मात्यांनी हार मानली नाही. आता येत्या एप्रिल महिन्यापासून याचे चित्रीकरण सुरू होणार आहे. या चित्रपटात श्रद्धा कपूर मुख्य भूमिकेत असून, ती इच्छाधारी नागीण म्हणून झळकणार आहे. याविषयी श्रद्धा म्हणाली की, माझ्यासाठी पडद्यावर नागिणीची भूमिका साकारणे अतिशय आनंदाची बाब आहे. मी श्रीदेवीचे 'नगीना' आणि 'निगाहे' चित्रपट पाहूनच मोठी झाली आहे. त्यांना मी माझी आदर्श मानते. भारतीय परंपरेतील लोककथांवर आधारित भूमिका करण्याची मला कायमच इच्छा होती. त्यामुळे या चित्रपटाविषयी मी फारच उत्सुक आहे. ■



# अभिनेता विजयला 'सीबीआय'चा समन्स

**करूर चेंगराचेंगरी प्रकरण**

◆ **नवी दिल्ली, ६ जानेवारी**

करूर चेंगराचेंगरी प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) अभिनेता व राजकारणी विजयला मोठा धक्का दिला आहे. सीबीआयने टीव्हीके प्रमुख विजयला १२ जानेवारी रोजी चौकशीसाठी बोलावले आहे. हा खटला गेल्या वर्षी २७ सप्टेंबर रोजी विजयच्या रॅलीत झालेल्या चेंगराचेंगरीशी संबंधित आहे, ज्यामध्ये ४१ लोकांचा मृत्यू झाला होता.

करूर जिल्ह्यातील वेलुसामीपुरम् येथे विजयच्या तमिलगा वेट्टी कझगम (टीव्हीके) पक्षाच्या रॅलीसाठी मोठ्या संख्येने लोक एकत्र आले होते. अधिकाऱ्यांच्या मते, या ठिकाणी सुमारे १० हजार लोकांची क्षमता होती, परंतु सुमारे ३० हजार लोक तिथे जमले होते. रॅलीत सुरक्षा नियमांचे पालन केले गेले नाही आणि अन्न आणि पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था केली गेली नाही. यामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार हे प्रकरण सीबीआयकडे सोपवण्यात आले आहे. पक्षाच्या अनेक वरिष्ठ नेत्यांची आधीच चौकशी करण्यात आली. आता विजय स्वतः चौकशीच्या कक्षेत आला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विजयच्या रॅलीचे नियोजन, गर्दी व्यवस्थापन आणि सुरक्षा व्यवस्थेबद्दल चौकशी केली जाईल. ◂(वृत्तसंस्था)



हिमाचल प्रदेशात सध्या बर्फवृष्टी सुरू असून, पर्यटनाला बहार आली आहे. सिमला येथे कडाक्याच्या थंडीत मंगळवारी सकाळी आईस रिंकवर स्केटिंगचा आनंद घेताना पर्यटक


### कंगनाचे चित्रपटात पुनरागमन

**मुंबई** : लोकसभा निवडणूक जिंकून मंडीच्या खासदार बनलेल्या कंगना राणावतने बऱ्याच काळानंतर चित्रपटाच्या सेटवर पुनरागमन केले आहे. कंगनाने आगामी 'भारत भाग्य विधाता' या चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात केली आहे. कंगनाने अधिकृत इन्स्टाग्राम अकाऊंटवरून 'भारत भाग्य विधाता' चित्रपटाच्या सेटवरील एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. यासोबत लिहिले आहे की, 'मणिकर्णिका' फिल्म्सच्या सेटवर येऊन खूप आनंद होत आहे. कंगनाने सप्टेंबर २०२४ मध्ये 'भारत भाग्य विधाता' चित्रपटाची घोषणा केली होती. हा चित्रपट सामान्य लोकांच्या असाधारण यशाची कहाणी असणार आहे. यात कंगना मुख्य भूमिकेत आहे. हा चित्रपट मनोज तपाडिया यांनी लिहिला आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शनही मनोजच करणार आहेत. ■



### सेटवर रहमानसारखाच वागायचा अक्षय

**मुंबई** : गेल्या महिन्याभरापासून 'धुरंधर' चित्रपटाने प्रेक्षकांना अक्षरशः वेड लावले आहे. त्यातही मुख्य नायक रणवीरसिंहपेक्षा खलनायकाच्या भूमिकेतील अक्षय खन्ना भाव खाऊन गेला. त्याला सर्वाधिक प्रसिद्धी मिळते आहे. पण, तो स्वतः त्याविषयी हुरळून गेलेला नाही. तो कोणत्याही प्रमोशनला आला नाही किंवा चित्रपटाच्या यशानंतर त्याने मुलाखतीही दिल्या नाहीत. तो पूर्वीप्रमाणेच शांत आहे. विशेष म्हणजे, चित्रीकरणाच्या वेळीही त्याचे वागणे असेच शांत, धीरगंभीर होते. या चित्रपटातील सहकलाकार नवीन कौशिकने सांगितले की, अक्षय सेटवरही इतर लोकांपासून अंतर ठेवून राहायचा. तो स्वतःमध्ये इतका गुंग असायचा की, सेटवरील गोंधळापासून दूर असायचा. रहमान डकैतचे पात्र जसे शांत होते, तसाच तो सेटवर राहायचा. रहमान शांत असला तरी, कधी काय करेल काही सांगता यायचे नाही. तसाच अक्षय असायचा. आम्ही बोललो तर तो प्रेमाने गप्पा मारायचा आणि थोड्या वेळात पुन्हा स्वतःमध्येच रमून जायचा. ■



# भारत बनला सर्वांत मोठा तांदूळ उत्पादक

◆ **नवी दिल्ली, ६ जानेवारी**

भारताने चीनला मागे टाकत एक नवीन टप्पा गाठला आहे. भारत सर्वांत मोठा तांदूळ उत्पादक झाल्याची घोषणा अलिकडेच केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी एका कार्यक्रमात केली.

**चीनला टाकले मागे**

शिवराजसिंह चौहान यांनी सांगितले की, तांदूळ उत्पादनात भारताने चीनला मागे टाकले आहे. भारताचे एकूण उत्पादन १५१.८ दशलक्ष टन आहे. एकेकाळी अन्नाची कमतरता असलेला भारत आता जागतिक अन्न पुरवठादार बनला आहे. ही एक अभूतपूर्व कामगिरी असल्याचे सांगून ते म्हणाले की, भारताचे तांदूळ उत्पादन चीनच्या १४५ दशलक्ष टनांच्या तुलनेत १५१.८ दशलक्ष टनांवर पोहोचले आहे. भारत आता जगभरातील बाजारपेठांना तांदूळ पुरवत आहे.

कार्यक्रमाला संबोधित करताना चौहान म्हणाले की, देशाने उच्च उत्पादन देणारे बियाणे विकसित करण्यात लक्षणीय यश मिळवले आहे. १९६९ मध्ये राजपत्र अधिसूचना प्रक्रिया सुरू झाल्यापासून, तांदूळ, गहू, ज्वारी, मका, डाळी, तेलबिया आणि फायबर पिकांसह एकूण ७,२०५ पीक वाण अधिसूचित करण्यात आले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने १९६९ ते २०१४ दरम्यान अधिसूचित केलेल्या ३,९६९ च्या तुलनेत ३,२३६ उच्च उत्पादन देणाऱ्या वाणांना मान्यता दिली आहे. ◂(वृत्तसंस्था)



### १८४ नवीन वाण उपलब्ध

» **चौहान यांनी २५ पिकांचे १८४ नवीन वाण उपलब्ध केले. त्यांनी सांगितले की, नवीन उच्च उत्पादन देणाऱ्या बियाण्यांच्या वाणांमुळे पीक उत्पादन वाढेल आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न लक्षणीयरीत्या वाढेल. त्यांनी मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांना नवीन वाण शेतकऱ्यांपर्यंत लवकर पोहोचतील याची खात्री करण्याचा निर्देश दिला.** ■

### मादकपदार्थांचा पुरवठा; तस्कराला अटक

**नवी दिल्ली** : साड्यांच्या व्यवसायासोबतच मादक पदार्थांची तस्करी करणाऱ्या एका व्यक्तीला येथे अटक करण्यात आली आहे. तो हिमाचल प्रदेशातून दिल्लीसह विविध राज्यांमध्ये चरसचा पुरवठा करत होता, अशी माहिती एका अधिकाऱ्याने मंगळवारी दिली. पोलिसांनी त्याच्या ताब्यातून २.५ किलोहून अधिक मादकपदार्थ जप्त केले आहेत. आरोपी जमाल अख्तर अन्सारी असे त्याचे नाव असून, तो ठाण्याचा रहिवासी आहे. त्याला पूर्व दिल्लीतील अक्षरधामजवळून अटक करण्यात आली. ■

## अग्रलेख...

# चढता 'पारा' आणि घसरती 'पातळी'!

कृत्रिम बुद्धिमत्ता नावाच्या नव्या क्रांतीने जीवनाची सारी अंगे एवढ्या झपाट्याने ग्रासून टाकली आहेत की त्यामुळे एखाद्या प्रामाणिक वास्तवावरही प्रश्नचिन्हे उमटू लागली असून खोट्यावर मात्र लगेच विश्वास बसावा अशी वेळ आल्याचे दिसू लागले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे दुधारी हत्यार असून, त्याचा वापर विवेकाने झाला नाही तर त्यामुळे मोठी हानी होण्याची शक्यता आहे, असा इशारा या क्रांतीच्या पाऊलखुणा उमटत असतानाच अनेकांनी दिला होता. जगभरातील अनेक देशांत याची गांभीर्याने दखलही घेतली गेली होती आणि या शस्त्राचा वापर करण्यासाठी जगाने स्वतःवर काही नैतिक बंधने घालून घेतली पाहिजेत असा आग्रहदेखील झाला होता. त्याची गरज आता तीव्र होऊ लागली आहे. विशेषतः माध्यमविश्वात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढू लागल्यापासून माध्यमांच्या प्रतिष्ठेचा आणि प्रामाणिकपणाचा प्रश्नच ऐरणीवर येऊ लागला आहे आणि आपण जी माहिती प्रसृत करतो त्याचे स्रोत वास्तविक आहेत किंवा नाही हे शोधणे प्रत्यक्ष माध्यमांनादेखील अवघड होऊ लागल्याने आपल्या प्रतिष्ठेवरील प्रश्नचिन्हे पुसून टाकणेदेखील सोपे राहिलेले नाही. समाजमाध्यमांवर कृत्रिम बुद्धिमत्तेचा एवढा सुळसुळाट झाला आहे की या मंचावरून प्रसृत होणाऱ्या कोणत्याही बातमीवर किंवा माहितीवर अगोदर अविश्वासच दाखविला जाऊ लागला असून या माहितीची किंवा बातमीची शहानिशा केल्याखेरीज त्याची सत्यता स्वीकारण्याची मानसिकताच कमी होऊ लागली आहे. त्यामुळे, सामान्य समाजात गैरसमज पसरवून समाजाची फसवणूक करण्याकडेच या माध्यमांचा वापर होत असल्याचेही दिसू लागले आहे. संवैधानिक किंवा अधिकृत सत्तेच्या पलीकडे, आतून कार्यरत असलेल्या अदृश्य सत्ताकेंद्रांच्या कारवाया, म्हणजे ज्यास जगभर 'डीप स्टेट' असे म्हटले जाते, त्यांचा सत्तेवर अप्रत्यक्ष प्रभाव असतो, अशा संकल्पनेत कोणतेही निर्णय गुप्तपणे घेतले जातात व कोणते निर्णय कोण घेते हे कधीच समजत नाही. सामान्यांच्या जगात यास षडयंत्र असेही म्हटले जाते. डीप स्टेट आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचे असे हातात हात घालून चालणे सुरू झाल्यापासून षडयंत्रांची संकल्पना तंत्रज्ञानाशी जोडली गेली असून समाजमाध्यमांवर काय दिसावे, काय दाखविले जावे यावरही या संकल्पनेचा प्रभाव दिसू लागला आहे. जनमताची दिशा प्रभावित करण्यासाठी या संकल्पनेचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागल्याने, समाजमाध्यमांवरून प्रसारित होणाऱ्या बातम्या किंवा माहितीची विश्वासार्हता संपत चालली असून त्याचा फटका एकूणच माध्यमविश्वालाही बसू लागल्याने, माध्यमेदेखील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारावर परसरविल्या जाणाऱ्या संभ्रमाचे बळी ठरतील अशी भीती दिवसेंदिवस गडद होत चालली आहे. म्हणूनच, आजकाल माध्यमविश्वातील मुख्य प्रवाहांकडून कमाल सावधगिरी बाळगली जात असावी.

सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात, विशेषतः महापालिका निवडणुकांच्या रणधुमाळीत, प्रचाराचा पारा तापलेला असताना, प्रचाराची पातळी मात्र घसरत चालली असून, त्यात भर म्हणून समाजमाध्यमांवरून पसरणाऱ्या माहितीबाबतही असेच काहीसे होऊ लागले आहे. अन्यथा, ज्या बाबींची स्पष्ट शहानिशा करणे अनेक मार्गांनी सोपे आणि शक्य असते, अशा माहितीची जबाबदारी घेण्याऐवजी त्याच्या सत्यासत्यतेच्या खात्रीपासून स्वतःस अलिप्त ठेवण्याचा कल वाढीस लागलेला दिसला नसता. महापालिका निवडणुकांमध्ये अनेक मतदारसंघांतील उमेदवारांकडून सुरू झालेले माघारनाट्य आणि त्यामुळे अनेक महापालिका मतदारसंघांत उमेदवारांची बिनविरोध निवड झाल्याच्या समाजमाध्यमांवरून झपाट्याने फैलावणाऱ्या बातम्यांचेही तसेच काहीसे होत आहे. याला कांगावा म्हणायचे की संभ्रम पसरविण्याचे जाणीवपूर्वक सुरू असलेले प्रयत्न म्हणायचे याचे उत्तर यथावकाश मिळेलच, पण या बातम्यांची शहानिशा करण्याचे कायदेशीर मार्ग उपलब्ध असतानाही, त्याचा पाठपुरावा न करता समाजमाध्यमांवरील चर्चांना प्रसिद्धी देणे हा संभ्रम माजविण्याच्या स्पर्धेस खतपाणी घालण्याचाच प्रकार आहे, असे म्हणावे लागेल. दोन-तीन दिवसांपूर्वी, जेव्हा मुंबईत शिवसेनेचा ठाकरे गट, राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना व शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस या नव्या आघाडीचा निवडणूक जाहीरनामा प्रसारित होत होता, त्याच दरम्यान उमेदवारांच्या माघारनाट्याच्या गूढाचे पदर काहीसे उकलणारी व समाजमाध्यमांवरून माजविल्या जाणाऱ्या बिनविरोध निवडणुकांच्या गदारोळास वेगळीच कलाटणी देणारी एक ध्वनिफीत समाजमाध्यमांवरून सर्वत्र फैलावत होती. ठाकरे गटाच्या शिवसेनेकडून उमेदवारी दिल्या गेलेल्या व अर्जांच्या छाननीत वैध ठरलेल्या एका उमेदवारास उमेदवारी मागे घेण्याचा आदेश पोहोचविणाऱ्या या संभाषणातून सध्याच्या गदारोळाभोवतीचे गूढ अधिकच गडद झाले. सत्ताधारी महायुतीच्या विरोधातील उमेदवारांनी त्यांची उमेदवारी मागे घ्यावी व महायुतीच्या उमेदवाराचा विजय सोपा व्हावा यासाठी सत्ताधाऱ्यांकडून दबावतंत्र आणि दामभेदाचा वापर केला जात असल्याचा आरोप विरोधकांकडून, विशेषतः ठाकरे गटाकडून होत असताना, याच गटाच्या एका उमेदवाराने आपली वैध ठरलेली उमेदवारी मागे घ्यावी यासाठी श्रेष्ठींचा आदेश असल्याचा निरोप पोहोचविणारे ते संभाषण समाजमाध्यमावरून प्रसृत झाले आणि सत्ताधारी महायुतीवरच केल्या जाणाऱ्या आरोपाआड दडलेल्या शंका गडद झाल्या. एक तर, उमेदवारी मागे घेण्याकरिता पैसे देऊन दबाव आणून उमेदवारांस विकत घेतले जात असल्याचा आरोप करणारे ठाकरे गट किंवा काँग्रेससारखे राजकीय पक्ष, आपल्याच उमेदवारांच्या पक्षनिष्ठेवर शंका उपस्थित करत असून पैशाच्या मोहापायी आपले उमेदवार आपल्या पक्षनिष्ठा विकत असल्याची सांगत आपले उमेदवार विकाऊ आहेत, याची कबुली देत आहेत. ठाकरे गटाचा एक नेता आपल्या उमेदवारांस माघार घेण्याचे आदेश देत असल्याची शहानिशा न केलेली ती ध्वनिफीत प्रसृत होऊ लागल्याने, दामभेदाचा प्रभाव उमेदवारांवर पडला, की माघारनाट्यात भरडले गेल्याचा कांगावा करणाऱ्या पक्षांच्या नेत्यांवर पडला याविषयीच्या संशयाचे ढग गडद झाले आहेत.

विरोधकांच्या गोटातील उमेदवारांनी माघार घेतल्याने राज्यातील महापालिकांतील वेगवेगळ्या ६८ मतदारसंघांतील निवडणूक बिनविरोध होणार असल्याची ओरड विरोधकांकडून सुरू झाल्याने निवडणुकांचा पारा चढला असला, तरी याच मुद्यावरून सुरू झालेल्या प्रचारयुद्धाची पातळी मात्र घसरत चालल्याचे दिसू लागले आहे. रविवारी राज ठाकरे व उद्धव ठाकरे यांच्या पत्रकार परिषदेत असेच काहीसे पाहावयास मिळाले. २५ वर्षे मुंबई महापालिकेची सत्ता असताना आजही मराठी माणसाच्या आणि मुंबईला वाचविण्याच्या मुद्यावरच ठाकरे बंधू निवडणुका लढवत असतील, तर २५ वर्षांत यासाठी काय केले, या प्रश्नावरील उद्धव ठाकरे यांच्या उत्तरातून पातळीची घसरण स्पष्ट होते. त्याखेरीज, मुंबई भाजपाच्या एका नेत्याच्या आडनावावरून वारंवार कोटी करत त्या नावाची कुचेष्टा करण्याच्या उद्धव ठाकरे यांच्या विनोदातूनही प्रचाराच्या पातळीचा स्पष्ट अंदाज येतो. भ्रष्टाचार, मुंबईसारख्या बलाढ्य महापालिकेतील सत्ताकाळात केलेल्या कामांचा तपशील, विकाऊ उमेदवारांच्या आवईचे फुटत चाललेले बिंग आदी अनेक प्रश्न आता तापलेल्या प्रचारयुद्धात पुढे येणार असताना, अचानक उद्धव ठाकरे यांचा घसा बसल्याच्या बातम्याही येऊ लागल्या आहेत. या प्रश्नांची उत्तरे त्यांना द्यावी लागतील हे स्पष्ट असताना ठाकरे यांच्यावर मौन पाळण्याची वेळ यावी हा योगायोग मात्र बोलका म्हणावा लागेल. मतदारांत संभ्रम माजविण्याचे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावाखालील माध्यमी मंचांचा आधार घेत कांगावा करण्याचे प्रकार नवे राहिलेले नाहीत. मतदारांच्या दुबार नोंदींच्या मुद्यावरून संभ्रम माजविण्यापासून त्याची सुरुवात झाली आहे. प्रतिज्ञापत्राद्वारे किंवा कायदेशीर प्रक्रियेद्वारे हे आरोप करण्याच्या आव्हानाकडे दुर्लक्ष करून समाजमाध्यमांचा वापर करत संभ्रम माजविण्याचा प्रकार सुरू झाला. पातळी घसरविण्याची ही स्पर्धा अशी सुरू असताना, त्या घसरगुंडीवरून किती घरंगळत जायचे, याचे तारतम्य समाजाने बाळगायला हवे, हेच खरे!

## विशेष

प्रा. सुखदेव बखळे

# रस्तेबांधणीचा नवा विक्रम

भारताचे रस्ते जाळे आता ६३ लाख कि.मी.पेक्षा जास्त पसरले आहेत. त्यामुळे ते जागतिक स्तरावर सर्वांत मोठ्या जाळ्यांपैकी एक बनले आहे. यामध्ये राष्ट्रीय महामार्ग प्रणाली २०१३-१४ मधील सुमारे ९१ हजार २८७ कि.मी.वरून मार्च २०२५ पर्यंत अंदाजे १ लाख ४६ हजार २०४ कि.मी.पर्यंत विस्तारली आहे. ही वाढ सुमारे ६० टक्के आहे. या टप्प्यातील विकास केवळ जाळ्याच्या लांबीवरच नव्हे, तर लांब पल्ल्याचा प्रवास आणि मालवाहतुकीला आधार देण्यासाठी वेगवान कॉरिडॉर आणि द्रुतगती मार्गांवरही केंद्रित होता. २०२५ पर्यंत मोठ्या, बहुवर्षीय महामार्ग कार्यक्रमांनी जाळ्याच्या वाढीला आधार दिला. भारतमाला टप्पा-१ अंतर्गत २६ हजार कि.मी.पेक्षा जास्त अंतराच्या प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी जवळपास १९ हजार ८०० किलोमीटरचे बांधकाम आतापर्यंत पूर्ण झाले आहे. हे प्रकल्प आर्थिक कॉरिडॉर, बंदरे आणि सीमा जोडणारे मार्ग तसेच औद्योगिक क्षेत्रांना जोडणाऱ्या मार्गांपर्यंत पसरले आहेत. या कार्यक्रमांतर्गत ४.९ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च झाला आहे. तो विस्ताराच्या या टप्प्यातील भांडवली गुंतवणुकीची व्याप्ती अधोरेखित करतो. यासोबतच प्रवेश-नियंत्रित 'ग्रीनफिल्ड कॉरिडॉर'चाही वेगाने विस्तार झाला आहे. एक दशकापूर्वी १०० कि.मी.पेक्षा कमी द्रुतगती मार्ग होते; त्याऐवजी आता भारतात प्रमुख शहरे आणि औद्योगिक केंद्रांना जोडणारे हजारो कि.मी.चे वेगवान कॉरिडॉर आहेत. ते लांब पल्ल्याच्या रस्ते प्रवासात एक संरचनात्मक बदल दर्शवतात.

अलिकडच्या वर्षांमध्ये महामार्ग विकासाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे अंमलबजावणीचा वेग. २०१० च्या दशकाच्या सुरुवातीपासून बांधकामाचा सरासरी वेग दुप्पट झाला आहे. तो दररोज सुमारे ११-१२ कि.मी.वरून अलिकडच्या वर्षांमध्ये ३० कि.मी.पेक्षा जास्त झाला आहे. सुधारित निविदा प्रक्रिया, जलद मंजुरी, डिजिटल देखरेख आणि सातत्यपूर्ण भांडवली पाठिंब्याने या बदलाला हातभार लावला आहे. राज्यांनीही स्वतःचे महामार्ग आणि द्रुतगती मार्गांचे प्रकल्प हाती घेतले आहेत. ते राष्ट्रीय कॉरिडॉरला पूरक ठरत आहेत. वाहतुकीचा वेळ आणि लॉजिस्टिक्स खर्च कमी करण्यासाठी बंदरे, विमानतळ, लॉजिस्टिक्स पार्क आणि औद्योगिक क्लस्टरना जोडणाऱ्या मार्गांना वाढते प्राधान्य दिले जात आहे. महामार्ग आणि द्रुतगती मार्गांच्या विस्तारामुळे रस्ते वापरकर्ते आणि व्यवसायांना प्रत्यक्ष फायदे झाले आहेत. रुंद रस्ते आणि प्रवेश-नियंत्रित मार्गांमुळे प्रवासाचा वेळ कमी झाला आहे. इंधनाची कार्यक्षमता सुधारली आहे आणि वाहनांचा परिचालन खर्च कमी झाला आहे. जुन्या, अरुंद महामार्गांच्या तुलनेत सुरक्षिततेच्या बाबतीतही सुधारणा झाली आहे. देशभरातील वाहतुकीवर रस्ते वाहतुकीचे वर्चस्व कायम आहे. ती ६४ टक्क्यांहून अधिक मालवाहतूक आणि सुमारे ९० टक्के प्रवासी वाहतूक करते.



२०२५ हे वर्ष रस्ते पायाभूत सुविधांचा वापर आणि वित्तपुरवठा करण्याच्या पद्धतीतील बदलाचेही साक्षीदार ठरले. फास्टॅगद्वारे इलेक्ट्रॉनिक टोलिंगने मॅन्युअल टोल वसुलीची जागा घेतली आहे. त्यामुळे टोल प्लाझावरील गर्दी कमी झाली असून वाहतूक सुरळीत झाली आहे. डिजिटल टोलिंगमुळे महसूल संकलन आणि पारदर्शकता आली आहे. त्यामुळे देखभाल आणि भविष्यातील विस्ताराला मदत झाली आहे. अडथळामुक्त टोलिंग प्रणालीच्या दिशेने कामाला गती मिळाली. त्यात वाहनांना न थांबता किंवा वेग कमी न करता टोल नाक्यांवरून जाण्याची परवानगी देणाऱ्या 'मल्टी-लेन फ्री-फ्लो मॉडेल्स'चा समावेश आहे. या वर्षातील महामार्ग विस्तारामध्ये अधिक व्यापक भौगोलिक विस्तार दिसून आला. ईशान्येकडील प्रदेशातील प्रकल्पांमुळे दुर्गम भागांना राष्ट्रीय जाळ्याशी जोडून कठीण भूभागात कनेक्टिव्हिटी वाढविली गेली. त्याच वेळी ग्रामीण रस्ते योजनांनी शेवटच्या टप्प्यापर्यंतची कनेक्टिव्हिटी वाढविणे सुरू ठेवले. त्यामुळे लहान शहरे आणि गावांमध्ये बाजारपेठा, आरोग्यसेवा आणि शिक्षणापर्यंतची पोहोच सुधारली. पुढील वाटचाल प्रगतीच्या मोठ्या प्रमाणावर असूनही २०२५ मध्ये आव्हाने कायम होती. भूसंपादन विलंब, पर्यावरणीय मंजुरी आणि विविध संस्थांमधील समन्वयाच्या अभावामुळे काही प्रदेशांमध्ये प्रकल्पांच्या वेळापत्रकावर परिणाम होत राहिला. या मर्यादांवर मात करण्यासाठी रस्ते विकास, लॉजिस्टिक्स, रेल्वे आणि शहरी पायाभूत सुविधा एकत्रित करणाऱ्या नियोजन साधनांचा वापर वाढविला जात आहे. २०२५ हे वर्ष संपले असताना, रस्ते आणि महामार्ग विकास भारताच्या पायाभूत सुविधांच्या विकासाचा एक मुख्य आधारस्तंभ म्हणून उभा आहे. विखुरलेल्या मार्गांवरून एका समन्वित, उच्च-क्षमतेच्या जाळ्याकडे होणारे संक्रमण हे आर्थिक वाढीला चालना देण्यासाठी, लॉजिस्टिक्स खर्च कमी करण्यासाठी आणि देशभरातील दैनंदिन गतिशीलता सुधारण्यासाठी केलेल्या दीर्घकालीन प्रयत्नांचे प्रतिबिंब आहे. २०२५ हे वर्ष महामार्ग क्षेत्रासाठी एक पुनर्रचनेचे वर्ष ठरले. चालू आर्थिक वर्षात कंत्राट वाटप आणि बांधकामाच्या उद्दिष्टांवर थोडा परिणाम झाला. आणखी एक बदल म्हणजे व्यापक विचारविनिमयानंतर मालमत्ता मुद्रीकरण धोरणाला अंतिम रूप देण्यात आले.

२०२४ मधील सार्वत्रिक निवडणुकांमुळे मागील आर्थिक वर्षात भांडवली खर्च कमी राहिला होता. या वर्षासाठी महामार्ग बांधणीचे लक्ष्य १० हजार किलोमीटर ठेवण्यात आले आहे, तर गेल्या आर्थिक वर्षात १० हजार ६६० कि.मी.चे लक्ष्य साध्य झाले होते. साधारणपणे आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीमध्ये बांधकाम आणि मंजुरीचा वेग वाढतो. आर्थिक वर्ष २०२६ मध्ये रस्ते बांधणीचा वेग कमी होऊन ९,०००-९,५०० किलोमीटर (सुमारे २५-२६ किमी/दिवस) होईल, जो आर्थिक वर्ष २०२५ मधील १०,६६० किलोमीटरच्या बांधकामापेक्षा कमी आहे. मंत्रालयाने भूसंपादन आणि पर्यावरण मंजुरीच्या समस्यांवर लक्ष केंद्रित केल्यामुळे आर्थिक वर्ष २०२६ च्या दुसऱ्या सहामाहीत मंजुरीच्या कामात वाढ होण्याची शक्यता आहे, असे 'आयसीआरए'चे म्हणणे आहे. नोव्हेंबर २०२३ मध्ये सरकारने भारतमाला प्रकल्पांतर्गत नवीन प्रकल्पांना मंजुरी देणे थांबवून 'ग्रीनफिल्ड एक्सप्रेस वे'वर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला. सध्या देशभरात १० हजार कि.मी. लांबीच्या २५ ग्रीनफिल्ड एक्सप्रेसवेवर ६ लाख कोटी रुपये खर्चाचे काम सुरू आहे. तिसऱ्या कार्यकाळात सरकारने १.९७ लाख कोटी रुपयांच्या रस्ते प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. त्यात ग्रामीण रस्ते आणि ९३६ कि.मी. लांबीच्या आठ हाय-स्पीड रस्ते प्रकल्पांचा समावेश आहे. उच्च-गती द्रुतगती मार्ग भांडवल-केंद्रित असतात आणि त्यापैकी बहुतेक प्रकल्प खाजगी क्षेत्राद्वारे 'बिल्ड ऑपरेट ट्रान्सफर' पद्धतीने कार्यान्वित केले जातील. प्रकल्प आकर्षक बनवण्यासाठी सवलत करारामध्ये आणखी बदल करण्यावर काम सुरू आहे. गेल्या आर्थिक वर्षात 'बोट' पद्धतीने ३०० कि.मी. महामार्गांची कामे मंजूर करण्यात आली होती; परंतु या वर्षी या पद्धतीद्वारे महामार्गांच्या विकासासाठी कोणतेही प्रकल्प देण्यात आलेले नाहीत.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

विजय निचकवडे

# राजकारणाचा भूलभुलैया...

अगदी सहज आणि सोप्या पद्धतीने ज्यात प्रवेश मिळतो, ते क्षेत्र म्हणजे राजकारण! मग तुमची खरी कसोटी लागते! प्रवेश सोपा असला तरी, मग इच्छा असूनही त्यातून बाहेर पडणे कठीण होते. राजकारणाचा हा आधुनिक भूलभुलैया आठवण करून देतो, तो लखनौच्या बडा इमामवाडा या ऐतिहासिक वास्तूतील भूलभुलैयाची! आजच्या राजकारणाची अवस्थाही याच भूलभुलैयासारखीच झालीय, हे तर मान्यच करावे लागेल!

बहुतेकांनी लखनौच्या भूलभुलैया या वास्तूला भेट देत वास्तुकलेच्या चमत्काराचा अनुभव नक्कीच घेतला असेल! काय आहे हा भूलभुलैया... तर नवाब आसफउद्दौला याने १९७५ साली बांधलेली ही वास्तू. बडा इमामवाडा या ऐतिहासिक वास्तूचा एक भाग, म्हणजेच जाळीदार प्रवेशद्वार! अनेक गुप्त मार्ग, अनेक दरवाजे, कान असलेल्या भिंती, आवाज आणि प्रतिध्वनींचा खेळ असे सर्व काही या वास्तूत अनुभवास मिळते. कुठला मार्ग कुठे जाणार आणि कुठे निघणार, याचा जराही अंदाज लावता येत नाही. येथे प्रवेशाचा मार्ग तर दिसतो, पण परतीचा मार्गच सहजासहजी सापडत नाही! हा सगळा जो गोंधळ आहे, तो म्हणजे भूलभुलैया! आता या भूलभुलैयाचा आणि राजकारणाचा काय संबंध? असा विचार नक्कीच तुम्हाला पडला असेल, पण सध्या जी राजकारणाची अवस्था झाली आहे, ती अशीच काहीशी आहे.



आजचे राजकारण लखनौच्या भूलभुलैयापेक्षाही एक पाऊल पुढे आहे. किमान तेथे बाहेर काढण्यासाठी कुशल 'मार्गदर्शक' सोबत असतो, येथे तर सोबत असलेलाच आणखी गोंधळात कसे टाकता येईल, याच्या नियोजनात व्यस्त असतो. जसे भूलभुलैयात कुठला मार्ग कुठे जातो, हे ओळखणे कठीण आहे, तसेच राजकारणातही विचारधारा ओळखणे अवघड होऊन बसले आहे. निष्ठा, प्रामाणिकपणा हे शब्द राजकारणाच्या शब्दाकोशात असावेत की नाही यावर नक्कीच चर्चा होऊ शकते. एक काळ होता, जेथे पक्षासाठी सर्वस्व त्यागून झटणारे कार्यकर्ते होते. आता तिकीट मिळावे म्हणून पक्ष त्यागून विचारधारेचा खेळ करणारेच सापडतात. वर्षानुवर्ष सोबत काम करणारा कार्यकर्ताही क्षणात विचारधारा बदलून दुसरीकडे उडी घेतो, तेव्हा न गवसणाऱ्या भूलभुलैयातील रस्त्यांची आठवण होते. राजकारणात अनेक मोठमोठाली स्वप्ने घेऊन लोक येतात. प्रत्येकाचे ध्येय हे सत्ता, पद हेच असतं. अपेक्षा पूर्ण न झाल्यास एका पक्षातून दुसरीकडे उडी मारून इच्छापूर्तीचा प्रयत्न केला जातो, मात्र राजकारणाच्या या भूलभुलैयातून अशांना बाहेर पडण्याचा मार्ग सापडत नाही, हे नक्की! भूलभुलैयात जसे भिंतीला कान असतात, असे म्हणतात. जराही पुटपुटलो तरी दुसऱ्या टोकावर ऐकायला जातं, तसेच राजकारणातही तुम्ही कुठल्याही पक्षात का असेनात तुम्ही काय आणि कुणाबद्दल बोलता याची इत्थंभूत माहिती दुसरीकडे पोहोचविणारे कान आहेत. नाहीतर घराच्या बेडरुममध्ये बसून असलेल्या नेत्यांचे व्हिडीओ, महत्त्वाच्या विषयांवरील चर्चा बाहेर जाऊन दुसऱ्यांना राजकारण करण्याची संधी मिळालीच नसती ना?

अनेक मार्गांनी, विविध दरवाजांमधून फिरून शेवटी एकाच ठिकाणी पर्यटकांना आणून ठेवणारी वास्तू म्हणजे भूलभुलैया! राजकारणही तसेच... विकासाच्या नावाने सत्तेच्या केंद्रास्थानापर्यंत पोहोचण्याचा हा चांगला मार्ग आहे. दोन भाऊ, त्यांचे दोन राजकीय पक्ष एकत्र आल्याचा आनंद साजरा करीत नाचणारे आनंदोत्सवाच्या १२ तासांनंतर विकासाची 'री' ओढीत सत्ताधारी पक्षात प्रवेश करीत असतील तर ही जादू सुद्धा भूलभुलैयाचीच म्हणावी लागेल. आज एका पक्षासोबत असला तरी खरंच तो त्याचा आहे का? याची खातरजमा करण्याची वेळ आली आहे. निष्ठा, प्रामाणिकपणा या गोष्टी इतिहासजमा होत, राजकारणात नेत्यांची वाहवा, त्यांच्या मागेपुढे फिरणे आणि आर्थिक कसोट्यांवर मिळणारे गुण अशा निकषांचे महत्त्व वाढले आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात आज जे चित्र आहे, ते राजकारणाच्या आधुनिक भूलभुलैयाचे आहे. एकीकडे प्रचंड ओढा आणि दुसरीकडे चोळामोळा अशी अवस्था नगर पालिका, महानगर पालिकांच्या निवडणुकांच्या निमित्ताने दिसून आली... हे का? तर राजकारणाच्या झालेल्या भूलभुलैयामुळे! या राजकीय भूलभुलैयात नेते मंडळी इच्छितस्थळी पोहोचतीलही पण सामान्य कार्यकर्त्यांचे काय? त्यांना यातून बाहेर काढणारा 'गाईड' त्यांच्या पाठीशी आहे का? याचा विचार त्यांनीच करावा! कारण लखनौचा भूलभुलैया तर केवळ मनोरंजन आहे, पण राजकीय भूलभुलैया आयुष्याच्या चांगल्या, वाईटाची दिशा स्पष्ट करणारा आहे.

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

प्रा. दिलीप जोशी

# वामन पुराण

भगवान विष्णूंचा पुढील अवतार हा वामन अवतार आहे. ज्या पुराणात वामन अवताराचे प्राधान्याने वर्णन आहे त्या पुराणाला वामन पुराण म्हणतात. वामन अवतार हा मागील अवताराची पुढील कडी आहे. जलचर, उभयचर, भूचरसोबतच पशू, अर्ध मनुष्य, अर्ध पशू आता हा अवतार. मनुष्य पण उंचीने कमी म्हणून वामन असा हा अवतार आहे.

वामन भगवान हे त्रिविक्रम विष्णूंचे पाचवे अवतार. वामन पुराण विष्णू भगवंतांच्या अवताराचे गुणगान करीत असल्यामुळे हे वैष्णव पुराण असले, तरी या पुराणात शिव कथांचे प्राबल्य आहे. शैव आणि वैष्णवांची सांगड घालणारे हे पुराण आहे. उपलब्ध वामन पुराणाचे एकूण ९५ अध्याय असून श्लोकसंख्या ५७९२ आहे. वामन पुराणाच्या प्रारंभीच भगवान वामन यांना नमन आहे.

**'त्रैलोक्यराज्यमाक्षिप्य बलेरिंद्राय यो ददौ ।**
**श्रीधराय नमस्तस्मै छद्मवामनरुपिणे ॥'**

वामन पुराण पुलस्त्य ऋषी आणि नारद संवादाने सुरू होते. एकदा पुलस्त्य ऋषी निवांत बसले असता देवर्षी नारद तेथे आले. त्यांनी पुलस्त्य ऋषींना भगवान वामन यांच्याविषयी सांगण्यास विनंती केली. त्यानुसार पुलस्त्य ऋषींनी नारदांना हे पुराण सांगितले... हिरण्यकश्यपूचा वध भगवान नृसिंह यांनी केल्यावर दैत्य गादीवर प्रल्हाद यांचा राज्याभिषेक झाला. प्रल्हादांना विरोचन नावाचे पुत्र झाले. या दैत्यराज विरोचनाच्या पोटी बली जन्माला आले.

**'दैत्यानामादिपुरुषो हिरण्यकश्यपूः पुरा ।**
**तस्य पुत्रो महातेजाः प्रल्हादो नाम दानवः ।**
**तस्माद् विरोचने जज्ञे बळीर्जज्ञे विरोचनात् ।'**

यावरून विष्णुभक्त प्रल्हादांचे नातू असलेले बळीराजा होत. बळीराजाचा पुत्र बाणासुर होता. बळीचे सामर्थ्य म्हणजे पराक्रमाने स्वर्गावर अधिपत्य मिळवून स्वतः बळीराजा इंद्र झाला; त्याचा पुत्र बाण यम झाला. मयासुर वरुण, राहू चंद्र, ल्हाद अग्नी आणि शुक्राचार्य बृहस्पती झाले. बळीराजा भक्ती आणि शक्तीचा संगम होते. बळीराजाने आपल्या शक्ती आणि पराक्रमाने देवांना पिटाळून लावले. तिन्ही लोकांवर विजय मिळविला.

**'शक्रोभूद् भगवान ब्रह्मन बली बाणो यमो भवत् ।**
**इवरुणो भुन्मयः सोमो राहूल्हादों हुतशनः ॥'**

विशेष म्हणजे राज्य दैत्यांचे असले, तरी सर्वत्र धर्म राज्य होते. देवी महालक्ष्मी बळीराजावर प्रसन्न होती. देवगण मात्र बेघर झालेत. देवराज इंद्र चिंताग्रस्त होऊन माता अदिती आणि कश्यप ऋषींकडे गेले. आपली व्यथा त्यांना सांगितली. कश्यपांनी स्पष्ट सांगितले की, बळीराजाचा पराभव देवांकडून होणे केवळ अशक्य आहे. अशावेळी कश्यप अदिती देवगण आणि ब्रह्मदेवासह भगवान विष्णूंकडे गेले. त्यांनी क्षीरसागर काठी भगवंतांचे स्त्रोत्र गायन सुरू केले.

**'नमः पंकजनेत्राय नमः पंकजनाभये ।**
**नमः पंकजसंभूतिसंभवायात्मयोनये ॥'**

भगवान विष्णू प्रसन्न होऊन बळीराजाच्या उपाययोजनेसाठी मी कश्यप-अदितीच्या पोटी वामन म्हणून जन्माला येईन, असे वचन दिले. भगवान विष्णू अदितीच्या गर्भात धारण होताच सर्व दैत्यांची शक्ती क्षीण झाली. राक्षसांचे अचानक अवमूल्यन का होत आहे, असा प्रश्न बळीराजाने आपले आजोबा प्रल्हादांना विचारला असता प्रल्हादांनी अंतःचक्षूंनी पाहिले. राक्षसांना परास्त करण्यासाठीच भगवान वामन जन्म घेणार आहेत. त्यामुळे आपली शक्ती क्षीण होत आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. तेव्हा दैत्यराज बली आपल्या आजोबा म्हणजे प्रल्हादांना म्हणाले की, आपल्या जवळ एकाहून एक दैत्य आहेत. आपण वामनांना परास्त करू. तेव्हा प्रल्हाद दैत्यराज बलीवर प्रचंड संतापले... ''अरे! सर्व ब्रह्मांड ज्याचा अंश आहे त्यांच्याविषयी तुझ्या मनात असा दुष्ट भाव असेल तर तुझाही नाश समीप आहे.'' तेव्हा बळीराजांनी आजोबाची क्षमा मागितली आणि भगवान विष्णूंप्रति शरणभाव ठेवला. अश्वमेघ यज्ञ प्रारंभ केला. इकडे माता अदितीच्या पोटात गर्भ वाढत होता.

**'ततो मासेऽथ दशमे काले प्रसव आगते ।**
**अजायत स गोविंदों भगवान वामनाकृतिः ॥'**

भगवान माता अदितीच्या पोटी वामन आकारात जन्माला आले. सर्वत्र आनंद दाटला. ब्रह्मदेवाने त्यांना मृगचर्म दिले. बृहस्पतींनी यज्ञोपवीत, मरीचींनी पलाशदंड, वशिष्ठांनी कमंडलू, अंगिरा ऋषींनी रेशमी वस्त्र, पुलस्त्य ऋषींनी पितवस्त्र दिले. वामन भगवंत जटा, दंड, छत्र, कमंडलू धारण करून ते बळीराजाच्या यज्ञस्थानी जाण्यास सिद्ध झाले. इकडे बळीराजाला दैत्यगुरू शुक्राचार्यांनी आधीच सावध केले. भगवान विष्णू वामन रूपात येत आहेत.

**'त्वयास्य दैत्याधिपते स्वल्पकेपि ही वस्तुनि ।**
**प्रतिज्ञा नैव वोढव्या वाच्यं साम तथा फलम् ॥'**

कोणतीही वस्तू देण्याचा संकल्प सोडू नको. प्रतिज्ञा करू नको. तेव्हा बळीराजा म्हणतात की, ''गुरुवर्य, ज्याच्याकडे जग याचना करते तो ईश्वर माझ्या दारात याचक बनून येत असेल तर त्याला मी नकार कसा देऊ?'' असा संवाद सुरू असतानाच प्रत्यक्ष वामन भगवान तिथे पोचले. बळीराजाने नमस्कार करून, काय सेवा करू? अशी विचारणा केल्यावर भगवान म्हणाले की, मला अग्निशाळेसाठी तीन पाऊले जमीन हवी! संकल्पपूर्तीसाठी बळीराजाने हातावर जल सोडून जलसिंचन केले. हातावर जल पडताच वामन भगवान अवामन झाले. विराट रूपाने त्यांनी ब्रह्मांड व्याप्त केले.

**'प्रणम्य च अर्शिन प्रथम क्रमेन ।' प्रथम पदन्यासात पृथ्वी व्याप्त केली.**
**'देवो द्वितीयेन जहार वेगात ।' द्वितीय पदन्यासात आकाश व्याप्त केले.**
**'क्रमं तृतीयं न यदास्य पूरितं ।'**

तिसऱ्या पावलासाठी जागा नसल्यामुळे दैत्यराज बळीच्या पाठीवर पाय ठेवून त्याला हजार योजने पृथ्वीत घातला. राक्षसांना परास्त केले. बळीराजावर कृपा करून त्याला सुतल नावाचे पाताळ निवासासाठी दिले. त्याला चिरकाल चिरंजीवित्व दिले. वचन दिल्याप्रमाणे इंद्राला त्याचे राज्य परत केले. वामन पुराणात वामन कथा अध्याय २३ ते ३१ आणि अध्याय ७३ ते ७८ यामध्ये दिली आहे. भगवान वामन कथाभागासोबत इतर अध्यायात भगवान शंकरांची कथा, दक्षयज्ञ, सतीचा प्राणत्याग, दक्षयज्ञ विध्वंस ही कथा दिली आहे. याच पुराणात नर नारायण उत्पत्ती, मदन दहन कथा आहे. हिरण्याक्ष पुत्र अंधकासुर, त्याचा देवांवर विजय. सुकेशीची कथा, २१ नरकांचे वर्णन, पर्वत-नद्यांचे वर्णन या पुराणात आहे. महिषासुर अत्याचार, भगवती कात्यायनीचे प्रकट होणे, चंड, मुंड, महिषासुर वध, कुरुक्षेत्र वर्णन, सरस्वती नदीचे वर्णन, राजा वेन चरित्र, पृथु राजाचा जन्म, वेनराजा कृत शिव स्तुती, ब्रह्मदेवाचे चार मुख उत्पत्ती कथा, हिमालय पत्नी मैनादेवीच्या पोटी तीन कन्यांचा जन्म, उमादेवीची तपश्चर्या, उमा-महेश्वर विवाह, विश्वकर्मा द्वारा उमा-शिव यांच्यासाठी गृह निर्माण हे विषय वामन पुराणात आले आहेत. भगवतीद्वारा नमुची वध, शुंभ-निशुंभ, धूम्रलोचन, चंडमुंड वध, भगवान कार्तिकेय जन्म, नंदीद्वारा हरी आणि हराचे अद्वैत. याशिवाय स्वायंभुव, स्वरोचिष, उत्तम, तामस, रैवत, चाक्षुष मन्वंतराच्या मरुद्गण उत्पती, कालनेमीचे भगवान विष्णूंशी युद्ध, कालनेमी वध, प्रल्हाद यात्रा, गजेंद्र मोक्ष कथा, विविध स्तोत्र इत्यादी बाबी वामन पुराणात आहेत.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### राजकीय घराण्यांची युवा पिढी मैदानात

राजकारण हे केवळ सत्ता मिळविण्याचे माध्यम न राहता, आता अनेक कुटुंबांसाठी वारसा बनत आहे. याची झलक महापालिका निवडणुकीत दिसून येत असून, अनेक बाप-बेटे निवडणुकीच्या रिंगणात नशीब आजमावत आहेत, तर काहींनी मुलाच्या विजयासाठी आपली प्रतिष्ठा पणाला लावली आहे. यानिमित्त नव्या-जुन्यांचा संगम दिसत असून, मतदार त्यांना साद घालणार काय? गेल्या काही दशकांपासून सक्रिय असलेल्या प्रस्थापित नेत्यांनी आपला वारसा पुढच्या पिढीकडे सोपविण्यासाठी त्यांना मैदानात उतरविले आहे. काही नेते स्वतः मुलाबरोबर निवडणूक रिंगणात नशीब आजमावत आहेत. नवी पिढी उच्चशिक्षित असल्यामुळे आधुनिक विचारसरणी घेऊन मैदानात उतरली आहे, तर जुन्या पिढीने आपला जनसंपर्क, संघटनात्मक ताकद आणि राजकीय अनुभव पणाला लावल्याचे दिसून येत आहे.

सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रचार, थेट संवाद आणि तरुण मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्नही त्यांच्याकडून केला जात आहे. दुसऱ्या पिढीतील उमेदवारांसमोर केवळ कुटुंबाच्या नावावर मते मिळवण्यापेक्षा स्वतःचे कर्तृत्व आणि विकासाची स्पष्ट दृष्टी सिद्ध करण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. ज्येष्ठ नेत्यांनी स्वतः बाजूला ठेवत आपल्या पुढच्या पिढीला संधी दिली आहे. परिणामी अनेक प्रभागांमध्ये पारंपरिक नेते आणि तरुण उमेदवारांमध्ये थेट लढत रंगण्याची शक्यता आहे. मतदार नवे नेतृत्व स्वीकारणार की अनुभवी हातांनाच संधी देणार हे लवकरच दिसेल.

**नितीन दुर्बुडे**/९५०३६४८६३०

### शालार्थ आयडी घोटाळ्यात नागपूर विभागात ६३२ नावे

शालार्थ वेतन प्रणाली व शिक्षक भरती घोटाळ्याच्या चौकशीत नागपूर विभागात ६३२ जणांची नावे समोर आली असली तरी मोठ्या प्रमाणावर अटक होण्याची शक्यता कमी असल्याचे अधिकृत सूत्रांचे मत आहे. ही नावे प्रशासकीय तपासणीत नोंदवली गेली असून, ठोस पुरावे, मनी ट्रेल व सक्रिय सहभाग आढळलेल्या मोजक्या प्रकरणांतच फौजदारी कारवाई होणार आहे. सरकारचा भर वेतन नोंदी स्वच्छ करणे, आर्थिक नुकसान वसूल करणे आणि प्रणालीगत सुधारणा करण्यावर असून, निवडक सूत्रधारांवरच कारवाई होण्याचे संकेत आहेत. शिक्षण क्षेत्रातील निरीक्षक आणि शिक्षक संघटनांनी शाळांतील मुख्याध्यापकांमध्ये वाढत चाललेल्या भीतीच्या वातावरणाकडे लक्ष वेधले आहे. त्यांच्या मते, तत्काळ अटकेची भीती प्रत्यक्षात वाढवून सांगितली जात असून ती अनेकदा अनौपचारिक इशारे व कायदेशीर सल्ल्यांच्या माध्यमातून पसरवली जात आहे. संघटनांचा आरोप आहे की, चौकशीभोवती असलेल्या अनिश्चिततेचा फायदा घेत काही वकील व खालच्या स्तरावरील अंमलबजावणी यंत्रणेतील मध्यस्थ प्राचार्य व मुख्याध्यापकांना त्रास देण्यासाठी किंवा आर्थिक तडजोडींसाठी दबाव टाकत आहेत. यातील अनेक जण दीर्घकाळापासून सामाजिक व व्यावसायिक प्रतिष्ठा लाभलेले शिक्षक आहेत.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

### हिंदूंसाठी धोक्याची घंटा!

महिनाभरापासून बांगलादेशातील जी परिस्थिती आहे ती हिंदूंसाठी दिवसेंदिवस अधिकच चिंताजनक होत चालली आहे. जीव मुठीत घेऊन तेथील हिंदू आज अस्तित्वासाठी धडपडताना दिसत आहेत. कधी काळी २० टक्के असणारी हिंदूंची संख्या आज २ टक्क्यांवर आली आहे. पाकिस्तानमध्येही हीच स्थिती आहे. अफगाणिस्तान हे देखील पहिले हिंदुबहुल राष्ट्र होते, पण आज तिथे तालिबान्यांची सत्ता आहे. भारतात देखील अनेक राज्यांमधील, विशेष करून सीमावर्ती भागातील बरेचसे जिल्हे हे मुस्लिमबहुल आहेत आणि काही होण्याच्या मार्गावर आहेत. आज पाकिस्तान आणि बांगलादेश येथील हिंदू हे जात्यात असतील तर आपण सुपात आहोत हे आपण लक्षात घेतले पाहिजे. काश्मीर हे त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. उद्या ही वेळ भारतावर येऊ नये यासाठी सरकारने आता हिंदूंच्या संरक्षणासाठी ठोस पावले उचलण्याची गरज आहे. कारण हिंदूंवरील अत्याचार इतके टोकाला पोहोचलेले असताना आणि महिनाभरापासून एवढा हिंसाचार चालू असताना शेजारी देश असणाऱ्या भारताने गुळमुळीत भूमिका घेणे अपेक्षित नाही. पाकिस्तानसोबत असलेला सिंधू जल करार रद्द करून ज्याप्रमाणे पाकिस्तानच्या मुसक्या आवळल्या, त्याचप्रमाणे बांगलादेशला देखील त्याची आर्थिक कोंडी करून वठणीवर आणणे आवश्यक आहे, कारण बांगलादेश बऱ्याच गोष्टींसाठी भारतावर अवलंबून आहे. भारताला विश्वगुरू बनायचे असेल तर बांगलादेशमधील हिंदूंची स्थिती आपण नुसती कशी काय बघू शकतो?

**डॉ. स्वाती देशमुख**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच कुठलाही लेख पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## शाक्य संघ सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची शौर्य विजयस्तंभास मानवंदना

**सोलापूर, दि. ६ जानेवारी-**

जगभरात सर्वत्र नववर्ष प्रारंभानिमित्त शुभेच्छांचं अदान-प्रदान होत असताना, १ जानेवारी रोजी भिमा-कोरेगांव येथील शौर्याचं स्मरण करून विजयस्तंभासमोर नतमस्तक होण्यासाठी एकत्र आलेल्या बांधवांच्या साक्षीनं नियोजित शाक्य संघ सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी महाराष्ट्र राज्य यांनी विशेष ड्रेस कोडमध्ये वाद्य पथकासोबत पथसंचलन करुन शौर्य विजय स्तंभास मानवंदना दिली. शाक्य संघ महाराष्ट्र व यशसिध्दी आजी-माजी सैनिक वेल्फेअर असोसिएशन महाराष्ट्र राज्य, शाक्य संघ सोलापूर, शाक्य संघ प्रज्ञासुर्य अमरावती, शाक्य संघ मिलिंद दौंड, नियोजित शाक्य संघ शौर्य विजयस्तंभ, पुणे, शाक्य संघ सुभेदार रामजी आंबेडकर, नांदेड, नियोजित शाक्य संघ सम्राट अशोका, बीड, नियोजित शाक्य संघ माता रमाई महिला ब्रिगेड महाराष्ट्र राज्य, नियोजित शाक्य संघ, बोधीसत्व, ठाणे येथील बौध्द उपासक व बौध्द उपासिका या मानवंदनेस मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. याप्रसंगी आयु. महेशगौरी यांना समाज भुषण पुरस्कार, आयु. अशोककुमार दिलपाक (शाक्य संघ नेतृत्व पुरस्कार), आयु. राहुल आढाव यांना भूदान पुरस्कार व सर्वांना पंचशिल उपरणे व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. तसेच सामाजिक क्षेत्रात योगदान देणाऱ्यांना खालील पुरस्कार सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन डॉ. किर्तीपाल गायकवाड (सोलापूर) यांनी केले तर अशोककुमार दिलपाक यांनी आभार मानले.

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या अध्यक्षपदी डॉ. उमाकांत चनशेट्टी

**सोलापूर, दि. ६ जानेवारी-**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, शहर शाखा सोलापूरच्या अध्यक्षपदी डॉ. उमाकांत चनशेट्टी यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या शहर शाखा सोलापूरच्या नवीन कार्यकारिणी निवडीची बैठक १ जानेवारी रोजी डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह सोलापूर येथे यशस्वीरित्या संपन्न झाली. या बैठकीत विविध क्षेत्रातील इच्छुक कार्यकर्त्यांच्या सहभागातून नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. शहरातील अंधश्रद्धा, बुवाबाजी, जातभेद आणि इतर सामाजिक कुरीट्यांविरुद्ध संघर्ष करण्यासाठी ही कार्यकारिणी पूर्णत: कटिबद्ध असल्याचे जाहीर करण्यात आले.



**अन्य पदाधिकारी असे :** उपाध्यक्ष- संभाजी दीक्षित, कार्याध्यक्ष- आर. डी. गायकवाड, सचिव- सुजीत हावळे, विभागीय कार्यवाहक बुवाबाजी संघर्ष विभाग-यशवंत फडतरे, वृत्तपत्र प्रकाशन विभाग- ब्रह्मानंद धडके, वैज्ञानिक जाणीवा प्रकल्प -लता ढेरे, पांडगळे, महिला विभाग-शीला हावळे, विविध उपक्रम- गणेश पवार, आशा चव्हाण, जात निर्मूलन व विवेकी जोडीदार निवड- शकुंतला सूर्यवंशी, मानसिक आरोग्य विभाग-डॉ. अस्मिता बालगावकर, युवा व विवेकवाहिन- विनीत जाधव, सोशल मीडिया विभाग-डॉ. निलेश गुरव, प्रशिक्षण विभाग- कुंडलिक मोरे, कायदा विभाग- ॲड. सरीता मोकाशी, सांस्कृतिक विभाग-सुनिता गायकवाड, लालनाथ चव्हाण.

## पशुसंवर्धन विभागाच्या योजनेचा लाभ घेण्यासाठी २४ जानेवारीपर्यंत अर्ज करावा

**सोलापूर दि. ६ जानेवारी-**

पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद सोलापूर यांच्याकडील सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा परिषद उपकर योजनेमधून वैयक्तीक लाभाच्या विविध योजनेतील वैयक्तीक लाभाच्या योजना राबविण्यात येतात यासाठी पात्र लाभार्थीनी २४ जानेवारी २०२६ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, जिल्हा परिषद डॉ. व्ही. डी. येवले यांनी केले आहे. यामध्ये आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या शेतमजुर व शेतकऱ्यांना ७५% अनुदानावर ४ शेळया व १ बोकड वाटप करणे, पशुपालकांना मिल्कीग मशिन ५०% अनुदानावर पुरविणे आदींचा समावेश आहे. वरील योजनांसाठी पात्र लाभार्थीकडून अर्ज मागविण्यात येत असून सदरचे अर्ज दिनांक ५ जानेवारी २०२६ पासून पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती तसेच सर्व पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये उपलब्ध आहेत. तसेच जिल्हा परिषदेच्या (www.zpsolapur) या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. अर्ज स्वीकारण्याची अंतीम तारीख दिनांक २४ जानेवारी २०२६ आहे. तरी इच्छुक पात्र लाभार्थींनी वरील योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष, कृषी पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती, जि. प. सोलापूर तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. सोलापूर कूलदीप जंगम, मा. उपाध्यक्ष, कृषी पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती, जि. प. सोलापूर तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद संदीप कोहिणकर व जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, जिल्हा परिषद डॉ. व्ही.डी. येवले यांनी केले आहे.

# ड्रेनेज, पर्जन्य जलवाहिनी वेगळी ठेवण्याचे निर्देश

### नियमबाह्य जोडण्या आरोग्यास अपायकारक असल्याचा इशारा

### हैदराबाद रोड परिसरातील पर्जन्य जलवाहिनी प्रकल्पाची आयुक्त डॉ.ओम्बासे यांनी केली पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ जानेवारी-**

महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज शहरातील हैदराबाद रोड, विडी घरकुल परिसरातील नाला क्र. २० (पोगुल विहार ते हैदराबाद रोड) तसेच नाला क्र. २१ (हैदराबाद रोड ते आदर्श नगर) या पर्जन्य जलवाहिनीच्या सुरू असलेल्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली.ड्रेनेज व पर्जन्य जलवाहिनी वेगळी ठेवण्याचे निर्देश दिले. नियमबाह्य जोडण्या आरोग्यास अपायकारक असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगर अभियंता सारिका आकूलवार, अंतर्गत लेखा परीक्षक राहुल कुलकर्णी, एन्व्हायरोसेफ कन्सल्टंटचे टीम लीडर गोकुळ चितारी, हर्षवर्धन बुबणे, रेसिडेंट इंजिनिअर चंद्रकांत गुंडे, रोहन तोगरे, रोहित गोडगे, प्रोजेक्ट मॅनेजर सचिन लकारे, साईट इंजिनिअर चरणू शिंदे, राहुल यातकर, मनोज जाधव, सागर करोसेकर आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या ठिकाणी सुरू असलेली कामे सविस्तर प्रकल्प अहवालानुसार (डीपीआर) राबविण्यात येत असून, पर्जन्य जलवाहिनीचे योग्य प्रकारे ट्रेनिंग करणे, काही ठिकाणी नाले बंदिस्त करणे, आवश्यक ठिकाणी पाईप टाकणे आदी कामांचा समावेश आहे. पर्जन्य जलवाहिनी ही मुख्यतः पावसाळ्यातील चार महिन्यांमध्ये पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठी असते; मात्र शहरातील काही भागात ड्रेनेजचे पाणी या जलवाहिनीत मिसळून ते वर्षभर वाहत असल्याचे निदर्शनास आले आहे. यावेळी त्यांनी कामाची गुणवत्ता, वेळापत्रक आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या. भविष्यात पाणी साचण्याच्या समस्या टाळण्यासाठी पर्जन्य जलवाहिनी व ड्रेनेज यांची स्पष्टपणे वेगळी व्यवस्था करण्याचे निर्देश दिले.

**पर्जन्य जलवाहिनीमध्ये ड्रेनेजचे पाणी मिसळणे आरोग्यास अपायकारक**

पर्जन्य जलवाहिनीमध्ये ड्रेनेजचे पाणी मिसळणे हे नियमबाह्य व आरोग्यास अपायकारक असल्याचे स्पष्ट करताना आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी यामुळे पावसाळ्यात नाले ओव्हरफ्लो होऊन सखल भागांत पाणी साचणे, तसेच रहिवासी व झोपडपट्टी भागात पाणी शिरण्यासारख्या समस्या निर्माण होत असल्याचे नमूद केले.

## 'सिध्देश्वर'चे भक्ती शिंदे, अखिलेश कोरे प्रथम

### कै. वि. गु. शिवदारे जन्मशताब्दीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा

**सोलापूर, दि. ६ जानेवारी-**

कै. वि. गु. शिवदारे अण्णा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेत मराठी विभागात सिद्धेश्वर कन्या प्रशालेच्या भक्ती शिंदे व इंग्रजी विभागात सिद्धेश्वर स्कूलच्या अखिलेश कोरे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे कॉलेज ऑफ फार्मसी, सोलापूर आणि श्री. वि. गु. शिवदारे प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा सुरु झाली. ही स्पर्धा सोलापूर शहर, दक्षिण सोलापूर तालुका, उत्तर सोलापूर तालुका व अक्कलकोट तालुका ह्या विभागांमध्ये घेतली जात आहे. ही स्पर्धा इयत्ता ७ वी ते ९ वी या शालेय गटातील विद्यार्थ्यांसाठी असून, मराठी व इंग्रजी अशा दोन्ही माध्यमांतून स्वतंत्रपणे घेतली जाणार आहे. चारही विभागातून २०० स्पर्धकांनी नावनोंदणी केली आहे.

स्पर्धेचे उदघाटन डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे होते. यावेळी नरेंद्र गंभीरे, सुभाष मुनाळे, भीमाशंकर शेटे, डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, अंजली तिवारी आदी उपस्थित होते. तालुका पातळीवरील विजेत्या स्पर्धकांची निवड अंतिम फेरीसाठी केली जाईल. अंतिम फेरी ३० जानेवारी रोजी युनिक इंग्लिश मिडियम स्कूल, शिवदारे शिक्षण संकुल येथे संपन्न होईल.

**शहर स्पर्धेतील अंतिम प्रथम तीन व दोन उत्तेजनार्थ**

**मराठी विभाग -** भक्ती अण्णासाहेब शिंदे (सिद्धेश्वर कन्या प्रशाला), अनन्या केगावकर ( सिद्धेश्वर स्कूल) सई गुरुशांत माळगे (वि.मो.मेहता माध्यमिक शाळा). उत्तेजनार्थ: शलाका मठ (सिद्धेश्वर स्कूल), आर्या सुरडे, (सेवासदन). **इंग्लिश विभाग-** अखिलेश कोरे (सिद्धेश्वर स्कूल), वेदांत सुनील मठपती (मॉडेल पब्लिक स्कूल), ऋतुजा आप्पासाहेब विंचुरे, रेवा निमेश गांधी (संगमेश्वर पब्लिक स्कूल), श्रेया प्रकाश कटनाळे ( सिद्धेश्वर कन्या).



## पंडित वडतिले यांचा सेवानिवृत्ती निमित्त महापालिकेतर्फे सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जानेवारी-**

महापालिका विभागीय कार्यालय क्रमांक दोन वरिष्ठ लिपीक व प्रभारी कार्यालय अधीक्षक गुणवंत कर्मचारी पंडित नारायण वडतिले यांचा सेवानिवृत्तीबद्दल महापालिकेतर्फे सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. हॉटेल विद्यार्थ येथे झालेल्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, मुख्य लेखापाल रत्नराज जवळगेकर, विभागीय अधिकारी सरकाझी, माजी उपायुक्त अनिल विपत, कामगार नेते अशोक जानराव, जनार्दन शिंदे उपस्थित होते. प्रास्ताविक सुरुची साळुंके यांनी केले.

कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन पत्रकार दशरथ वडतिले यांनी केले तर आभार सुस्मिता कोरडे यांनी मानले. कार्यक्रमास सोलापूर जनता बँकेच्या अधिकारी संगीता वडतिले, अरुण साळुंके, सुशांत सुरवसे, ऋषीकेश साळुंके, श्रीधर कोरडे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बिरप्पा वडतिले, रोहित वडतिले, मयुर वडतिले, वेदांत वडतिले, प्राजक्ता वडतिले आदींनी परिश्रम घेतले.

# लायन्स क्लब ऑफ सोलापूर ट्विनला प्रांतपाल डॉ.विरेंद्र चिखले यांची भेट



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जानेवारी-**

लायन्स इंटरनॅशनल अंतर्गत लायन्स क्लब ऑफ सोलापूर ट्विनला प्रांतपाल डॉ. विरेंद्र चिखले यांची क्लबला अधिकृत भेट हॉटेल ग्रीनवुड रिसॉर्ट सोरेगाव विजापूर रोड येथे अध्यक्षा डॉ. कृष्णा राहुल चंडक यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीरित्या संपन्न झाली.

यावेळी प्रांतपाल डॉ. विरेंद्र चिखले, प्रांतांचे प्रथम महिला विनया चिखले, प्रांताचे खजिनदार नरसिंह सांगोडकर तसेच पी.आर. ओ. अनुप दरेकर, उपप्रांतपाल राजेंद्र शहा (कांसवा), माजी प्रांतपाल जगदीश पुरोहित मान्यवरांची उपस्थिती होती. अध्यक्षा डॉ. चंडक यांनी घंटानाद करून कार्यक्रमाची सुरुवात केली.

इंजि. रविकिरण वायचळ यांनी ध्वजवंदन व त्यानंतर दिपप्रज्वलन केले. खजिनदार लायन प्रभाकर जवळकर यांनी क्लबचा हिशोब सादर करून डिस्टिक, एल.सी.आय एफ फंण्ड डिस्ट्रिक खजिनदार नरसिंह सागोडकर यांच्याकडे सुपूर्त केला. झोन चेअरमन सोमशेखर भोगडे यांनी क्लबला शुभेच्छा दिल्या. मुकुंद जाधव यांनी प्रमुख पाहुण्यांचा परीचय करून दिला. यावेळी लायन्स इंटरनॅशनल अध्यक्ष यांच्या कडून आलेले लायन्स इंटरनॅशनल पीन, गौरवास्पद पत्र झोन चेअरमन सोमशेखर भोगडे, क्लबच्या सचिवा नंदिनी जाधव यांना दिले. यावेळी बालिका दिनानिमित्त विद्यार्थीनींना वहया वाटप करण्यात आले.

एक झाड आपल्या आईसाठी वृक्षारोपन करण्यात आले. यावेळी लायन्स क्लब ऑफ सोलापूरचे अध्यक्षा लायन नंदा लाहोटी, कॅबिनेट ऑफिसर लायन गोविंद लाहोटी, लायन्स क्लब मेट्रोचे कॅबिनेट ऑफिसर लायन रतिफ खान यांचीही उपस्थिती होती. ममता बुगडे, डॉ. राहुल चंडक यांनी सूत्रसंचालन केले.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील आमचे अशिलानी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि।। व सब डि।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका ग.व.सु. हद्दीतील पेठ शास्त्री नगर-क झोपडपट्टी, सोलापूर या नावांने ओळखले जाणाऱ्या नगरातील झोपडी घर नं. ३१५ लगत ही मिळकत झोपडी घरजागा आमचे अशिल रतन शांतप्पा कदम यांचे मयत आई कै. अनुसया चंद्रकांत हावळे यांचे नावांवर असून याची नोंद सोलापूर महानगरपालिकेच्या ग.व.सु. विभागात कर आकारणीस नोंद आहे. सदर ठिकाणी त्यांचे नांवे दोन खोल्या आहेत. सदरच्या खोल्या वीट, मातीने बांधून वरती पन्हाळी पत्रे वासे घातलेले आहेत.

सदरच्या खोल्या आमचे अशिलांचे आई कै. अनुसया चंद्रकांत हावळे यांचे नांवावर असून सदरहू खोल्या आमचे अशिलाचे कब्जे वहिवाटीत आहेत. तरी कै. अनुसया चंद्रकांत हावळे हिचे मृत्युपश्चात आमचे अशिल ही मुलगी या नात्याने कायदेशीर वारस आहे.

तरी सदरहू वर नमूद झोपडी घरजागेवर आमचे अशिलाव्यतिरिक्त इतर कोणाचाही कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, लीज, करार, मदार, टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर अथवा आमचे अशिलाचे वर नमूद पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही झोपडी घरजागा निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांचे नावाची वारस नोंद सो.म.पा. चे कर आकारणी व कर संकलन विभाग, ग.व.सु. विभागाचे दप्तरी त्याचे नावाची वारस नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

ही नोटीस दिली तारीख- ०६/०१/२०२६

**अशिलाची सही**
**रतन शांतप्पा कदम**

**सही/-**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**ॲड. विजय पंडीत शिंदे,**
**बी.एस,सी., एल.एल.बी.**
**६६ व आदर्श नगर, कुमठा नाका,**
**सोलापूर मो.नं. ९८५०८८२७१९**

### सावधानतेची नोटीस

सोलापूर येथील विशेषतः मौजे उळेवाडी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथील तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविणेत येते की,

(१) मिळकतीचे वर्णन डि व सब डि सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर पैकी, मौजे उळेवाडी येथील गट क्रमांक व उपविभाग क्र. ३१/२ यांसी एकूण क्षेत्र ४ हे. ६७ आर. पैकी खाते क्र.१२४२ यांसी क्षेत्र ०२ हे. ०२ आर. यांसी आकार रू.५.०२ पैसे.

वर नमूद मिळकत ही मुळतः दामोदर तुकाराम घायाळ व त्यांच्या इतर हक्कातील बहिणी यांच्या नावे होते. त्यानंतर दामोदर हे मयत झाल्यानंतर त्यांच्या दोन मुलांनी यशश्री प्रसाद खराटे व प्रसाद यशवंतराव खराटे यांना २ हे. ०२ आर. जमीन यांसी आकार रू. ५.०२ पैसे ही विक्री केलेली आहे. परंतु सदर व्यवहारास इतर हक्कातील दामोदर याच्या बहिणींचे संमती अथवा मान्यता घेतलेली नाही. त्यामुळे सदर शेतजमीनीच्या दिशा व हिस्से ठरलेले नाहीत, व तद्नंतर सद्यस्थितीत आमच्या अशिलांस म्हणजेच मंजुळाबाई बाबुराव कोठे (कोरे) ह्या मयत असून त्यांच्या वारसांची नांवे रेकॉर्डवर घेण्याचे काम चालू आहे. अशी वस्तुस्थिती असताना आमचे अशिल नामे प्रभाकर बाबुराव कोठे यांना खात्रीलायकरित्या अशी माहिती मिळाली आहे की, आमचे अशिलांचे संमतीविना गट नं. ३१/२ पैकी २ हे. ०२ आर. हे क्षेत्र खाते क्र. १२४२ यशश्री प्रसाद खराटे व प्रसाद यशवंतराव खराटे यांनी त्यांचे नांव ७/१२ उताऱ्यावर असल्याचा गैरफायदा घेऊन विक्रीस काढलेले आहे.

सबब सदर सावधानतेच्या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, वर नमूद शेतजमीनीबाबत यशश्री प्रसाद खराटे व प्रसाद यशवंतराव खराटे यांचेसोबत कोणताही खरेदी-विक्रीचा अथवा मालकी हक्क निर्माण करणारा कोणत्याही स्वरूपाचा व्यवहार करू नये, त्यास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. तरी परंतु याउपर कोणीही वर नमूद शेतजमीनीबाबत कसल्याही प्रकारचा खरेदी विक्री व अन्य कोणत्याही स्वरुपाचा वर नमूद मिळकतीमध्ये हक्क, हितसंबंध निर्माण करणारा व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार सदर वर नमूद शेतजमीनीमधील आमचे अशिलांचे हक्क व हिश्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही सावधानतेची जाहीर नोटीस.

ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली ता. ०५/०१/२०२६.

**सही/-**
**प्रविणकुमार कल्लाप्पा बुध्देहाळकर**
**(बी.ए., एलएल.बी.) ॲडव्होकेट**
**मो.नं. ७७२०९९२७०६ / ९०९६२२९१६१**
**मु.पो. डोणज, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर**

### जाहीर प्रसिध्दीकरण

तमाम लोकांस विशेषतः तालुका मंगळवेढा जि. सोलापूर येथील सर्व नागरीक, शाळेचे विद्यार्थी व त्यांचे पालक तसेच संबंधित शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

शिवरत्न शिक्षण संस्था अकलूज नोंदणी क्र. एफ-३९७/सोलापूर या संस्थेमार्फत ता. मंगळवेढा जि. सोलापूर येथे सुरु असलेले उदयसिंह मोहिते-पाटील इंग्लिश मिडीयम स्कूल इ. ९वी ते १०वी माध्यमिक हे शैक्षणिक यूनिट सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीसह श्री. संत दामाजी मेडिकल फौंडेशन रिसर्च सेंटर मंगळवेढा नोंदणी क्र. एफ-२४६७६/सोलापूर या संस्थेकडे हस्तांतरीत करण्यासंबंधीचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे.

तमाम लोकांस या नोटीसीने कळविण्यात येते की, उपरोक्त शैक्षणिक युनिट हस्तांतरणासंबंधी काही हरकत, अडचणी, शंका, तक्रारी इ. असल्यास खाली सही करणारे यांचेकडे लेखी पत्राद्वारे १५ (पंधरा) दिवसांचे आंत कळविण्यात यावे. त्यानंतर आलेल्या तक्रारीचा आजिबात विचार केला जाणार याची नोंद घ्यावी.

हि जाहिर नोटीस प्रसिध्द केली तारीख : ०७/०१/२०२६

मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे

**सही/-**
**चेअरमन**
**श्री संत दामाजी मेडिकल फौंडेशन**
**रिसर्च सेंटर, मंगळवेढा**

### जाहीर समन्स

**मा. उपनिबंधक सहकारी संस्था, (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि. सोलापूर**
११३(अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर - ०१

**सोलापूर सिध्देश्वर सहकारी बँक लि., सोलापूर** **- अर्जदार**
**विरुद्ध**
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) **- जाब देणार**

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | १००४/२०२५-२६ | १,२९,२४३/- | १ | **मनोज नरसिंग व्हटकर** रा. ५०/५१ एफ-४, वर्धमान नगर, रुपाभवानी मंदिरजवळ, सोलापूर-२ |
| | | | ३ | **अरुणा विवेक शिंदे** रा. शांती निकेतन अपार्टमेंट, भवानी पेठ, सोलापूर-०२ |
| २ | १००५/२०२५-२६ | १,१८,८९१/- | १ | **अमित संजयकुमार कांबळे** रा. ४१/१०७ न्यू बुधवार पेठ, महात्मा फुले चौक, सोलापूर-०२ |
| | | | २ | **सुमन संजयकुमार कांबळे** रा. ४१/१०७ न्यु बुधवार पेठ, महात्मा फुले चौक, सोलापूर - ०२ |
| | | | ४ | **चंद्रकांत दिपक कांबळे** रा. ४१/१०७ न्यु बुधवार पेठ, महात्मा फुले चौक, सोलापूर - ०२ |
| ३ | १००६/२०२५-२६ | ७२,२५२/- | २ | **मिलिंद मनोहर गोखले** रा. घर नं. ३०३/१अ प्लॉट नं. ७१/ब इंदिरा नगर, विजापूर रोड, सोलापूर - ०४ |
| | | | ३ | **प्रविणकुमार दत्तात्रय बोडा** रा. ४०० जोडभावी पेठ, सोलापूर - ०५ |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार - मंगळवार, दि. २०/०१/२०२६ रोजी दुपारी १२.00 वाजता कागदपत्रांसह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल, त्याप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दिनांक : ०३/०१/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/- उपनिबंधक**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**

## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१**
**निवडणूक खर्च मध्यवर्ती नियंत्रण कक्ष**

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

जा.क्र./खर्च तारखा निश्चितीबाबत/०५ — दि. ०६/०१/२०२६

**विषय :-** **सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करीता निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची खर्चाच्या हिशोब सादर करणेच्या तारखा निश्चित करणेबाबत.**

**संदर्भ :-** **निवडणूक खर्च सनियंत्रण यावरील अनुदेशांचा सारसंग्रह ऑगस्ट २०२४ दस्ताऐवज ६ आवृत्ती-११**

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करीता निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी निवडणूक प्रचारकामी केलेल्या खर्चाचा हिशोब ठेवणे आणि अशा हिशोबाची नोडल अधिकारी, खर्च नियंत्रण कक्ष यांचेकडे तपासणीसाठी सादर करणे बंधनकारक आहे.

त्या अनुषंगाने उक्त तपासणीसाठी खालील २ तारखा निश्चित करण्यात आलेले आहेत. उमेदवार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांनी निवडणूक प्रचारकामी केलेल्या खर्चाचे नोंदवही व इतर सर्व अनुषंगिक दस्तऐवजासह इंद्रप्रस्थ सभागृह, एम्प्लॉयमेंट चौक, सुझुकी शोरुमच्या बाजूला उपस्थित रहावयाचे आहे.

| अ.क्र. | तपासणी | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | प्रथम लेखा तपासणी | दि.०८/०१/२०२६ | सकाळी १०.00 वाजता |
| २ | द्वितीय / तृतीय लेखा तपासणा | दि.१२/०१/२०२६ | सकाळी १०.00 वाजता |

सदर तपासणीस उमेदवार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी अनुपस्थित राहिल्यास त्यांचेवर लोकप्रतिनिधी कायदा १९५१ नुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल त्याचप्रमाणे त्यांस निर्गमित केलेले सर्व निवडणूक प्रचार परवाने रद्द करण्यात येतील लयाची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(डॉ. सचिन ओम्बासे, भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा, मुख्य निवडणूक अधिकारी**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

**महाराष्ट्र शासन**

## कार्यकारी अभियता सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर

**पत्ता :- गुरूनानक चौक सिंचन सेवा भवन, ऑफिसर्स क्लब समोर सोलापूर ४१३००३**
**ई-मेल:- eesid@ymail.com दूरध्वनी क्र. (०२१७) २७४०६६३ सन २०२५-२६**

**ई निविदा सूचना क्र.१२ द्वितीय मागणी**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियता सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामारीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकरण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम स्तरावर राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

**कामाचे नांव:-** १. पुरामुळे नुकसान झालेला को.प. बंधारा कव्हे, ता. माढा येथील वरिल बाजुकडील विंग वाल बांधकाम करणे, बंधाऱ्याचे पियर, चॅनेल, वेअरिंग कोट, रेलिंग दुरुस्ती, अनुषंगिक कामे व लोखंडी बर्गे पुरवठा करणे

**जिल्हा :-** सोलापूर
**निविदेची किंमत रूपये अंदाजे :** १. रू.८२.८० लक्ष
**ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक** ०९/०१/२०२६ ते दिनांक १६/०१/२०२६
**ई-निविदा उघडण्याचा दिनांक : दिनांक** १९/०१/२०२६ (तांत्रिक लिफाफा)
**जाक्र/सोपावि/लेशा/ई निविदा/४०/७/२०२५**
**दिनांक - १५/१२/२०२५**
**कार्यकारी अभियंता सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर यांचे कार्यालय**

**सही/-**
**(स.कुं. पवार)**
**कार्यकारी अभियंता**
**सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर**

**विमाका/पुणे/जाहि./२७९/२०२५-२६**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### रोहन अकादमी लातूरचा अंतिम फेरीत प्रवेश

**सोलापूर, दि. ६ जानेवारी-**


राजवीर

मास्टर्स क्रिकेट अकादमीच्या १२ वर्षांखालील लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत लातूरच्या रोहन क्रिकेट अकादमीने अंतिम फेरीत प्रवेश केला. डोणगाव येथील पुष्प अकादमीच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत रोहन अकादमीने येथील मास्टर अकादमीचा २२ धावांनी पराभव केला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना रोहन अकादमीने ४२ षटकांत सर्वबाद १४४ धावा केल्या. त्यांच्या अजिंक्य मुळेने २६ धावा केल्या. मास्टर्सकडून वेदांत कणकट्टीने २५ धावांत ३ बळी तर विपुल पट्टनने ११ धावांत २ बळी टिपले. विजयी १४५ धावांचे लक्ष्य गाठणाऱ्या मास्टर्सचा डाव ४७.५ षटकांत १२२ धावांत आटोपला. त्यात अरविंद तग्गेली ५३ धावा केल्या. रोहन ॲकॅडमीकडून राजवीर नाईकनवरे १४ धावांत ३ व सौरभ भुजबळने २४ धावांत ३ गडी बाद केले. राजवीर सामन्याचा मानकरी ठरला. **आजचा उपांत्य सामना :** निलेश गायकवाड अकॅडमी विरुद्ध युनायटेड अकॅडमी

### कडलास मॅरेथॉन स्पर्धा रविवारी ११ जानेवारीला

**सांगोला, दि. ६ जानेवारी -**

तालुक्यातील कडलास गावचे सुपुत्र व जलसंपदा विभाग सोलापूरचे कार्यकारी अभियंता सचिन कुंडलिक पवार यांच्या संकल्पनेतून मॅरेथॉन स्पर्धा रविवार ११ जानेवारी रोजी सकाळी सहा वाजता कडलास येथील कै.रावसाहेब पाटील आदर्श विद्यालयाच्या मैदानावर आयोजित केली आहे. ही स्पर्धा पुरुष व स्त्री तसेच मुले व मुली या गटात होईल. खुला गट क्र.१- १० किमी धावणे प्रथम क्र. ५ हजार, द्वितीय क्र.३ हजार, तृतीय क्र.२ हजार तसेच शालेय मुलांसाठी ८ वी ते १० वी साठी गट क्र.२- ५ किमी धावणे प्रथम क्र.१ हजार, द्वितीय क्र.७००, तृतीय क्र.५०० व ५ वी ते ७ वी साठी गट क्र.३- ३ किमी धावणे प्रथम क्र.१ हजार, द्वितीय क्र.७००, तृतीय क्र.५०० रुपये अशी पारितोषिक ठेवण्यात आले आहे. स्पर्धेसाठी प्रवेश फी नाही. खुल्या गटातील खेळाडूंनी आधार कार्ड आणावे. तसेच शालेय गटातील खेळाडूंनी आधार कार्ड व शाळेचे बोनाफाईट सोबत आणावे. स्पर्धेत ऐनवेळी भाग घेता येईल, असे संयोजकांनी कळविले आहे.

### 'काम'च्या राज्य कराटे स्पर्धेसाठी सोलापूर शहर निवड चाचणी उद्या

**सोलापूर, दि. ६ जानेवारी-**

वर्ल्ड- एशियन-कॉमनवेल्थ कराटे फेडरेशनतर्फे भारतातून अधिकृतरित्या एकमात्र मान्यता असलेल्या कराटे इंडिया ऑर्गनायझेशन-किओ या राष्ट्रीय संघटनेशी संलग्न कराटे डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र-काम या महाराष्ट्र राज्य संघटनेचे अप्रूव्हल असलेल्या ट्रेडिशनल व स्पोर्ट्स कराटे असोसिएशन सोलापूरतर्फे २१वर्षाखालील व वरिष्ठ गटातील शहर काता व कुमिते प्रकारातील मुले व मुली निवड चाचणी निर्धारित वजन व वयोगटानुसार ८ जानेवारी रोजी घेण्यात येणार आहेत. शहरातील ज्या इच्छुक कराटे ॲथलिटस्ना या सिलेक्शन ट्रायल्स द्यायच्या आहेत, त्यांच्या प्रशिक्षक/संस्था-ॲकॅडमी/ क्लब्जनी शहर नोंदणी व सहभागासाठी ९१७१७११७१९ या क्रमांकावर संपर्क साधावा. सदर ट्रायल मधूनच विजयी ठरलेल्या स्पर्धकांचा शहर संघ १७ व १८ जानेवारी रोजी अहिल्यानगर येथे होणा-या कामच्या राज्य निवड चाचणीसाठी पाठविला जाईल. तेथील विजेते पुढे महाराष्ट्र राज्य संघात निवडले जातील व कराटे इंडिया ऑर्गनायझेशन-किओच्या अधिकृत राष्ट्रीय कराटे स्पर्धेत सहभाग घेऊ शकतील. केवळ याच प्रक्रियेतील सहभागी व विजेते कराटे ॲथलिट ५% आरक्षणा साठी पात्र ठरतील, असे टीएसकेए चे सचिव मिहिर सुरेश जाधव यांनी कळवले आहे.

### हरवणे कठीण : ॲशले गार्डनर

**मुंबई** : ऑस्ट्रेलिया सध्या महिला क्रिकेटमध्ये सर्वोत्तम संघ आहे, परंतु येत्या दशकात एकदिवसीय विश्वविजेत्या भारतीय संघाला हरवणे खूप कठीण होईल, असा विश्वास ऑस्ट्रेलियन महिला खेळाडू ॲशले गार्डनरने व्यक्त केला आहे. गेल्या वर्षी महिला विश्वचषक उपांत्य फेरीत भारताकडून पराभूत झालेल्या ऑस्ट्रेलियन संघाचा भाग असलेली गार्डनर म्हणाली की हरमनप्रीत कौरच्या संघात प्रचंड सुधारणा झाली आहे. ९ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या महिला प्रीमियर लीगमध्ये गुजरात जायंट्सकडून खेळणारी गार्डनर म्हणाली पुढील पाच ते दहा वर्षांत भारतीय संघाला पराभूत करणे सर्वांत कठीण आहे.

# स्टीव्ह स्मिथचे ॲशेसमध्ये विक्रमी शतक

## १३४ धावांच्या आघाडीसह ऑस्ट्रेलिया ७ बाद ५१८

**सिडनी, ६ जानेवारी**

कर्णधार स्टीव्ह स्मिथच्या नाबाद शतकामुळे ऑस्ट्रेलियाने सिडनी येथे पाचव्या ॲशेस कसोटीत तिसऱ्या दिवसअखेर पहिल्या डावात ७ बाद ५१८ अशी आपली स्थिती मजबूत केली. स्मिथ १२९ आणि ब्यू वेबस्टर ४२ धावांवर नाबाद होते. या शतकामुळे स्मिथने अनेक विक्रम प्रस्थापित केले आहेत. ॲशेसमध्ये सर्वाधिक धावा आणि सर्वाधिक शतके करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत स्मिथ आता फक्त डॉन ब्रॅडमनपेक्षा मागे आहे.

सिडनी कसोटीच्या तिसऱ्या दिवशी स्मिथचे शतक हे ॲशेस मालिकेतील त्याचे १३ वे शतक आहे. या यादीत डॉन ब्रॅडमन (१९), जॅक हॉब्स (१२), स्टीव्ह वॉ (१०), वॉली हॅमंड (९) आणि डेव्हिड गॉवर (९) सारख्या दिग्गजांचा समावेश आहे.


तेरावे शतक झळकविल्यानंतर बॅट उंचावताना स्टीव्ह स्मिथ

तिसऱ्या दिवशी स्मिथ १२९ धावांवर नाबाद राहून पॅव्हेलियनमध्ये परतला. तथापि, तो आता ॲशेसमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. स्मिथने ४१ सामन्यांमध्ये ७३ डावांमध्ये ५७.५३ च्या सरासरीने ३६८२ धावा केल्या आहेत. त्याने इंग्लंडचा दिग्गज फलंदाज जॅक हॉब्सला मागे टाकले. त्याने या मालिकेत ४१ सामन्यांमध्ये ७१ डावांमध्ये ३६३६ धावा केल्या आहेत. हॉब्सच्या नावावर १२ शतके आहेत.

स्मिथने २०५ चेंडूत १५ चौकार आणि एका षटकारासह १२९ धावा करत नाबाद आहे. स्मिथची ही खेळी ऑस्ट्रेलियासाठी महत्त्वाची ठरली. संघाला आघाडी मिळवून देण्यात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली. त्याच्यासोबत ब्यू वेबस्टर देखील होता, जो ५८ चेंडूत ४२ धावा करत नाबाद राहिला. त्यामध्ये चार चौकारांचा समावेश होता. दोघांनी आठव्या गड्यासाठी ८१ धावा जोडल्या आहेत.

त्याआधी, ट्रॅव्हिस हेडनेही मालिकेतील तिसरे शतक झळकावले, त्याने १६६ चेंडूत २४ चौकार आणि एका षटकारासह १६३ धावा केल्या. सात बाद ५१८ धावांवर असलेल्या ऑस्ट्रेलियाने १३४ धावांची मजबूत आघाडी घेतली आहे. इंग्लंडकडून ब्रायडन कार्सने ३, बेन स्टोक्सने २ आणि जोश टंग आणि जेकब बेथेलने प्रत्येकी एक बळी घेतला. (वृत्तसंस्था)

### ब्रॅडमनच्या खास क्लबमध्ये सामील

स्मिथ आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकाच संघाविरुद्ध ५,००० पेक्षा जास्त धावा करणारा चौथा फलंदाज बनला आहे. सचिन तेंडुलकर, विराट कोहली आणि ब्रॅडमन यांनी असे केले आहे. सचिनने ऑस्ट्रेलिया (६७०७) आणि श्रीलंका (५१०८), कोहलीने ऑस्ट्रेलिया (५५५१) आणि ब्रॅडमनने इंग्लंड (५०२८) विरुद्ध अशी कामगिरी केली आहे. स्मिथने आता इंग्लंडविरुद्ध ९० सामन्यांमध्ये १२२ डावांमध्ये ४८.८९ च्या सरासरीने ५,०८५ धावा केल्या आहेत. इंग्लंडविरुद्ध त्याची १४ शतके आहेत.

### राहुल द्रविडलाही टाकले मागे

स्टीव्ह स्मिथने राहुल द्रविडलाही मागे टाकले आहे. द्रविडच्या नावावर ३६ शतके आहेत, तर स्मिथचे हे त्याच्या कसोटी कारकीर्दीतील ३७ वे शतक होते. त्याच्या पुढे सचिन तेंडुलकर (५१), जॅक कॅलिस (४५), रिकी पॉन्टिंग (४१), जो रूट (४१) आणि कुमार संगकारा (३८) आहेत.

# मुस्तफिजूरला नुकसानभरपाई मिळण्याची शक्यता कमी

**कोलकाता, ६ जानेवारी**

बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिजूर रहमानचा कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) सोबतचा करार संपुष्टात आणण्यात कोणतीही भूमिका नसली तरी त्याला कोणतेही आर्थिक नुकसानभरपाई मिळण्याची शक्यता कमी आहे.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) सूचनेनुसार केकेआरने त्याला संघातून वगळले होते. चेन्नई सुपर किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्ससोबतच्या कठीण बोली प्रक्रियेनंतर केकेआरने आयपीएल लिलावात मुस्तफिजूरला ९.२० कोटी रुपयांना विकत घेतले होते. बीसीसीआयने आपल्या निर्णयाचे कोणतेही विशिष्ट कारण दिले नाही.

बांगलादेश क्रिकेट बोर्डाने (बीसीबी) या मुद्यावर कडक भूमिका घेतली आहे आणि भारतात होणारे त्यांचे टी-० विश्वचषक सामने श्रीलंकेत हलवण्याची मागणी केली आहे. बीसीसीआयच्या या निर्णयामुळे खेळाडूच्या हक्कांबद्दल वाद निर्माण झाला आहे. कारण त्याने स्वेच्छेने स्पर्धेतून माघार घेतली नाही किंवा त्याच्यावर कोणत्याही चुकीचा आरोप झालेला नाही. तथापि, सूत्रांचे म्हणणे आहे की सध्याच्या विमा रचनेत भरपाईसाठी फारशी संधी नाही.



या प्रकरणाची माहिती असलेल्या आयपीएलच्या एका सूत्राने सांगितले की, सर्व आयपीएल खेळाडूंचे शुल्क विमाकृत असतात. परदेशी आंतरराष्ट्रीय खेळाडूंच्या बाबतीत, जर ते शिबिरात सामील झाल्यानंतर किंवा स्पर्धेदरम्यान जखमी झाले तर, फ्रँचायझी सहसा भरपाई देते. तथापि, मुस्तफिजूरचे प्रकरण सामान्य विमा नियमांतर्गत येत नाही. दुखापतीमुळे किंवा लीगमधील त्याच्या सहभागाशी संबंधित कोणत्याही क्रिकेटशी संबंधित कारणामुळे त्याला संघातून काढून टाकण्यात आले नाही, म्हणून केकेआर त्याला कोणतेही नुकसानभरपाई देण्यास बांधील नाही. (वृत्तसंस्था)

# सुरेश कलमाडी यांच्या निधनाबद्दल क्रीडा जगतात शोक

**नवी दिल्ली, ६ जानेवारी**



भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे माजी अध्यक्ष आणि माजी केंद्रीय मंत्री सुरेश कलमाडी यांचे मंगळवारी निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल क्रीडा क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी शोक व्यक्त केला.

भारतीय ॲथ्लेटिक्स फेडरेशनचे माजी सचिव आणि कलमाडी यांचे दीर्घकाळ सहकारी ललित भानोत यांनी हे वैयक्तिक नुकसान असल्याचे म्हटले आहे. सुरेश कलमाडी यांनी भारतीय क्रीडा विकासात महत्त्वाची भूमिका बजावली, अशी शोकसंवेदना त्यांनी व्यक्त केली.

भारतीय क्रीडा क्षेत्राच्या प्रगतीसाठी त्यांचे योगदान नेहमीच लक्षात राहील. त्यांनी जवळजवळ दोन दशके भारतीय ॲथ्लेटिक्स फेडरेशनचे अध्यक्ष म्हणून काम केले आणि खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी अनेक महत्त्वाचे कार्यक्रम सुरू केले. ते एक समर्पित क्रीडा प्रशासक होते ज्यांनी भारतीय क्रीडा क्षेत्रात अनेक बदल घडवून आणल्याचे भानोत म्हणाले.

भारतीय तलवारबाजी संघटनेचे विद्यमान सरचिटणीस मेहता म्हणाले, मी त्यांच्या कुटुंबाप्रति संवेदना व्यक्त करतो. भारतीय क्रीडा क्षेत्रातील त्यांचे योगदान नेहमीच लक्षात राहील, असे ते म्हणाले.

सुरेश कलमाडी यांनी आशियाई ॲथ्लेटिक्स संघटनेचे अध्यक्ष म्हणूनही काम केले आणि जगातील सर्वोच्च ॲथ्लेटिक्स संस्था आयएएएफ (आता जागतिक ॲथलेटिक्स) च्या परिषदेचे सदस्य होते. वर्ल्ड ॲथ्लेटिक्सचे उपाध्यक्ष आणि एएफआयचे प्रवक्ते आदिल सुमारीवाला यांनी सुरेश कलमाडी यांच्या निधनाबद्दल तीव्र शोक व्यक्त केला आहे.

२०१० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या आयोजनात सुरेश कलमाडी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. भ्रष्टाचार आणि गैरव्यवस्थापनाच्या आरोपांमुळे ही स्पर्धा वादात सापडली होती. पुण्यातील ॲथ्लेटिक्स आणि क्रीडा पायाभूत सुविधांच्या विकासातही कलमाडी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. (वृत्तसंस्था)

# राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेसाठी अनु नैतामची निवड

### राज्यस्तरीय स्पर्धेत रौप्य पदक

**गडचिरोली, ६ जानेवारी**

पहिल्या पॅरा राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेत येथील सेमाना बायपास रोडवरील शासकीय इंग्रजी माध्यम आश्रमशाळेची इयत्ता आठवीतील अनु रघुपती नैताम हिने रौप्य पदक पटकाविले असून, पटियाळा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेकरिता तिची निवड झाली आहे.

महाराष्ट्र धनुर्विद्या संघटना व पिंपरी चिंचवड धनुर्विद्या संघटनेच्या संयुक्त विद्यमाने ३ जानेवारीला सी. एम. इंटरनॅशनल स्कूल बानेर येथे पार पडलेल्या पहिल्या पॅरा राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेत अनु नैतामने इंडियन राऊंड या प्रकारात वैयक्तिक रौप्य पदक पटकाविले. पद्मश्री मुरलीकांत पेटकर यांच्या हस्ते रौप्य पदक देऊन तिचा गौरव करण्यात आला.


पुरस्कार प्रदान केल्यानंतर पद्मश्री मुरलीकांत पेटकर यांच्यासोबत अनु नैताम व मान्यवर

राज्यस्तरीय स्पर्धेत मिळालेले घवघवीत यश व राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल अनु नैतामचे सहायक जिल्हाधिकारी तथा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोलीचे प्रकल्प अधिकारी अरुण एम, सहायक प्रकल्प अधिकारी वहीद शेख, डॉ. प्रभू सादमवार, शासकीय इंग्रजी माध्यम आश्रमशाळेच्या मुख्याध्यापिका वंदना महल्ले, जिल्हा क्रीडा अधिकारी भास्कर घटाळे, क्रीडा अधिकारी घनश्याम वरारकर, चंद्रशेखर मेश्राम, श्रीराज बदोले, नाजूक उईके, सुप्रसिद्ध बडकेलवार, गड्चिरोली जिल्हा धनुर्विद्या संघटनेचे सचिव डॉ. श्याम कोरडे, सुशील अवसरमोल, पायलेट प्रोजेक्ट धनुर्विद्या प्रशिक्षण केंद्राचे मार्गदर्शक रोशन सोळंके, कौमुदी श्रीरामवार, हिमालय शेरखी, अधीक्षक देविदास चोपडे, अधीक्षिका निमा राठोड, शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले असून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. (तभा वृत्तसेवा)



# सांगोला महाविद्यालय व्हॉलीबॉल स्पर्धेत उपविजेते

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ६ जानेवारी-**

आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज माढा येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन व्हॉलिबॉल स्पर्धेत सांगोला महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने उपविजेतेपद संपादिले.

संघातील सानिका गायकवाड आणि श्रीराम शितल यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे होणाऱ्या क्रीडा महोत्सव स्पर्धेसाठी व पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ संघात निवड झाली.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष तात्यासाहेब केदार व प्रा.पी.सी.झपके, खजिनदार नागेश गुळमिरे, सचिव ॲड. उदयबापू घोंगडे, सहसचिव साहेबराव ढेकळे तसेच या संघास मार्गदर्शन करणारे प्र. प्राचार्य डॉ. सुरेश भोसले व क्रीडा शिक्षक प्रा.जगदीश चेडे यांनी संघाचे अभिनंदन केले. कार्यकारिणी निमंत्रित सदस्य सुरेश फुले यांच्या हस्ते सदर खेळाडूंचा सन्मान करण्यात आला.

# खेळाडूंना मोठ्या स्तरावर कौशल्य सादर करण्याची संधी

## आमदार दिलीप सोपल : बार्शीत राज्यस्तरीय निमंत्रित कबड्डी स्पर्धेस सुरवात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ६ जानेवारी-**

कबड्डी हा ग्रामीण भागातील मातीतून जन्मलेला खेळ असून तो युवकांमध्ये शिस्त, संघभावना, धैर्य व जिद्द निर्माण करतो. अशा राज्यस्तरीय स्पर्धांमुळे खेळाडूंना मोठ्या स्तरावार आपले कौशल्य सादर करण्याची संधी मिळते, असे प्रतिपादन आमदार दिलीप सोपल यांनी केले.

बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेजच्या कर्मवीर क्रीडांगणावर श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी यांच्यावतीने, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन व सोलापूर जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या मान्यतेने तसेच कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त आयोजित राज्यस्तरीय निमंत्रित कबड्डी स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे हे होते. श्री. जगदाळे यांनी शिक्षणाबरोबरच क्रीडाशिक्षणाला प्राधान्य देण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी बार्शी न. प. चे मुख्याधिकारी तैमूर मुलाणी, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, संस्थेचे खजिनदार जे. सी. शितोळे, सहसचिव ए. पी. देबडवार, सचिव पी. टी. पाटील, अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ज्योती डमरे, प्रा. मोहिनी शिंदे यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. डॉ. किरण चपटे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. संजय करंडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी स्पर्धा सचिव रोहित डिसले व सहसचिव रुपाली शिंदे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेत आहेत.





# शंकरनगर येथे अखिल भारतीय त्रिमूर्ती चषक कुस्ती स्पर्धा सोमवारपासून

### दोन लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक, ७५० पेक्षा जास्त मल्लांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ६ जानेवारी-**

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समिती व प्रताप क्रीडा मंडळ शंकरनगर अकलूज यांच्यावतीने शिवतीर्थ आखाडा शंकरनगर-अकलूज येथे १२ ते १४ जानेवारी दरम्यान अखिल भारतीय त्रिमूर्ती चषक कुस्ती स्पर्धा व वजन गट कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले असल्याचे स्पर्धेचे स्पर्धा प्रमुख सयाजीराजे मोहिते पाटील यांनी सांगितले.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्याच्या कार्यालयात पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. या वेळी जयंती समारंभ समितीचे अध्यक्ष मदनसिंह मोहिते पाटील, अकलूज नगरपरिषदेचे नूतन नगरसेवक उपस्थित होते. सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समितीचे संस्थापक जयसिंह मोहिते पाटील, अध्यक्ष मदनसिंह मोहिते पाटील, प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपारांणी मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धा संपन्न होत आहेत.



सयाजीराजे मोहिते पाटील म्हणाले, स्पर्धेचे हे ४७ वे वर्ष आहे. स्पर्धेत महाराष्ट्रासह परराज्यातील राष्ट्रीय स्तरावरील मल्ल सहभागी होतात. सुमारे ७५० पेक्षा अधिक मल्ल यावर्षी स्पर्धेत सहभागी होतील. यास्पर्धेसाठी खुल्या गटाकरिता प्रथम क्रमांकाचे बक्षिस त्रिमूर्ती केसरी चषक व दोन लाख रुपये, द्वितीय क्रमांकासाठी दीड लाख रुपये, तृतिय क्रमांकासाठी एक लाख रुपये व चतुर्थ क्रमांकासाठी पन्नास हजार रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आले आहे. तर वजनी गटासाठी २५ ते ८५ किलोपर्यंत एकूण १५ गटानुसार विजेत्या व पराजित मल्लांनाही भव्य बक्षीस दिली जातात. वसंतराव जाधव म्हणाले, दि.१२ रोजी सकाळी ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत मल्लांनी आपली वजने शिवतिर्थ आखाड्यात द्यावीत. सायंकाळी ४ वाजता समितीचे अध्यक्ष मदनसिंह मोहिते पाटील व स्पर्धा प्रमुख सयाजीराजे मोहिते पाटील यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून दि.१४ रोजी सायंकाळी ६ वाजता स्पर्धेचा बक्षीस समारंभ राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील व आ. उत्तमराव जानकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या वेळी प्रताप क्रीडा मंडळाचे उपाध्यक्ष पोपटराव भोसले पाटील, सचिव बिभीषण जाधव, अरविंद वाघमोडे, दादासाहेब कोकाटे, उमेश भिंगे, बाळासाहेब सावंत, रामचंद्र मिसाळ, सुहास थोरात, सतीश शेखर आदी मान्यवर उपस्थित होते



# नूमवि मराठी शाळेत क्रीडा महोत्सवास सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जानेवारी-**

नू.म.वि. मराठी शाळेत क्रीडा महोत्सवास सुरवात झाली. याचे उदघाटन सहाय्यक पोलीस आयुक्त वाहतूक नियंत्रण कक्ष सुधीर अशोक खिरडकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाळा समितीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन, पालक शिक्षक संघाचे श्री. थोरबोले उपस्थित होते.

मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सीमा बिज्जरगी यांनी करून दिला. प्रमुख पाहुण्यांच्या सत्कार शाळेचे अध्यक्ष राजेश पटवर्धन यांच्या हस्ते भेटवस्तू देऊन करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण, क्रीडाज्योत प्रज्वलित करून, आकाशात फुगे सोडून क्रीडा महोत्सवाचे उदघाटन झाले. इ.३ री व ४ थीच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट संचलन व लेझीम नृत्य सादर केले. यांना प्रमिला निबर्गी व आशा गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. संघभावनेने खेळण्याची शपथ घेतली. यानंतर इयत्ता २री च्या विद्यार्थ्यांचे रस्सीखेच या सांघिक खेळाचे उदघाटन करण्यात आले. इ.२रीच्या विद्यार्थीनींनी सुंदर झुरमुळे नृत्य सादर केले. यासाठी शिवशंकर बिराजदार, अभिलाषा म्हेत्रे यांनी मार्गदर्शन केले. इ.१ ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांनी साहित्य कवायतीचे सादरीकरण केले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. थोरबोल यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभावती कोथमिरे यांनी केले. आशा गायकवाड यांनी आभार मानले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### लोकमंगल पतसंस्थेच्या ७५ शाखांमध्ये पत्रकारांचा सन्मान

**सोलापूर, दि. ६ जानेवारी-**
लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था, महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्रातील सामाजिक बांधिलकी जपत आज बाळशास्त्री जांभेकर जयंती राज्यभर भव्यदिव्य पद्धतीने साजरी करण्यात आली. या निमित्ताने राज्यातील एकाच दिवशी, एकाच वेळी सर्व ७५ शाखांमध्ये पत्रकारांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. पत्रकार हा समाजाला दिशा दाखवणारा दीपस्तंभ असून, लोकहितासाठी निस्वार्थ कार्य करणाऱ्या पत्रकार बंधू-भगिनींच्या योगदानाचा गौरव करण्याचा उद्देश या उपक्रमामागे होता. प्रत्येक शाखेमध्ये उपस्थित पत्रकारांना गुलाबपुष्प, स्मरणिका व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. अनेक ठिकाणी शाखा व्यवस्थापक, कर्मचारी व स्थानिक नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. या राज्यव्यापी उपक्रमाचे मार्गदर्शन संस्थापक अध्यक्ष आम दार सुभाष देशमुख, चेअरमन गुरण्णा तेली, व्हाईस चेअरमन निर्मला कुंभार तसेच सरव्यवस्थापिका अलका देवडकर यांनी केले.

### विवाहितेचा छळ; पतीसह सासरच्या पाचजणांवर गुन्हा दाखल

**बार्शी, दि. ६ जानेवारी-**
लग्नातील रुकवत, मानपान व डोहाळ जेवणाच्या कारणावरुन विवाहितेचा सातत्याने छळ केल्याचा गंभीर प्रकार बार्शी येथे उघडकीस आला. याप्रकरणी पतीसह सासरच्या पाचजणांविरोधात बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. फिर्यादी पूजा प्रशांत क्षीरसागर (वय-२६, रा. नाळे प्लॉट, बार्शी) यांनी दिलेल्या जबाबानुसार त्यांचे लग्न २४ फेब्रुवारी २०२३ रोजी प्रशांत अशोक क्षीरसागर (रा. दत्तनगर, मोडनिंब, ता. माढा) यांच्याशी धार्मिक विधीनुसार झाले होते. लग्नावेळी दोन्ही कुटुंबांनी खर्च उचलण्याचे ठरले होते. फिर्यादीच्या वडिलांनी सासरच्या मंडळींना ३ लाख ५१ हजार रुपये तसेच संसारोपयोगी साहित्य दिले होते. पती प्रशांत क्षीरसागर, सासरे अशोक क्षीरसागर, सासू वैशाली क्षीरसागर, नणंद रुपाली बागुल व नंदवा प्रसाद बागुल यांच्याविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे.



### खंडणी प्रकरणातील नितीन कांबळे यास जामीन मंजूर

**सोलापूर, दि. ६ जानेवारी-**
शिवभोजन योजनेतील हॉटेल व्यावसायिकाकडून २ लाख ४४ हजार ५००/- रुपयांची खंडणी घेतल्या प्रकरणी सदर बझार पोलीस स्टेशन येथील गुन्ह्यातील अटकेतील आरोपी /पत्रकार नितीन कांबळे यांस प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा यांनी २५ हजार रुपयांच्या जामीनावर सोडण्याचे आदेश केले आहेत.यात सविस्तर हकीकत अशी की, शिवभोजन चालक तथा हॉटेल सम ताचे इरफान शेख व अन्य शिवभोजन चालकांविरुद्ध तक्रारी अर्ज करून आणि अट्रॉसिटीची केसची धमकी देऊन रोख व फोन पे च्या माध्यमातून खंडणी घेतल्याच्या गुन्ह्यात नितीन कांबळे यांस २५ डिसेंबर २०२५ रोजी पोलिसांनी अटक केली होती. त्या गुन्ह्यात आरोपीस जामीन मिळावा, म्हणून ॲड. योगेश नागनाथ पवार यांनी जिल्हा न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता. त्या जामीन अर्जाला सरकारी वकील कुरुडकर यांनी व मूळ फिर्यादीने जोरदार विरोध केला.परंतु, आरोपीचे वकील ॲड. योगेश पवार यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा साहेबांनी आरोपीस जामीन मंजूर केला. यात आरोपीतर्फे ॲड. योगेश नागनाथ पवार आणि ॲड. दिपाली सचिन गायकवाड यांनी काम पाहिले.



### मुंबई स्टेशन यार्डमधील देखभालीच्या कामामुळे सोलापुरातून धावणाऱ्या गाड्या रद्द

**सोलापूर, दि. ६ जानेवारी-**
एलटीटी लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई स्टेशन यार्डमध्ये दुरुस्ती आणि देखभालीचे काम करण्यासाठी वाहतूक ब्लॉक घेणार आहे. या ब्लॉकमुळे सोलापूर विभागातील स्थानकांमार्गे धावणाऱ्या गाड्यांवर परिणाम आहेत. यामध्ये रद्द झालेल्या गाड्यांमध्ये सोलापूर-एलटीटी मुंबई साप्ताहिक विशेष, दि. ०६.०१.२०२६, १३.०१.२०२६, २०.०१.२०२६ आणि २७.०१.२०२६ रोजी एलटीटी मुंबई-सोलापूर साप्ताहिक विशेष, दि. ०७.०१.२०२६, १४.०१.२०२६, २१.०१.२०२६ आणि २८.०१.२०२६ रोजी या आहेत. प्रवाशांनी या परिणामांची नोंद घ्यावी आणि त्यानुसार आपल्या प्रवासाचे नियोजन करावे.



## निधन वृत्त...

### कविता राऊळ



**सोलापूर, दि. ६ जानेवारी-**
मंत्री चंडक इस्टेट येथील कविता मिलिंद राऊळ यांचे मंगळवारी सकाळी दीर्घ आजाराने निधन झाले. सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, मुलगी, जावई असा परिवार आहे. छायाचित्रकार मिलिंद राऊळ यांच्या त्या पत्नी होत.

# 'फंक्शनल मटेरियल्स अँड ॲप्लिकेशन्स' विषयावरील राष्ट्रीय परिषद उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जानेवारी-**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील भौतिकशास्त्र संकुल, बायोटेक्नॉलॉजी इंडस्ट्री रिसर्च असिस्टन्स कौन्सिल आणि पीएम उषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'फंक्शनल मटेरियल्स अँड ॲप्लिकेशन्स' या विषयावर आयोजित करण्यात आलेली दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद यशस्वीरीत्या संपन्न झाली. या परिषदेचा समारोप प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

या समारोप समारंभास भाभा अनुसंशोधन केंद्राच्या डॉ. शाश्वती सेन, डॉ. एस. एच. पवार, डॉ. बी. जे. लोखंडे, व्यवस्थापन परिषद सदस्य देवानंद चिलवंत, डॉ. प्रभाकर कोळेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. भौतिकशास्त्र संकुलाचे संचालक तथा परिषदेचे आयोजक डॉ. विकास पाटील यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून परिषदेचा उद्देश व आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली.

परिषदेदरम्यान फंक्शनल मटेरियल्स, नॅनोमटेरियल्स, ऊर्जा साठवण प्रणाली, जैववैद्यकीय उपयोग, औद्योगिक संशोधन तसेच शैक्षणिक आणि उद्योग क्षेत्रातील सहकार्य या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. देशातील विविध विद्यापीठे, संशोधन संस्था आणि महाविद्यालयांतील संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी या परिषदेत सहभाग घेतला.

परिषदेअंतर्गत घेण्यात आलेल्या पेपर प्रेझेंटेशन स्पर्धेमध्ये उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना समारोप समारंभात मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. डॉ. शाश्वती सेन यांनी संशोधन आणि उद्योग क्षेत्रातील समन्वयाचे महत्त्व अधोरेखित करत, विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण संशोधनाकडे वळावे, असे आवाहन केले. प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी अशा राष्ट्रीय परिषदा विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवृद्धी, संशोधन प्रेरणा आणि व्यावसायिक संधी निर्माण करण्यासाठी उपयुक्त ठरतात, असे मत व्यक्त केले. परिषदेमुळे विद्यापीठातील संशोधन संस्कृती अधिक बळकट होण्यास मदत झाली असून भविष्यात अशा उपक्रमांमधून विद्यापीठ आणि उद्योग क्षेत्रातील सहकार्य अधिक दृढ होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उर्वी पटेल यांनी केले. या राष्ट्रीय परिषदेच्या संयोजनामध्ये डॉ. उजमा बांगी ,श्री एस एन पवार एस.डी घोंगडे, डॉ. विपुल प्रक्षाळे डॉ.प्रसन्ना गव्हाणे, डॉ. वैभव बच्चूवार, अश्रुबा वाघमारे अविनाश मोलाने, शिवानी गावंडे, सर्जेराव सुतार डॉ स्नेहल पाटील,पृथ्वी दळवी यांनी राष्ट्रीय परिषदेच्या यशस्वी पणे पूर्ण करण्याकरिता परिश्रम घेतले



# नगरसेवक महेश इंगळे यांचे नेतृत्व सक्षम

**सामाजिक कार्यकर्त्या अरुणा मगदूम यांचे मनोगत**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ६ जानेवारी-**
नगर परिषद परिसरातील जनतेचा विश्वास जपत सलग पाचव्यांदा निवडून येणे ही महेश इंगळे यांच्या कार्य कर्तुत्वाची पोच आहे. आपल्या सेवाभावी कार्याने महेश मालक इंगळे यांनी विकास, सेवा आणि प्रामाणिकपणाचा आदर्श आपण घालून दिला आहे. या माध्यमातून महेश मालक इंगळे यांचे नेतृत्व अक्कलकोट शहराच्या प्रगतीस नवी दिशा देण्यास सक्षम असल्याचे मनोगत कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी येथील सामाजिक कार्यकर्त्या अरुणा मगदूम यांनी व्यक्त केले.

आज नुकतेच सामाजिक कार्यकर्त्या अरुणा मगदूम, उद्योजक सागर मगदूम यांनी आपल्या कुटूंबियांसमवेत येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरास भेट देवून श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदीर समितीचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांचा भारतीय जनता पार्टीचे उमेदवार म्हणून विजय झाल्याबद्दल नगरसेवक महेश इंगळे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, पुष्पहार देवून अरुणा मगदूम यांनी सत्कार केला. तसेच यावेळी मंदीर समितीच्या वतीने चेअरमन महेश इंगळे यांनीही अरुणा मगदूम, उद्योजक सागर मगदूम यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सत्कार केला. यावेळी अरुणा मगदूम बोलत होत्या. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, प्रसाद सोनार, ऋषिकेश लोणारी, सागर गोंडाळ, श्रीकांत मलवे, विपुल जाधव इत्यादी उपस्थित होते.

# युवकांनी सतर्क राहून आपल्या करिअरकडे लक्ष द्यावे

**जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायाधीश पेठकर यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ६ जानेवारी-**
सावित्रीबाई फुले यांचे कार्य ही वैचारिक क्रांती आहे. शिक्षित व सुज्ञ महिलांमुळे समाजात नैतिकतेचे संस्कार रुजतात आणि सामाजिक समतेचे वातावरण निर्माण होते. हक्क व अधिकारांचा वापर करताना कायद्याचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. सोशल मीडियाच्या गैरवापरामुळे गुन्ह्यांचे प्रमाण वाढत असून युवकांनी सतर्क राहून आपल्या करिअरकडे लक्ष द्यावे, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव, न्यायाधीश प्रशांत पेठकर त्यांनी केले.

कायदेविषयक मार्गदर्शन कार्यशाळेचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. त्यांनी बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण कायद्याची सविस्तर माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर व वसुंधरा कला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने याचे आयोजन केले होते. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात ॲड. अनुराधा कदम यांनी मनोधैर्य योजनेबाबत मार्गदर्शन केले. पीडितांना शासनाकडून मिळणारी आर्थिक मदत, संरक्षण व कायदेशीर आधार याविषयी त्यांनी माहिती दिली. दुसऱ्या सत्रात सहायक लोकअभिरक्षक सिद्धाराम म्हेत्रे यांनी चाइल्ड फ्रेंडली लीगल सर्व्हिसेस स्कीम २०२४ याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सायबर क्राईम जागृती सत्रात श्रीमती अंजली काळे यांनी सोशल मीडियाच्या आमिषाला बळी पडून होणाऱ्या फसवणुकीबाबत सावध राहण्याचे आवाहन केले. सतर्कता आणि जागरुकताच सायबर गुन्ह्यांपासून संरक्षणाचे प्रभावी साधन असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. तानाजी देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मोबाईलचा योग्य व सकारात्मक वापर करावा असे सांगितले. महापुरुषांच्या कार्यातून प्रेरणा घ्यावी, सामाजिक बंधुभाव जपावा आणि न्यायव्यवस्था टिकवण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे मार्गदर्शन केले. प्रास्ताविक संयोजिका डॉ. संगीता भोसले यांनी केले. आभार डॉ. अशोक पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन रेश्मा सुर्वे यांनी केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर चे अध्यक्ष मनोज शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवेच्या कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# जिल्हा ग्रंथालय संघाच्या अध्यक्षपदी ज्योतीराम गायकवाड



**सोलापूर, दि. ६ जानेवारी-**
जिल्ह्यातील वाचनसंस्कृती, ग्रंथालय चळवळ आणि ज्ञानप्रसाराला नवी दिशा देणारी महत्त्वपूर्ण घडामोड घडली असून सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाच्या अध्यक्षपदी पंढरपूर येथील ज्येष्ठ शिक्षक, समाजसेवक व ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते ज्योतीराम गायकवाड यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. ही निवड सन २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी करण्यात आली असून संपूर्ण कार्यकारी मंडळाची निवड बिनविरोध पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मधूकर भगरे यांनी काम पाहिले, तर लवाद म्हणून सौ. वैशाली मोरे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. निवडणूक प्रक्रियेच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक गुलाबराव पाटील यांनी केले. अनसर शेख यांनी आभार मानले.

**अन्य पदाधिकारी असे**

उपाध्यक्ष-पांडुरंग सुरवसे, कार्यवाह-साहेबराव शिंदे, सहकार्यवाह-भास्कर कुंभार, खजिनदार-सारिका माडीकर. संचालक - कुंडलिक मोरे, हरिदास रणदिवे, जयंत आराध्ये, गुलाबराव पाटील, ग्रंथमित्र विजयकुमार मोरे, ॲड. अनिल पाटील, शैलशिल्पा जाधव, अमोगसिद्ध कोळी, प्रमोद बेरे, विनोद गायकवाड, सारिका मोरे, धोंडीबा बंडगर, प्रकाश शिंदे, सोमनाथ खडतरे, विलास कदम आणि सुप्रिया किरनाळे.

# मध्य रेल्वेच्या ११ कर्मचाऱ्यांना महाव्यवस्थापक संरक्षा पुरस्कार प्रदान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जानेवारी-**
मध्य रेल्वे महाव्यवस्थापक विवेक कुमार गुप्ता यांनी दि. ०६.०१.२०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात मध्य रेल्वेच्या ११ कर्मचाऱ्यांना सुरक्षा पुरस्कार प्रदान करून सन्मानित केले. यामध्ये मुंबई विभागातील ४, पुणे विभागातील ३, भुसावळ विभागातील ३ आणि नागपूर विभागातील १ कर्मचाऱ्याचा समावेश आहे.

सदर संरक्षा पुरस्कार मागील काही महिन्यांतील कर्तव्यादरम्यान कर्मचाऱ्यांनी दाखविलेल्या सतर्कतेची दखल घेऊन, अनपेक्षित घटनांना आळा घालण्यात केलेल्या योगदानाबद्दल तसेच रेल्वे गाड्यांच्या सुरक्षित संचालनाची खात्री केल्याबद्दल प्रदान करण्यात आले. प्रत्येक पुरस्कारामध्ये पदक, प्रशस्तिपत्र, उत्कृष्ट संरक्षा कार्याची उल्लेखपत्रिका तसेच रु. ३,५००/- इतकी रोख रक्कम यांचा समावेश आहे. महाव्यवस्थापकांनी पुरस्कारप्राप्त कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या सतर्कतेचे व कर्तव्यनिष्ठेचे कौतुक केले तसेच त्यांच्या या आदर्श कार्यामुळे इतर कर्मचाऱ्यांनाही प्रवासी सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी तसेच जीवित, मालवाहतूक व रेल्वे मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी प्रतीक गोस्वामी, अतिरिक्त महाव्यवस्थापक, चंद्रकिशोर प्रसाद, प्रधान मुख्य संरक्षा अधिकारी, इतर प्रमुख विभागप्रमुख आणि मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी या प्रसंगी उपस्थित होते.

**पुरस्कार विजेत्यांचा तपशील**

बस्तीराम आव्हाड, ट्रॅक मेंटेनर, कल्याण, मुंबई विभाग, विवेक कुमार, हेल्पर (एस अँड टी), ठाणे, संतोष जाधव, इलेक्ट्रिक सिग्नल मेंटेनर (ईएसएम), दादर, बिजेंद्र कुमार राय, इलेक्ट्रिक सिग्नल मेंटेनर (ईएसएम), कुर्ला, गणेश नेमाने, ट्रॅक मेंटेनर, दौंड, पुणे विभाग सुभाष सुरेश मंडल, ट्रॅक मेंटेनर, उरुळी, पुणे विभाग, आलोक वर्मा, तंत्रज्ञ (सी अँड डब्ल्यू), दौंड, पुणे विभाग, एच. के. वर्मा, सहायक लोको पायलट, भुसावळ, भुसावळ विभाग, किशोर रमेश निकम, ट्रॅक मेंटेनर, शेगाव, भुसावळ विभाग, सरिता मोरे, हेड कॉन्स्टेबल, रेल्वे संरक्षण दल (आरपीएफ), नाशिक रोड, भुसावळ विभाग, रामसिंग सोनपुरे, कॅबिन मास्टर, मगरडोह, नागपूर विभाग आदींचा समावेश आहे.

# घरासमोरून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. ६ जानेवारी-**
जोडभावी पेठ पोलीस ठाणे हद्दीत घरासमोर उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी संजय श्रीशैल म्हंता वय ५१, रा. भुलाभाई चौक, जोडभावी पेठ, सोलापूर यांनी आपली ग्रे रंगाची होंडा कंपनीची शाईन मोटारसायकल क्रमांक एमएच १३ बीएम ३६१० दि. २ जानेवारी रोजी रात्री ८ वाजता घरासमोरील मोकळ्या जागेत उभी केली होती. मात्र, ३ जानेवारी रोजी सकाळी ६ वाजता उठल्यानंतर सदर दुचाकी जागेवर दिसून आली नाही. कोणीतरी अज्ञात चोरट्याने दुचाकी चोरून नेल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी दिनांक ५ जानेवारी रोजी दुपारी ३.३९ वाजता जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल वाडीकर करीत आहेत.

# पत्रकारांनी नैतिकता आणि जबाबदारी पाळणे आवश्यक

**सुनील सोनटक्के; जिल्हा माहिती कार्यालयात पत्रकार दिन साजरा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ जानेवारी-**
राज्यात दरवर्षी ६ जानेवारी हा दिवस पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. जिल्हा माहिती कार्यालय येथे जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के व मान्यवर ज्येष्ठ पत्रकार यांच्या हस्ते आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला



पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार शहाजान आत्तार, बाळासाहेब वाघमोडे, भगवान परळीकर, राजेंद्र पवार, चंद्रशेखर गायकवाड, योगेश तुरेराव, बिराजदार, विश्वनाथ व्हनकोरे, संतोष शेलार, अनिल शिराळकर तसेच कार्यालयातील कर्मचारी शरद नलवडे, संजय घोडके, दिलीप कोकाटे, भाऊसाहेब चोरमले, प्रविण चव्हाण, पुजा वैद्य, पंकज बर्दापूरकर उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित पत्रकारांचे जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांनी स्वागत करून त्यांना पत्रकार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच पत्रकार दिनाच्या औचित्याने बाळशास्त्री जांभेकर यांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. त्यांच्या दर्पण या वृत्तपत्राद्वारे समाजजागृती, शिक्षणप्रसार आणि राष्ट्रीय चेतना निर्माण करण्याच्या योगदानाची माहिती देण्यात आली.

जिल्हा माहिती अधिकारी सोनटक्के यांनी आपल्या भाषणात पत्रकार दिनाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, पत्रकारितेतील सत्यनिष्ठा, निष्पक्षता आणि लोकहिताचा विचार हीच खरी पत्रकार दिनाची शिकवण आहे. आधुनिक काळात डिजिटल माध्यमे, सोशल मीडिया यांचा प्रभाव वाढला असला तरी पत्रकारांनी नैतिकता आणि जबाबदारी पाळणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. शेवटी पत्रकारितेच्या गौरवशाली परंपरेला अभिवादन करण्यात आले.

# ‘ई-नाम’च्या हालचालींना वेग; पणन विभागाने मागविली माहिती

## सोलापूरसह १६ कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ डिसेंबर**

राष्ट्रीय बाजार विधेयक विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मंजूर करण्यात आले. बाजार समित्यांना राष्ट्रीय बाजारचा दर्जा देण्याबाबत कायद्यात दुरुस्ती करण्यात आली आहे. राज्यपालांच्या स्वाक्षरीनंतर विधी व न्याय विभागाने याबाबतचे गॅझेट नुकतेच प्रसिद्ध केले आहे. ई-नाम संदर्भात अर्थात राष्ट्रीय बाजार दर्जा देण्याबाबत सोलापूरसह राज्यातील १६ कृषी उत्पन्न बाजार समित्यांची माहिती पणन विभागाने मागवली आहे.

कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये वर्षभरात शेतमालाची विक्रीसाठी येणारी आवक, यामध्ये राज्याबाहेरील अन्य राज्यांतून येणारी शेतमालाची आवक किती? यावर राष्ट्रीय बाजारचा दर्जा मिळणार आहे. या दर्जासाठी पात्र होऊ शकतील, अशा कृषी उत्पन्न बाजारसमित्यांची माहिती राज्याच्या पणन विभागाकडे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पणन विभागाने कृषी उत्पन्न बाजार समितीकडून सन २०२२ ते २०२५ या तीन आर्थिक वर्षातील शेतमालाच्या आवकेची माहिती मागवली असून, संबंधित बाजार समित्यांनी ही माहिती यापूर्वीच सहकार विभागाकडे पाठवली होती. आता ती पणन विभागाकडे पाठवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानंतर पात्र असणाऱ्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांबाबत राज्य सरकार निर्णय घेणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

eNAM
उत्तम फसल, उत्तम इनाम





### या आहेत १६ बाजार समित्या

पणन विभागाने राष्ट्रीय बाजारासंदर्भात राज्यातील १६ कृषी उत्पन्न बाजार समित्यांची माहिती मागवली आहे. यामध्ये सोलापूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, पुणे, कोल्हापूर, चंद्रपूर, बुलढाणा, ठाणे, जळगाव, सांगली, जालना, वाशिम, अकोला, नागपूर, अहिल्यानगर, लातूर यांचा समावेश आहे.

### प्रमुख अटी आणि पारदर्शकता

वर्षभरात बाजार समित्यांमध्ये ८० हजार मेट्रिक टनापेक्षा अधिक शेतमालाची आवक. परराज्यातून ३० टक्क्यांपेक्षा अधिक शेतमालाची आवक. बाजार समित्यांना राष्ट्रीय बाजार दर्जा देण्याचा निर्णय घेतल्यामुळे शेतमालाच्या खरेदी विक्रीत पारदर्शकता येणार आहे. त्यासाठी देशव्यापी परवाना आणि शुल्क प्रणाली लागू होणार आहे. देशभरातील व्यापारी शेतमाल खरेदी करु शकतात.



## मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानच्या नियोजनाचे पालकमंत्री यांच्याकडून कौतुक

**तभा वृत्तसेवा,.**
**सोलापूर, दि.६ जानेवारी-**

जिल्हा परिषदेत ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाची कामाचा आढावा घेऊन नियोजन व अंमलबजावणीचे कौतुक केले. याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, ग्रामपंचायत विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ, उप मुख्य कार्यकारी अमोल जाधव यांच्यासह अभियान कक्षातील कर्मचारी उपस्थित होते.

सध्या सोलापूर जिल्ह्यात राज्य स्तरावरून विविध सेलिब्रिटी, कीर्तनकार यांचे प्रभावी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत आढावा घेतला. सोलापूर जिल्हा परिषदेचे सोलापूर जिल्ह्यात मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाच्या कामाचे नियोजनाचा आढावा घेऊन समाज माध्यमाचा प्रभावी वापर केल्याबद्दल मुक्तकंठाने कौतुक केले. अतिरिक्त सिईओ संदीप कोहिणकर यांनी जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या उपक्रमाची माहिती दिली.

या अभियानासाठी समाज माध्यमाचा प्रभावी वापर व ग्रामपंचायती मध्ये सुरू असलेले कामाचे प्रेझेंटेशन उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ यांनी केले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त सिईओ संदीप कोहिणकर यांचे सह विभाग प्रमुख व गटविकास अधिकारी प्रत्येक गावास भेट देऊन मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाचे कामांना गती देत असल्याचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ यांनी सांगितले.

करसंकलनात उत्कृष्ठ कामे केलेले ग्रामपंचायती, लेखा परिक्षण अहवालाचे शक पुर्तता अभियान, अकोला व गोपाळपूर येथील किर्तनकार कार्यक्रम, ५५ गावात अतिरिक्त ५ ग्रामसेवक कामकाज पाहणे साठी देण्यात आले असल्याचे अतिरिक्त सीईओ संदीप कोहिणकर यांनी सांगितले. कक्षातील जनसंपर्क अधिकारी सचिन जाधव, अधिक्षक सुहास चेळेकर, कक्ष अधिकारी सिध्दाराम बोरूटे, अक्षय स्वामी, अधिक्षक आप्पा भोसले, अभिनव पायंडे उपस्थित होते.



### बंगळूरू-बीदर विशेष गाड्यांच्या सेवा अतिरिक्त ३४ फेऱ्या

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ जानेवारी-**

प्रवाशांच्या मागणीनुसार, रेल्वे एसएमव्हीटी बंगळूरू आणि बीदर दरम्यान धावणाऱ्या विशेष गाड्यांच्या सेवा अतिरिक्त ३४ फेऱ्यांसाठी सुरू ठेवण्यात येणार आहेत. एसएमव्हीटी बंगळूरू-बीदर द्विसाप्ताहिक विशेष गाडी, जी २८.१२.२०२५ पर्यंत चालवण्याची घोषणा करण्यात आली होती, ती आता दर शुक्रवार आणि रविवारपर्यंत २७.०२.२०२६ पर्यंत चालवली जाईल. या गाडीच्या फेऱ्या होतील. बिदर-एसएमव्हीटी बंगळूरू द्विसाप्ताहिक विशेष गाडी, जी २९.१२.२०२५ पर्यंत चालवण्याची घोषणा करण्यात आली होती, ती आता दर शनिवार आणि सोमवारपर्यंत २८.०२.२०२६ पर्यंत चालवली जाईल. या गाडीच्या फेऱ्या होतील. या गाड्यांच्या रचनेत आणि थांब्यांमध्ये कोणताही बदल होणार नाही. या विशेष गाड्या मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील ३ स्थानकांवर थांबतील, ती म्हणजे: कलबुरगि, शहाबाद आणि वाडी असे असतील.

## टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्सच्या नावाखाली ७४ लाखांची फसवणूक

**सोलापूर, दि. ६ जानेवारी-**

टुर्स अॅण्ड ट्रॅव्हल्स व्यवसायातून भरघोस उत्पन्न मिळवून देतो, तसेच पोलीस लाईन येथील घर खाली करण्यासाठी मदत करतो, असे आमिष दाखवून एका महिलेची तब्बल ७४ लाख ६७ हजार ६५४ रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वासंती सुर्यकांत येळे (रा. सदिच्छा हौसिंग सोसायटी, मशाळवस्ती, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून स्वप्नील बाबुराव काळे (रा. कविता नगर, पोलीस लाईन, सोलापूर) याच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. फिर्यादी व आरोपी यांची ओळख डिसेंबर २०२० पासून असून, आरोपीने फिर्यादीचे वडील वारले असून पोलीस लाईन येथील घर खाली करावे लागणार आहे, तसेच टुर्स ट्रॅव्हल्स व्यवसायासाठी चारचाकी वाहनांची आवश्यकता आहे, असे सांगून फिर्यादीचा विश्वास संपादन केला.

व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नातून वाहनांचे हप्ते व नफा देण्याचे आमिष दाखवून आरोपीने फिर्यादीकडील सोने फायनान्स कंपनी व इतर सोनारांकडे गहाण ठेवण्यास भाग पाडले. तसेच वेळोवेळी बँकांमधून कर्ज काढण्यास लावून एकूण ७४ लाख ६७ हजार ६५४ रुपये इतकी फसवणूक केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. सदर गुन्हा दि. ५ जानेवारी रोजी रात्री ११.४० वाजता नोंदविण्यात आला असून, या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गायकवाड हे करीत आहेत.

## ग्रामपंचायत कार्यालय परिसरातील नऊ अतिक्रमणे हटवली



### पोलिस बंदोबस्तात दिवसभर कारवाई

### आठ अतिक्रमणधारकांनी स्वतःहून शेड काढले

**टेंभुर्णी, दि. ६ जानेवारी -**

टेंभुर्णी येथील ग्रामपंचायत कार्यालयासमोरील व लगतच्या अतिक्रमणांबाबत वारंवार सूचना व नोटिसा देऊनही अतिक्रमणधारकांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने, ग्रामपंचायत ठरावानुसार पोलीस बंदोबस्तात एकूण नऊ अतिक्रमणे हटविण्याची कारवाई करण्यात आली, अशी माहिती सरपंच सुरजा बोबडे यांनी दिली.

सोमवार, दि. ५ जानेवारी रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत ही कारवाई करण्यात आली. कारवाईनंतर आयोजित पत्रकार परिषदेत सरपंच सुरजा बोबडे बोलत होत्या. दिवसभरात काढण्यात आलेल्या अतिक्रमणांपैकी आठ अतिक्रमणधारकांनी पोलीस बंदोबस्त, जेसीबी मशीन व कर्मचारी दल पाहून स्वतःहून अतिक्रमणे काढून घेतली, तर ग्रामपंचायत आवारातील एका महिलेचे राहते पत्र्याच्या शेडचे अतिक्रमण पोलीस बंदोबस्तात हटविण्यात आले.

या कारवाईवेळी भाजप तालुकाध्यक्ष योगेश बोबडे, सरपंच सुरजा बोबडे, उपसरपंच राजश्री नेवसे, ग्रामपंचायत अधिकारी संजय साळुंखे, विस्तार अधिकारी औदुंबर शिंदे, विस्तार अधिकारी डी. एन. मिसाळ, ग्रामपंचायत सदस्य गौतम कांबळे, बाळासाहेब ढगे, जयवंत पोळ यांच्यासह ग्रामपंचायतीचे कर्मचारी व पोलीस कर्मचारी उपस्थित होते. ग्रामपंचायतीने सन २०२४ पासून ग्रामपंचायत कार्यालयासमोरील व लगत अतिक्रमण करणाऱ्या नागरिकांना वेळोवेळी नोटिसा बजावल्या होत्या. तसेच फेब्रुवारी २०२५ मध्ये अतिक्रमण हटविण्याचा ठराव मंजूर करण्यात आला होता. मात्र, माणुसकीच्या नात्याने ग्रामपंचायतीने काही काळासाठी कारवाईला तात्पुरती स्थगिती दिली होती, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. याबाबत बोलताना सरपंच सुरजा बोबडे म्हणाल्या की, ‘‘अतिक्रमण काढण्यात आलेल्या नागरिकांसाठी भविष्यात ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याचा विचार केला जाईल. तसेच ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आतापर्यंत ९२० घरकुले मंजूर करण्यात आली असून, जास्तीत जास्त गरजू नागरिकांना घरकुलांचा लाभ मिळावा यासाठी ग्रामपंचायत सातत्याने प्रयत्नशील राहील.’’



## पत्रकारांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करणार-आ.डॉ.बाबासाहेब देशमुख

**सांगोला,दि.६ जानेवारी -**

तालुक्यातील पत्रकारांसाठी अधिस्वीकृतीधारक ओळखपत्र, मेडिक्लेम, पत्रकार भवन आणि गृहनिर्माण सोसायटी या पत्रकारांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन सांगोल्याचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी केले. राष्ट्रीय पत्रकार दिनानिमित्त मंगळवार दि.६ जानेवारी रोजी स्व.डॉ. गणपतरावजी देशमुख शेतकरी सहकारी सूतगिरणी, सांगोला येथे पत्रकारांसाठी आयोजित करण्यात आलेल्या संवाद सत्र कार्यक्रमात ते बोलत होते. या संवादात सांगोला विधानसभा मतदारसंघातील भविष्यातील व्हिजन तसेच पत्रकारिता क्षेत्रातील विविध मुद्दे, आव्हाने आणि भविष्यकाळावर चर्चा करण्यात आली. कॅन्सरचे प्रमाण व हृदयरोगाचे रुग्ण हे वाढत असून शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेती करण्यावर भर द्यावा असा मौलिक सल्ला देत सांगोला तालुक्यातील पत्रकारांसाठी कार्यशाळा आयोजित करण्याचा मानस आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी यावेळी व्यक्त केला. याप्रसंगी उपस्थित पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सूतगिरणीचे मनुष्यबळ व प्रशासन व्यवस्थापक विजय वाघमोडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.एन.डी.बंडगर यांनी केले.



## महामानव प्रतिष्ठानच्यावतीने टेंभुर्णीत पत्रकारांचा सन्मान

**टेंभुर्णी, दि. ६ जानेवारी -**

मराठी पत्रकारितेचे जनक आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त ०६ जानेवारी रोजी संपूर्ण महाराष्ट्रात पत्रकार दिन साजरा केला जातो. याच औचित्याने महामानव प्रतिष्ठानच्या वतीने टेंभुर्णी व परिसरातील पत्रकार बांधवांचा सन्मान समारंभ आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात टेंभुर्णी प्रेस क्लब तसेच टेंभुर्णी शहर ग्रामीण पत्रकार संघाच्या नूतन अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये टेंभुर्णी प्रेस क्लबचे अध्यक्ष सतीश चांदगुडे, टेंभुर्णी शहर ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष धनंजय भोसले, उपाध्यक्ष विष्णू बिचकुले, सचिव राजेंद्र केदार, खजिनदार अनिल जगताप यांचा सन्मान करण्यात आला. तसेच नव्याने नियुक्ती झाल्याबद्दल ज्येष्ठ पत्रकार डी. एस. गायकवाड, श्रीकांत मासुळे व महावीर वजाळे यांचाही गौरव करण्यात आला.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार सदाशिव पवार, संतोष वाघमारे, सोपान ढगे, संतोष पाटील, गणेश चौगुले, धनंजय मोरे, हरिश्चंद्र गाडेकर, सचिन होदाडे, सुरज देशमुख, नाथा सावंत, दत्तात्रय सुरवसे आदीं पत्रकारानसह बी. के. गायकवाड, परमेश्वर खरात, नितीन खरात, विजय कोकाटे, शेखर जगताप, रामभाऊ मिटकल, रंजीत गायकवाड, समीर नाईक नवरे, विजय गायकवाड, धनंजय कांबळे, सुनील पोळ, सौरभ शिंदे,आशिष लोंढे, अनिल सोनवणे, रोहन लोंढे, कशवेद दाजी,अविनाश धोत्रे आदी पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन महामानव प्रतिष्ठानचे संस्थापकअध्यक्ष यशपाल लोंढे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. पत्रकारितेतील योगदानाबद्दल पत्रकारांचा सन्मान करून समाजात सकारात्मक संदेश देण्याचा उद्देश या कार्यक्रमातून साध्य करण्यात आला.

## अट्टल घरफोडी करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी केले जेरबंद

**सोलापूर, दि.६ जानेवारी-**

स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण यांनी अट्टल घरफोडी करणारा आरोपी जेरबंद करत एकुण ३ लाख ४४ हजारांचे सोन्या चांदीचे दागिने हस्तगत केले. सहायक पोलिस निरीक्षक विजय शिंदे व त्यांचे पथक बार्शी पोलीस ठाणे हद्दीमध्ये पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, शिवाजी चौक आडत लाईन निलंगा ता. निलंगा जि. लातूर येथे राहणारा अक्षय मारोती शिंदे हा बार्शी शहरातील रेल्वे स्टेशन येथे आहे. त्यानुसार तेथे जावून पाहिले असता तो मिळून आला. त्यास ताब्यात घेवून चौकशी करण्यात आली.



बार्शी शहर पोलीस ठाणे गु. र. क ५४९/२५ कलम ३३१ (३), ३०५ बी. एन. एस. या गुन्हयाची कबुली दिली आहे. तसेच त्यास अधिक विश्वासात घेता त्याने मी व माझा साथीदार याचेसह बार्शी शहर पोलीस ठाणे गु. र. क ८९२/२५ कलम ३३१(३) ३३१ (४), ३०५ (अ) बी. एन. एस, बार्शी शहर पोलीस ठाणे गु. र. क ५४९ / २५ कलम ३३१(३),३०५ बी. एन. एस., बार्शी शहर पोलीस ठाणे गु. र. क ६०१/२५ कलम ३३१(३),३३१ (४),३०५ (अ) बी. एन. एस. ३), बार्शी शहर पोलीस ठाणे गु. र. क १००४/२५ कलम ३३१(३),३०५ बी. एन. एस. हे गुन्हे केल्याची त्यांनी कबुली दिली. गुन्हयातील नमुद आरोपीकडून एकुण २१ ग्रॅम सोन्याचे दागीने व २० ग्रॅम चांदीचे दागीने असा एकुण ३,४४,०००/- रुपये इतक्या किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास बार्शी शहर पोलीस करीत आहेत. पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलिस अधीक्षक प्रितम यावलकर, वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक विजय शिंदे, श्रेणी पोलिस उपनिरीक्षक श्रीकांत गायकवाड, पोहेकॉ सलीम बागवान, रवी माने, अश्विनी गोटे, अनवर अत्तार, विनायक घोरपडे, मनोज राठोड, सूरज रामगुडे, अर्चना मस्के, दीपाली जाधव यांनी ही कामगिरी बजावली.

## विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाचे शौर्य संचलन

**बार्शी** : विश्व हिंदू परिषद व बजरंग दल बार्शी प्रखंड जिल्हा सोलापूर द्वारा आयोजित भव्य शौर्यसंचलन शनिवार दि.१० जानेवारी रोजी सायं ४ वा. होणार आहे. बजरंग दलाचे राष्ट्रीय सहसंयोजक विवेक कुलकर्णी, विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष प्राचार्य गजानन धरणे, विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत मंत्री किशोर चव्हाण, बजरंग दल पश्चिम महाराष्ट्र प्रांत सहसंयोजक संदेश भेगडे उपस्थित रहाणार आहेत. भगवंत मैदान येथून निघून पुढे महाद्वार चौक, वीर सावरकर चौक, पटेल चौक, ऐनापूरे मारुती चौक, आर.एस.एम. हाइट, मल्लाप्पा धनशेट्टी रोड मार्गे, शाहीर अमर शेख चौक, पांडे चौक, नगरपरिषद, नरवीर तानाजी चौक, संकेश्वर उद्यान, एकवीराई चौक मार्गे भगवंत मंदिर येथे समारोपाचा कार्यक्रम होईल, अशी माहिती विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा सहमंत्री बापूसाहेब कदम यांनी दिली.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 | **RNI No. MAHMAR/2023/86468**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## तुळजापूर-नळदुर्ग रस्त्यावर गतिरोधक बसवण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.६ जानेवारी -**

नव्याने विकसित करण्यात आलेल्या तुळजापूर-नळदुर्ग रस्त्यावर भरधाव वाहनांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून मंगरूळ पाटीपर्यंत योग्य ठिकाणी गतिरोधक बसवावेत, अशी मागणी नगरसेवक रामचंद्र रोचकरी व अश्विनी रोचकरी यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या मार्गावर वाहनांचा वेग वाढल्याने विशेषतः दुचाकीवरून प्रवास करणारे महाविद्यालयीन विद्यार्थी अपघातांना बळी पडत आहेत. नळदुर्ग रोडवर सैनिकी विद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय, नवोदय विद्यालय, आयटीआय, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तालुका क्रीडा संकुल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलींचे वसतिगृह तसेच अनेक रहिवासी सोसायट्या असल्याने या रस्त्यावर सतत वर्दळ असते.

यापूर्वी या मार्गावर गतिरोधक असल्याने अपघातांचे प्रमाण कमी होते. मात्र सध्या गतिरोधक नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. विद्यार्थी व नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने गतिरोधक बसवावेत, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### मराठी पत्रकार दिनानिमित्त लोहारा येथे पत्रकारांचा सत्कार

**लोहारा, दि.६ जानेवारी -**

आचार्य बाळशास्त्री जांभेकर जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या मराठी पत्रकार दिनानिमित्त लोहारा तालुका शिवसेना (उबाठा) पक्षाच्या वतीने पत्रकारांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. लोकमंगल मल्टिस्टेट बँक व न्यू व्हिजन इंग्लिश स्कूलचे प्राचार्य शहाजी जाधव यांच्या सहकार्याने झालेल्या या कार्यक्रमात पत्रकार निळकंठ कांबळे, जसवंतसिंग बायस, बालाजी बिराजदार यांच्यासह एकूण १६ पत्रकार बांधवांचा सन्मान करण्यात आला. यावेळी एमपीएससीद्वारे महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा राज्यपत्रित परीक्षेतून सहाय्यक अभियंता म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल सूरज दगडू जाधव यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पं.स. सदस्य चंद्रकांत पाटील होते. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय पवार, उपनिरीक्षक सचिन केंद्रे, शिवसेना (उबाठा) तालुकाप्रमुख अमोल बिराजदार यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### नगराध्यक्ष बसवराज धरणे यांचा सत्कार

**नळदुर्ग, दि.६ जानेवारी -**

नळदुर्गचे नुतन लोकनियुक्त नगराध्यक्ष बसवराज धरणे यांचा नळदुर्ग शहर माजी सैनिक संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. नळदुर्ग शहरातील विविध संघटनांकडून नुतन नगराध्यक्षांचा अभिनंदन व सत्काराचा कार्यक्रम सुरू असून त्याचाच एक भाग म्हणून माजी सैनिक संघटनेच्या वतीने हा सत्कार सोहळा पार पडला. संघटनेचे अध्यक्ष आबाजी जाधव व संघटनेच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांच्या हस्ते नगराध्यक्ष बसवराज धरणे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष आबाजी जाधव यांच्यासह संभाजी काळदाते, भारत जाधव, प्रकाश रगबले, शिवाजी माने, शिवशरण हत्ते, विश्वनाथ हत्ते, नरसु दस व सिद्धांत मुळे आदी पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.



### मंगरुळ येथे पत्रकार दिन साजरा

**मंगरूळ, दि.६ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथील लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीत पत्रकारितेची प्रथम मशाल पेटवणारे आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती व मराठी पत्रकार दिन मंगळवार दि.६ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी, शाखा मंगरुळचे शाखाधिकारी सतीश कोळी यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर मंगरुळ येथील पत्रकार चांदसाहेब शेख यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास लोकमंगलचे अधिकारी ऋषिकेश तांबे, सामाजिक कार्यकर्ते रूपेश डोंगरे, सचिन लबडे, फरीद शेख आदी उपस्थित होते.

### सशस्त्र सेना ध्वजदिन निधीस सढळ हाताने मदत करण्याचे आवाहन

**धाराशिव, दि.६ जानेवारी -**

दरवर्षी ७ डिसेंबर रोजी सशस्त्र सेना ध्वजदिन साजरा केला जातो. ७ डिसेंबर ते पुढील वर्षी ३० नोव्हेंबर




या कालावधीत हा निधी गोळा करण्यात येतो. या निधीतून शहीद जवानांच्या कुटुंबीयांच्या अडचणी दूर करणे, युद्धात अपंगत्व आलेल्या जवानांचे पुनर्वसन करणे तसेच निवृत्त सैनिकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. गतवर्षी मिळालेल्या बहुमूल्य सहकार्याबद्दल प्रशासनाने सर्वांचे आभार मानले असून सन २०२५ साठी धाराशिव जिल्ह्यास शासनाकडून ५७ लाख रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. शहीद जवानांच्या कुटुंबीयांसाठी व देशाच्या सेवेत आयुष्य वेचलेल्या जवानांच्या कल्याणासाठी नागरिकांनी ध्वजदिन निधीस सढळ हाताने मदत करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा ध्वजदिन निधी संकलन समिती, धाराशिव कीर्तीकिरण पुजार यांनी केले आहे.

### शहरात वाहतूक नियमभंगावर कारवाई

**धाराशिव, दि.६ जानेवारी -**

धाराशिव शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांनी शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर दि. ४ जानेवारी रोजी मोटार वाहन कायदा व नियमभंग प्रकरणी एकूण १०६ कारवाया केल्या. या कारवाईतून ७९ हजार ६५० रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आले आहे.

## धनगरवाडी ग्रामपंचायतीस आर.आर. (आबा) पाटील सुंदरगाव पुरस्कारात प्रथम क्रमांक



**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.६ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील धनगरवाडी ग्रामपंचायतीने आर.आर. (आबा) पाटील सुंदरगाव पुरस्कार योजनेत प्रथम क्रमांक पटकावत तालुका स्तरावरील स्मार्ट ग्राम पंचायतचा मान मिळवला आहे. या यशाबद्दल धनगरवाडी ग्रामपंचायतीस १० लाख रुपयांचे पारितोषिक मिळाले असून संपूर्ण गावातून सरपंच व ग्रामसेविकेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात धनगरवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच नागनाथ घोडके व ग्रामसेविका यांचा आमदार राणाजगजितसिंह पाटील, माजी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार व जिल्हा परिषद धाराशिवचे मुख्य कार्यकारी अधिकारी मौनक घोष यांच्या हस्ते विशेष पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

या पुरस्कारामागे तुळजापूरचे गटविकास अधिकारी हेमंत भिंगारदेवे, विस्तार अधिकारी ए.सी. कावळे, पंचायत विभाग उपमुख्य अधिकारी कुंभार, ग्रामपंचायत अधिकारी प्रिती शिलाजी घुगे यांचे मार्गदर्शन लाभले. यशात सरपंच नागनाथ नामदेव घोडके, उपसरपंच राम श्रीमंत कदम, ग्रामपंचायत सदस्य सुरेखा खंडू घोडके, सुवर्णा महादेव घोडके, जयश्री केशव एडके, अनिल किसन चव्हाण, वर्षा रमेश राठोड, पोलीस पाटील विठ्ठल हणमंत घोडके, तंटामुक्त समिती अध्यक्ष सुभाष केशव घोडके, उपाध्यक्ष मनोहर शामराव दूधभाते, तसेच सर्व ग्रामस्थ व ग्रामपंचायत कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले असल्याचे सरपंच नागनाथ घोडके यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

या यशामुळे धनगरवाडी ग्रामपंचायत विकास, स्वच्छता व लोकसहभागाचे आदर्श उदाहरण ठरली असून तालुक्यातून ग्रामपंचायतीवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## प्रभाग ७ व १० मधील महिलांसाठी सभागृह उभारण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.६ जानेवारी -**

नगरपरिषदेच्या पाठीमागील आरक्षित जागेवर असलेल्या जुन्या व सध्या बंद अवस्थेतील सार्वजनिक स्वच्छालयाच्या जागेवर प्रभाग क्रमांक ७ व १० मधील महिला व नागरिकांसाठी सभागृह बांधून देण्यात यावे, अशी मागणी येथील समाजसेवक जयकुमार नागनाथ पांढरे यांच्यासह संबंधित प्रभागातील महिला व नागरिकांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, तुळजापूर नगरपरिषदेच्या हद्दीतील जवाहर गल्ली येथे नगरपरिषदेची आरक्षित जागा असून त्या ठिकाणी पूर्वी खासदार निधीतून सार्वजनिक स्वच्छालय बांधण्यात आले होते.

मात्र सध्या या स्वच्छालयाचा कोणताही वापर होत नसून ते बंद अवस्थेत आहे. त्यामुळे ही जागा सभागृहासाठी उपलब्ध करून देऊन त्या ठिकाणी सर्वसामान्य नागरिकांसाठी उपयुक्त असे सभागृह बांधण्यात यावे.

जवाहर गल्ली, दीपक चौक, क्रांती गल्ली व मंगळवार पेठ या परिसरात भजनी मंडळातील महिलांसह नागरिकांना भजन, सांस्कृतिक तसेच छोटे-मोठे सामाजिक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी कोणतेही सार्वजनिक सभागृह किंवा मोकळी जागा उपलब्ध नाही. त्यामुळे नगरपरिषदेच्या वतीने महिलांसाठी व नागरिकांसाठी सभागृह उभारण्यात यावे, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे.

स्थानिक रहिवाशांच्या या मागणीकडे नगरपरिषद प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन लवकरात लवकर सभागृह बांधून द्यावे, अशी विनंती करण्यात आली असून सदर निवेदनावर शेकडो महिला व नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## शिवसेना (उबाठा) ची शहापूर जि.प. गट आढावा बैठक संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.६ जानेवारी -**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची मौजे इटकळ येथे शहापूर जिल्हा परिषद गटाची आढावा बैठक रविवार, दि.४ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात पार पडली. धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाप्रमुख तथा आमदार कैलास पाटील यांच्या नेतृत्वाखाली ही बैठक संपन्न झाली.

या बैठकीत शहापूर जिल्हा परिषद मतदारसंघातील सर्व बूथप्रमुख, शाखाप्रमुख, पदाधिकारी व शिवसैनिकांना आमदार कैलास पाटील यांनी मार्गदर्शन केले. येणाऱ्या निवडणुकीत शहापूर जिल्हा परिषद मतदारसंघावर शिवसेनेचा भगवा निश्चित फडकणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी लहुजी शक्ती सेनेचे श्री. कचरू सगट व त्यांच्या कार्यकर्त्यांनी जाहीरपणे शिवसेनेत प्रवेश केला. यामुळे शहापूर मतदारसंघातील शिवसेना अधिक बळकट होईल, असा विश्वास शिवसेनेचे धाराशिव जिल्हा सहसंघटक राजअहमद पठाण यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर भाजप व इतर पक्षातील अनेक कार्यकर्त्यांनीही शिवसेनेत प्रवेश केला. बैठकीदरम्यान सर्व पदाधिकारी व शिवसैनिकांनी एकमुखाने शहापूर जिल्हा परिषद मतदारसंघावर शिवसेनेचा भगवा फडकविण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला.

यावेळी तुळजापूर तालुक्यातील शिवसेनेचे प्रमुख नेते श्याम पवार, जितेंद्र कानडे, जगन्नाथ गवळी, ऋषी मगर, सुधीर कदम, सुनील जाधव, प्रदीप जोशी यांनी मार्गदर्शन केले. तसेच अमोल गवळी, अप्पू जमादार, मुरलीधर शिनगारे, विजय माशाळकर, बसवराज जमादार, बलभीम शिरगिरे, सर्व शाखाप्रमुख, पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नळदुर्ग येथे आद्यपत्रकार बाळशास्त्री जांभेकर जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.६ जानेवारी -**

दि.६ जानेवारी रोजी संपूर्ण राज्यात आद्यपत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी होत असून, त्याच पार्श्वभूमीवर नळदुर्ग शहरातही विविध ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शिवसेना शिंदे गटाचे उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके, काँग्रेसचे नगरसेवक मारुती खारवे, भाजपचे नगरसेवक दत्तात्रय दासकर, माजी नगरसेवक विनायक अहंकारी तसेच दिशा नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने पत्रकारांचा सत्कार करून त्यांना लेखणी भेट देण्यात आली.

प्रारंभी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके व काँग्रेसचे नगरसेवक मारुती खारवे यांच्या हस्ते नळदुर्ग शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष सुहास येडगे, पत्रकार संघाचे सचिव तथा नगरसेवक तानाजी जाधव, पत्रकार विलास येडगे, शिवाजी नाईक, भगवंत सुरवसे, लतिफ शेख, दादासाहेब बनसोडे, डॉ. दीपक जगदाळे, उत्तम बनजगोळे, अमर भाळे, जहीर इनामदार यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपचे नेते सुशांत भुमकर, शिवसेनेचे शहरप्रमुख शिवाजी सुरवसे, मनोज मिश्रा, शंकर वाघमारे, अफजल कुरेशी, कैलास चव्हाण, प्रमोद जाधव व नेताजी मुळे उपस्थित होते.

माजी नगरसेवक विनायक अहंकारी व भाजपचे नगरसेवक दत्तात्रय दासकर यांनीही आपल्या निवासस्थानी पत्रकारांचा सत्कार करून त्यांचा गौरव केला. यावेळी भाजपचे नेते सुशांत भुमकर, बलदेवसिंग ठाकुर, अक्षय दासकर आदी उपस्थित होते.

तसेच नळदुर्ग येथील दिशा नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीनेही पत्रकार दिनानिमित्त पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. पतसंस्थेच्या कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. राजीव कदम होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. स्वामी उपस्थित होते. शाखाधिकारी उमेश जाधव व कर्मचाऱ्यांच्या वतीने पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्रा. राजीव कदम तसेच पत्रकार व नगरसेवक तानाजी जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## नारंगवाडी येथे श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा द्वितीय वर्धापन दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.६ जानेवारी -**

अयोध्या येथील श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठेच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त नारंगवाडी येथे अभूतपूर्व उत्साहात व भक्तीमय वातावरणात भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने संपूर्ण गाव रामभक्तीत न्हाऊन निघाले असून पहाटेपासून रात्रीपर्यंत सुरू असलेल्या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे गावात भक्ती, शक्ती आणि सामाजिक एकजुटीचा अद्भुत संगम पाहायला मिळाला.

हा वर्धापन दिन सोहळा नितीनजी कुलकर्णी, खंडू माळी, हनुमंत देशमुख व अविनाश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. नारंगवाडी ग्रामस्थांच्या एकजुटीतून हा कार्यक्रम अत्यंत भव्य, शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने साजरा करण्यात आला.

सकाळी पहाटेपासूनच गावातील महिलांनी घरासमोर सडा-रांगोळी काढून, तोरणे बांधून व दिवे लावून उत्सवाचे मंगल स्वागत केले.

पारंपरिक वेशभूषेत कलश धारण केलेल्या महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतलेल्या 'श्रीराम फेरी'ने संपूर्ण गाव रामनामाच्या जयघोषाने दुमदुमून टाकले. पारंपरिक वाद्यांच्या गजरात भजनी मंडळांच्या भक्तिरसपूर्ण अभंग-भजनांमुळे वातावरण पूर्णतः राममय झाले होते.

श्रीराम मंदिरात विशेष पूजा, अभिषेक व आरतीचे आयोजन करण्यात आले होते. मूर्ती पुजारी पिंटू स्वामी व बालाजी मुळे यांनी विधिवत पौरोहित्य केले. मुख्य विनेकरी म्हणून हभप. धनराज मुगळे यांनी अत्यंत भक्तिभावाने सेवा बजावली. उपस्थित भाविकांनी श्रीरामाचे दर्शन घेऊन कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली.

या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी ध्वजवाहक व वादकांनी मोलाचे योगदान दिले.

व्यंकट सांगवे (सनातन ध्वजवाहक), प्रवीण राजपूत (पखवाज), नामदेव पवार, विकीन सांगवे, भाऊराव पवार, सुरेश पवार, संजय लोहार, परमेश्वर मुगळे, मनोहर घंटे, अजेय पवार, प्रवीण करागीर तसेच महेश लोहार (टाळकरी) यांनी आपल्या कलेतून कार्यक्रम अधिक रंगतदार केला.

या भव्य सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी सरपंच शेखर घंटे (नारंगवाडी) यांच्या नेतृत्वाखाली व्यवस्थापन समितीने अथक परिश्रम



घेतले. किशोर सांगवे, भरत मुगळे, प्रकाश पुजारी, हनुमंत सांगवे, लहू सूर्यवंशी, सचिन पवार, लखन मुळे, प्रमोद पवार, निखिल सूर्यवंशी, ज्योतिबा सूर्यवंशी, दत्ता साळुंखे, नागेश माळी, बलभीम घंटे, गजानन पाटील, आदर्श मुळे, संजय कोळी, सत्यम पुजारी, अनिल पुजारी, अमोल कांबळे, नमु पवार यांच्यासह इतर कार्यकर्त्यांनी नियोजन, व्यवस्था, शिस्त व सेवाभावातून कार्यक्रम यशस्वी केला.

## भगवान बाबा पुण्यतिथीनिमित्त अणदूर येथे धार्मिक कार्यक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.६ जानेवारी -**

येथील भगवान बाबा प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी प.पू. हभप. वै. राजयोगी संत भगवानबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने रविवार (दि.४) रोजी शिवचरित्रकार वाणीभूषण हभप. गुरुदेव महाराज चव्हाण कोपरगावकर यांचे कीर्तन पार पडले.

तर सोमवार (दि.५) रोजी हभप. महंत आप्पासाहेब महाराज चौरे (श्री सद्गुरू चंद्रशेखर बाबा संस्थान, श्री चोंडी, ता. धारूर,



जि. बीड) यांचे काल्याचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमात जवळपास पन्नास बालकलाकारांनी टाळ व मृदुंगाच्या गजराने अणदूर नगरी दुमदुमून सोडली. हरिपाठ व कीर्तन साथ देणारे प्रशांत महाराज नांदे यांनी आपल्या प्रभावी कीर्तनातून उपस्थित श्रोत्यांची मने जिंकली. कीर्तन कार्यक्रमाच्या सुरुवातीला हभप. राजयोगी संत भगवानबाबा, हभप. संत वामनभाऊ महाराज तसेच स्व. गोपीनाथजी मुंडे यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

यानंतर समस्त समाजबांधव व ग्रामस्थांच्या वतीने हभप. आप्पासाहेब महाराज चौरे यांचा वै. हभप. भगवान बाबा प्रतिष्ठानच्या वतीने सन्मान करण्यात आला. बुधवार दि.५ जानेवारी रोजी अणदूर गावामधून बाल वारकरी, समाजबांधव व किर्तनप्रेमींच्या सहभागाने टाळ-मृदुंगासह भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली.

या धार्मिक कार्यक्रमांचा समारोप कै. मोतीराम अंबाजीराव घुगे यांच्या स्मरणार्थ उध्दव मोतीराम घुगे यांच्या वतीने देण्यात आलेल्या महाप्रसादाने करण्यात आला.

दि.४ व ५ जानेवारी रोजी झालेल्या सर्व धार्मिक कार्यक्रमांना अणदूर येथील समाजबांधव, भगवान बाबा प्रतिष्ठान समितीचे पदाधिकारी, सदस्य व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून महाप्रसादाचा लाभ घेतला.

## लोहाऱ्यात हरिनाम सप्ताहास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.६ जानेवारी -**

दि. ६ जानेवारीपासून शहरात हरिनाम सप्ताहाची सुरुवात झाली आहे. या निमित्ताने श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ६ जानेवारी रोजी शहरातील लोहारा हायस्कूलच्या मैदानावर विधिवत पूजा करून सप्ताहास प्रारंभ करण्यात आला.

मान्यवरांच्या उपस्थितीत गणपती, श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ, संत तुकाराम महाराजांची गाथा, संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, संत मारुती महाराज कानेगावकर, विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमांसह टाळ, मृदंग, वीणा आदींची पूजा करण्यात आली.

यावेळी नगराध्यक्षा वैशाली खराडे, उपनगराध्यक्ष अमिन सुबेकर, चंद्रकांत पाटील, नगरसेवक अविनाश माळी, जालिंदर कोकणे, प्रशांत काळे, दीपक मुळे, विजयकुमार ढगे, रवि कुलकर्णी, राजेंद्र माळी, अभिमान खराडे, ओम कोरे, दत्तात्रय बिराजदार, शंकर अण्णा जट्टे, चेतन बोडगे, हरी लोखंडे, उमाकांत भरारे, बालाजी मक्तेदार, राहुल मक्तेदार, शिवमूर्ती मुळे, भरत बादुले यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगराध्यक्षा सौ.स्वाती हुडे यांनी पदभार स्वीकारला

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि.५ जानेवारी :** माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली उदगीर नगर परिषद सार्वत्रिक निवडणुक - २०२५ मध्ये भारतीय जनता पार्टी व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या युतीचा दणदणीत विजयी होवुन थेट जनतेतून उदगीर नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदी सौ.स्वाती सचिन हुडे या मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्या त्यामुळे त्यांचा काल दि.५ जानेवारी रोजी माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांच्या उपस्थितीत नगराध्यक्षा सौ.स्वाती सचिन हुडे यांनी नगराध्यक्ष पदाचा पदभार स्विकारला. यावेळी आ.संजय बनसोडे यांनी त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देवून सत्कार करुन शुभेच्छा दिल्या.

यावेळी शहरातील २० प्रभागातील ४० नवनिर्वाचित नगरसेवकांचा नगर परिषद प्रशासनाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी आमदार गोविंदराव केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, माजी नगराध्यक्ष बस्वराज बागबंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य राहुल केंद्रे, माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, भगवानराव पाटील तळेगावकर,



सुधीर भोसले, माजी नगरसेवक सचिन हुडे, मंजुर पठाण, ज्येष्ठ नागरिक शंकर हुडे, वसंत पाटील, सय्यद जानीमियाँ, शशिकांत बनसोडे, अनकल्ले आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार संजय बनसोडे यांनी, आज पासून नगराध्यक्षासह सर्व नगरसेवकांनी जनतेची सेवा करण्यासाठी तत्पर राहून सेवा करावी व आपली नगर परिषद ही लातूर जिल्ह्यात नंबर एकची नगर परिषद म्हणून नावारुपाला आणावे असे आवाहन केले. जगाच्या नकाशावर आपल्या उदगीरची एक नवी ओळख निर्माण झाली असुन आपली संस्कृती जपण्याचे काम आपण सर्वांनी करावे. विकासाच्या कामासाठी हातात हात घालुन काम करा आणि शहरातील सर्वसामान्यांना मूलभूत सुविधा पुरवा असे सांगितले. येत्या सहा महिन्याच्या आत नुतन इमारतीच्या कामाला सुरुवात करणार असुन एक भव्य इमारत आपण उभारणार असल्याचे आ. संजय बनसोडे यांनी यावेळी सांगितले.

# औसा पत्रकार संघाच्या वतीने पत्रकारांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**औसा दि. ६ जानेवारी :** औसा तालुका पत्रकार संघाच्या वतीने दिनानिमित्त औसा येथील कम्प्युटर पार्क च्या सभागृहामध्ये बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून तालुका पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी तालुका पत्रकार संघाच्या वतीने उपस्थित सर्व पत्रकारांचा डायरी व पेन देऊन सत्कार करण्यात आला.

औसा तालुका पत्रकार संघाच्या वतीने घेण्यात आलेल्या पत्रकार दिन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रा. काशिनाथ सगरे हे होते. यावेळी सेवानिवृत्त शिक्षक तथा पत्रकार पी सी पाटील राष्ट्रवादी काँग्रेसचे बालाजी शिंदे माहेश्वरी कॉम्प्युटरचे संचालक सुमित शिंदे लहुजी साळवे कर्मचारी संघटनेचे तालुकाध्यक्ष संभाजी शिंदे लोकमंगल मल्टीस्टेट चे औसा येथील शाखा व्यवस्थापक जिवन ढोबळे सेवानिवृत्त प्रा. नजीर शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.

औसा तालुक्यातील व शहरातील सर्व पत्रकारांच्या वतीने बाळशास्त्री जांभेकरांच्या प्रतिमेचे पूजन करून पत्रकार दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष प्रा. काशिनाथ सगरे, सुधीर गंगणे, विजय बिराजदार, संजय सगरे, विलास तपासे, विठ्ठल पांचाळ, बालाजी उबाळे, विवेक देशपांडे, चांद पठाण, मुख्तार मणियार, इलियास चौधरी, गिरीधर जंगाले, गणेश बिराजदार, किशोर जाधव, हंसराज पाटील, ज्ञानेश्वर कोलते, मझहर पटेल, कल्याण जंगाले, विनायक मोरे, शिवाजी मिसाळ, एस ए काझी उपस्थित होते. राम कांबळे यांनी सुत्रसंचालन तर रमेश शिंदे यांनी आभार मानले.

## चाकूर नगर पंचायत कार्यालय, चाकूर जि. लातूर

### घराची फेरफार जागेची नोंद बाबत

जाहिर प्रगटन करण्यात येते की, खालीलप्रमाणे मालमत्ता हस्तांतरणासंबंधी नगर पंचायत कार्यालय चाकूर येथे अर्ज प्राप्त झालेली असून संबंधित मालमत्तेच्या मालकी हक्काबाबत कोणाची उजरदारी असेल तर त्यांनी आजपासून ७ दिवसांपर्यंत सबब पुराव्यासह नगर पंचायत कार्यालय चाकूर येथे उजरदारी सादर करावी अन्यथा कोणाची उजरदारी नाही असे समजून मालमत्ता हस्तांतरण करण्यात येईल. यानंतर येणाऱ्या उजरदारीचा विचार करण्यात येणार नाही यांची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | लिहून देणार | लिहून घेणार | न. पं. क्र/प्लॉट नं. लांबी रुंदी | चतु:सीमा |
|---|---|---|---|---|
| १ | निशिगंध रेसीडेंसी एल. एल. पि. तर्फे भागीदार १) गणपत नरसिंग पटणे २) शिवकुमार विरभद्र उस्तुर्गे ३) सूर्यकांत नागनाथअप्पा थोंटे पाटील | सुनिल गोविंदराव मुरकुटे | जमीन गट नं. ५१०/१/६ मधील प्लॉट नं. ५७ पूर्व- ९.१४ मीटर पश्चिम - ९.१४ मीटर दक्षिण १६.४६ मीटर उत्तर १६.७९ मीटर विक्रीचे एकूण क्षेत्रफळ - १५१.९५ | पूर्वेस - ९ मीटरचा अंतर्गत रस्ता पश्चिमेस - गट नं. ५१० पार्ट दक्षिणेस - प्लॉट नं. ५६ उत्तरेस - प्लॉट नं. ५८ |
| २ | निशिगंध रेसीडेंसी एल. एल. पि. तर्फे भागीदार १) गणपत नरसिंग पटणे २) शिवकुमार विरभद्र उस्तुर्गे ३) सूर्यकांत नागनाथअप्पा थोंटे पाटील | सुनिल गोविंदराव मुरकुटे | जमीन गट नं. ५१०/१/६ मधील प्लॉट नं. ६० पूर्व - ८.०० मीटर पश्चिम - ८.०० मीटर दक्षिण १६.८५ मीटर उत्तर १७.०७ मीटर विक्रीचे एकूण क्षेत्रफळ - १३५.६८ चौरस मीटर | पूर्वेस - ९ मीटरचा अंतर्गत रस्ता पश्चिमेस - गट नं. ५१० पार्ट दक्षिणेस - प्लॉट नं. ५९ उत्तरेस - प्लॉट नं. ६१ |
| ३ | माऊली बिल्डर्स अँड डेव्हलपर्स यांच्या तर्फे भिमराव विश्वनाथ इगे | विवेकानंद राम रेड्डी | गट नं. ५०९/१/२ न. पं. मी. क्र. ४९२० प्लॉट नं. ९ पूर्व पश्चिम - १२.१९ मीटर दक्षिण उत्तर - ९.१४ मीटर ज्यामध्ये पूर्व पश्चिम - १० फुट व दक्षिण उत्तर - ४० फुट आर. सी. सी. बांधकाम | पूर्वेस - भिमराव विश्वनाथ इगे व हुडगे यांचे राहते घर पश्चिमेस - २० फुटाचा रस्ता दक्षिणेस - open space (खुली जागा) उत्तरेस - २० फुटाचा रस्ता |
| ४ | माऊली बिल्डर्स अँड डेव्हलपर्स यांच्या तर्फे भिमराव विश्वनाथ इगे | विवेकानंद राम रेड्डी | गट नं. ५०९/१/२ न. पं. मी. क्र. ४९२१ प्लॉट नं. १० पूर्व पश्चिम - १२.१९ मीटर दक्षिण उत्तर - १०.२२ मीटर ज्यामध्ये पूर्व पश्चिम - २५ फुट व दक्षिण उत्तर - ४० फुट आर. सी. सी. बांधकाम | पूर्वेस - भिमराव विश्वनाथ इगे व हुडगे यांचे राहते घर पश्चिमेस - २० फुटाचा रस्ता दक्षिणेस - open space (खुली जागा) उत्तरेस - २० फुटाचा रस्ता - |
| ५ | इसाक अब्दुलनबीसाब शेख | १) अफरीनबेगम अजीद शेख २) सीमा आसेफ पठाण | जमीन गट क्र. ५१५/१ मधील प्लॉट नं. ५१ पूर्व पश्चिम - ९.२१ मीटर दक्षिण उत्तर पूर्व १५.३९, दक्षिण उत्तर पश्चिम १५.२५ मीटर एकूण १४१.१० चौ. मीटर | पूर्वेस - मुरलीधर मनोहर कुलकर्णी यांची जमीन पश्चिमेस - प्लॉट क्र. ५० दक्षिणेस - ९ मीटरचा रस्ता उत्तरेस प्लॉट क्र. ५२ |
| ६ | १) शिवाजी संभाजी बेल्लाळे २) रामेश्वर संतराम बेल्लाळे | दस्तगीर चाँदखाँ पठाण | न. पं.मी. क्र. ३२७२ पूर्व पश्चिम १८ मीटर दक्षिण उत्तर - १२.१९ मीटर एकूण विक्रीचे क्षेत्रफळ - २१९.४२ चौ. मीटर | पूर्वेस - रेणुका मारोती गायकवाड यांची जागा पश्चिमेस - ६ मीटरचा रस्ता दक्षिणेस - ६ मीटरचा रस्ता उत्तरेस संजय सांगवे यांची जागा |
| ७ | मल्हारी केरबा शेळके | दत्ता लक्ष्मण शेळके | न. पं. मी. क्र. ४२०१ पूर्व पश्चिम ५० फुट दक्षिण उत्तर - २० फुट बरोबर १००० चौ. फुट, ९२.९३ चौ. मीटर | पूर्वेस - अनिता मोकाशे यांची जागा पश्चिमेस - रस्ता दक्षिणेस - भुजंग काळे यांची जागा उत्तरेस पिराजी सुरवसे यांची जागा |
| ८ | अ. समद मुसा शेख | रोशनबी दस्तगीर पठाण | न. पं. मी. क्र. ३२९८ पूर्व पश्चिम - १५.२९ मीटर दक्षिण उत्तर - ९.१४ मीटर बरोबर एकूण क्षेत्रफळ - १३९.७५ चौ. मीटर. | पूर्वेस - कुसुम शहाजी जानकर यांची जागा पश्चिमेस - रस्ता दक्षिणेस - रस्ता उत्तरेस - सुजीत दयानंद रेड्डी यांची जागा. |
| ९ | सुनीता सुनिल साळी | १) अंजना शुभम साळी २) सानवी शुभम साळी ३) समर्थ शुभम साळी | न. पं. मी. क्र. १९३६ मधील साईज १३.१० फुट X ४० फुट बरोबर ५२४ फुट व १३.१० फुट X ४० फुट बरोबर ५२४ फुट असे एकूण क्षेत्रफळ - १०४८ चौरस फुट | हक्कसोड आधारे फेरफार पूर्वेस इस्माईल उस्मानसाब लालूभाई पश्चिमेस - संतराम ज्ञानोबा सावंत दक्षिणेस महंमदसाब गणी शेख उत्तरेस - रोड. |
| १० | अखिल सलीम शेख | शेख निलोफरबेगम शेख नवाब | न. पं. मी. क्र. ५८७१ पूर्व पश्चिम - ९ मीटर दक्षिण उत्तर - १२ मीटर विक्रीचे एकूण क्षेत्रफळ - १०८ चौरस मीटर | पूर्वेस- दस्तगीर यांची जागा पश्चिमेस समद सरदार पटेल यांची जागा दक्षिणेस - अंजनाबाई सुभाष शिंदे यांची जागा उत्तरेस - ६ मीटर रुंदीचा रस्ता |
| ११ | इसाक अब्दुलनबीसाब शेख | १) अफरीनबेगम अजीद शेख २) सीमा आसेफ पठाण | जमीन गट क्र. ५१५/१ मधील प्लॉट नं. ५१ पूर्व पश्चिम - ९.२१ मीटर दक्षिण उत्तर पूर्व - १५.३९ मीटर दक्षिण उत्तर पश्चिम - १५.२५ मीटर एकूण १४१.१० चौ. मीटर | पूर्वेस - मुरलीधर मनोहर कुलकर्णी यांची जमीन पश्चिमेस - प्लॉट क्र. ५० दक्षिणेस - ९ मीटरचा रस्ता उत्तरेस प्लॉट क्र. ५२ |
| १२ | राजेश्वर अण्णाराव पाटील | १) सुनीता राजेश्वर पाटील २) कांचन राजेश्वर पाटील ३) भाग्यता राजेश्वर पाटील | न. पं. मी. क्र. ३४१८ साईज ४०.६ X ४०.६ फुट | मृत्यू प्रमाणपत्र व न्यायालयीन वारस प्रमाणपत्र |
| १३ | १) रामराव केरबा झांबरे २) अनुसयाबाई रामराव झांबरे | दत्तात्रय रामराव झांबरे | न. पं. मी. क्र. १९० पैकी वाटणीपत्र आधारे फेरफार वाटून आलेली साईज पूर्व पश्चिम - ५५ फुट दक्षिण उत्तर २५ फुटापैकी साईज पूर्व पश्चिम - २० फुट व दक्षिण उत्तर २५ फुट ज्याचे एकूण क्षेत्रफळ - ५०० चौरस फुट नगर भूमापण क्र. २३७ प्रमाणे क्षेत्र ४६.५० चौरस मीटर | पूर्वेस - बंडू रामराव झांबरे यांना आज रोजी वाटून आलेले घर जागा पश्चिमेस - रस्ता दक्षिणेस चंदन मारुती बावलगावे यांची घर जागा उत्तरेस - ओमकार सुरेश फुलारी यांची घर जागा. |
| १४ | सईद हुसेन हरणमारे | १) निषाद सईद हरणमारे २) शाहिद सईद हरणमारे ३) अलिशा सईद हरणमारे | न. पं. मी. क्र. १५५५/२, ६४ (सरणवाडीतील मालमत्ता), ६४९७ | वारसा आधारे फेरफार |
| १५ | नरेश पिता राजेश्वरराव पाटील | भरत पिता काशिनाथ चिटबोणे | गट नं. ४६७/१/९ पैकी प्लॉट नं. ३ न. पं. मी. क्र. ३७८५ पूर्व पश्चिम - ११ मी, दक्षिण उत्तर - १४ मी एकूण क्षेत्र १५४ चौ.मी. १६५७.०४ चौ. फुट | पूर्वेस - सदरील मंजुर रेखांकनामधील सोडण्यात आलेला ६ मीटर रुंदीचा रस्ता पश्चिमेस - सदरील मंजुर रेखांकनामधील माझ्या मालकीचा प्लॉट नं. २ दक्षिणेस सदरील मंजुर रेखांकन सोडण्यात आलेला ६ मीटर रुंदीचा रस्ता उत्तरेस - मैनुद्दीन महंमदसाब यांनी विक्री केलेली जमीन |

**स्वाक्षरित**

**मुख्याधिकारी**

**नगर पंचायत, चाकूर**

# यूडीआयडी कार्ड दिलेल्या अपंगांच्या खात्यावर पगार जमा

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि.५ जानेवारी :** निलंगा तालुक्यातील युडीआयडी कार्ड जमा केलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांच्या बँक खात्यात प्रत्येकी दरमहा रु २५००/- प्रमाणे पगारी अनुदान जमा केले असून एवढी णञ्खऊ कार्ड जमा न केलेल्या लाभार्थ्याने लवकरात लवकर आपले यूडीआयडी कार्ड व आधार कार्ड निलंगा तहसील कार्यालयात जमा करावे असे आवाहन नायब तहसीलदार अनिल धुमाळ यांनी केले आहे.

निलंगा तालुक्यात संजय गांधी निराधार योजनेचे २३९५ , श्रावण बाळ राज्य निवृत्तीवेतनाचे १८० व केंद्र पुरस्कृत योजनेचे ८६ असे एकुण २६६१ दिव्यांग लाभार्थी आहेत. त्या लाभार्थ्यांपैकी १५८० लाभार्थींनी आपली कागदपत्रे जमा केलेली आहेत. त्यातील १५८० दिव्यांग लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर प्रत्येकी प्रतिमहा रु २५०० प्रमाणे पगारी अनुदान जमा केले आहे. कार्ड जमा न केलेल्या १०८१ अपंग लाभार्थ्यांनी अपंगत्वाचे प्रमाणपत्र व आधार कार्डचे झेरॉक्स प्रत निलंगा तहसील कार्यालयात तात्काळ सादर करावे.

# पत्रकार हा प्रशासनातील, लोकप्रतिनिधी मधला दुवा : पाटील



**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि.५ जानेवारी :** पत्रकार हा समाजाचा आरसा असून पत्रकार हा प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्या मधला दुवा आहे. पत्रकाराच्या माध्यमातून समाजाचे प्रतिबिंब उमटते असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी केले. चाकूर तालुका पत्रकार संघ आणि व्हॉइस ऑफ मीडिया यांच्या वतीने दर्पण दिनानिमित्त आरोग्य शिबिर व हेल्मेट वाटप कार्यक्रमाचे आयोजन चाकूर येथील पदव्युत्तर कृषी व्यवस्थापन महाविद्यालयात करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते.

व्यासपीठावर माहिती संचालक डॉ. शाम टरके, राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे, गटविकास अधिकारी संतोष वांगवडे, प्राचार्य डॉ. संतोष कांबळे, विशाल जाधव, सरपंच डॉ. भालचंद चाटे, नरसिंह घोणे, धनंजय कोरे, डॉ. विवेक होळे पाटील, निलेश मद्रेवार, पपन कांबळे, अनिल वाडकर, वर्धमान कांबळे, विष्णू तिकटे, संदीप शेटे, बिलाल पठाण, श्रीनाथ सावंत, ओम केंद्रे, नाथा मद्रेवार, विश्र्वनाथ पाटील, अर्जुन भोईटे, सह विविध मान्यवर उपस्थित होते. यापुढे बोलताना सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले की, पत्रकारिता ही समाजाला न्याय देण्यासाठी असते व चाकूरचे पत्रकार समाजाला न्याय देण्याचा कायम प्रयत्न करत असतात. चाकूरच्या पत्रकारांनी सामाजिक बांधिलकी समजून पत्रकारांच्या कुटुंबीयांची व इतर नागरिकांची तपासणीत कार्यक्रम हाती घेऊन त्यांच्या सुरक्षितेसाठी हेल्मेट वाटपाचा हा स्तुत्य उपक्रम असल्याचे ना पाटील म्हणाले.

प्रास्ताविक तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संग्राम वाघमारे यांनी केले. तसेच व्हॉइस ऑफ मीडियाचे तालुकाध्यक्ष विनोद निला, नरसिंह घोणे, माजी सभापती ज्योती स्वामी, सरपंच डॉ. भालचंद्र चाटे, यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रशांत शेटे, गणेश स्वामी यांनी केले. कार्यक्रमासाठी पत्रकार संघाचे सचिव संजय पाटील, संगमेश्वर जनगावे, माधव वाघ, माधव तरगुडे, शिवशंकर टाक, सदाशिव मोरे, सतिश गाडेकर,राजकुमार जगताप, अशोक बिराजदार, साखराप्पा वाघमारे, दयानंद सूर्यवंशी, दत्ता मेहकरे, सुशील बाघमारे, विकास स्वामी, दतात्रय बेबडे, किशन वडारे, पांडुरंग साळुंके, युसूफ शेख, चेतन होळदांडगे, बसवेश्र्वर जनगावे, दीपक पाटील, सुनील जाधव, नवनाथ डिंगोळे, रियाज मणियार, गजानन चेऊलवार, बालाजी काटमपल्ले, देविदास हेमनर सह आदींनी पुढाकार घेतला.

## चाकूर नगर पंचायत कार्यालय, चाकूर जि. लातूर

### घराची फेरफार जागेची नोंद बाबत

जाहिर प्रगटन करण्यात येते की, खालीलप्रमाणे मालमत्ता हस्तांतरणासंबंधी नगर पंचायत कार्यालय चाकूर येथे अर्ज प्राप्त झालेली असून संबंधित मालमत्तेच्या मालकी हक्काबाबत कोणाची उजरदारी असेल तर त्यांनी आजपासून ७ दिवसांपर्यंत सबब पुराव्यासह नगर पंचायत कार्यालय चाकूर येथे उजरदारी सादर करावी अन्यथा कोणाची उजरदारी नाही असे समजून मालमत्ता हस्तांतरण करण्यात येईल. यानंतर येणाऱ्या उजरदारीचा विचार करण्यात येणार नाही यांची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | लिहून देणार | लिहून घेणार | न. पं. क्र/प्लॉट नं. लांबी रुंदी | चतु:सीमा |
|---|---|---|---|---|
| १ | विठ्ठल भिमराव केंद्रे | महेश शिवाजी कल्याणे | जमीन गट नं. ५०८/१/१ ज्याचा प्लॉट नं. २७ न. पं. मी. क्र. ६८२१ पूर्व बाजु - १०.५२ मी, पश्चिम - ९.७६ मी, दक्षिण - १३.५० मी, उत्तर बाजु १३.५० मी विक्रीचे एकूण क्षेत्रफळ - १३७ चौरस मीटर | पूर्वेस - ९ मीटरचा अंतर्गत रस्ता पश्चिमेस प्लॉट नं. २१ दक्षिणेस ९ मीटरचा अंतर्गत रोड, उत्तरेस - प्लॉट नं. २६. |
| २ | यल्लाबाई केशव शेनरोड | नुरजहां मुक्तार पिरजादे | जुना जमीन सर्वे नं. १८७/ब नवीन जमीन गट नं. ४५३/१/२ मधील प्लॉट नं. ३५ पैकी न. पं. मी. क्र. १७०८ पैकी पूर्व पश्चिम - ४० फुट दक्षिण उत्तर ४५ फुट पैकी विक्री साईज पूर्व पश्चिम - २७ फुट दक्षिण उत्तर ४५ फुट विक्रीचे एकूण क्षेत्रफळ - १२१५ चौरस फुट ११२.९१ चौरस मीटर | पूर्वेस ३३ फुटाचा डोंगर रस्ता पश्र्चिमेस विक्रेत्याची शिल्लक जागा दक्षिणेस २० फुटाचा रस्ता उत्तरेस - रजियाबी बशीरसाब तांबोळी यांचा प्लॉट नं, २८ |
| ३ | राबीयाबी रज्जाकसाब शेख (मयत) | १) सलीम रज्जाकसाब शेख २) हुसेन रज्जाकसाब शेख ३) एकबाल रज्जाकसाब शेख ४) नजमुन्नीसा मोहम्मद हबीबुद्दीन अन्सारी ५) लतीफा शकिफ शेख | न न. पं. मी. क्र. ३०९१ | मृत्यू प्रमाणपत्र व न्यायालयीन वारस प्रमाणपत्र |
| ४ | दिपक विठ्ठलराव मद्दे | जोगदंड सौदागर गिरजाप्पा | जमीन गट नं. ४३२ मधील प्लॉट नं. २७ व २८ पैकी प्लॉट नं.पं.मि.क्र.३९५३ पैकी पूर्व पश्चिम ४६ फूट दक्षिण-उत्तर ५ फूट विक्रीचे एकूण क्षेत्रफळ २३० चौरस फूट २१.३७ चौरस मीटर. | पूर्वेस -अरुणा लक्ष्मण हुडगे यांचे घर, पश्चिमेस- २० फुटाचा रस्ता, दक्षिणेस - आज रोजी गोपाळ खरटमोल यांची याच मिळकतमधील खरेदी केलेला प्लॉट, उत्तरेस- खरेदीदार जोगदंड सौदागर गिरजाप्पा यांचा प्लॉट. |
| ५ | १) चंद्रकांत गोविंद एनकफळे २) जगन्नाथ मल्हारी गोलावार ३) सरदार मौलाबेग मंगरुळे | अंगद प्रल्हाद गवळे | जमीन गट नं. ५१०/१/४ मधील प्लॉट नं. ३ पूर्व-पश्चिम दक्षिण बाजू २०.७४ मीटर, पूर्व-पश्चिम उत्तर बाजू २०.८५ मीटर, दक्षिण-उत्तर पूर्व बाजू- १० मीटर, दक्षिण-उत्तर पश्चिम बाजू १० मीटर, एकूण क्षेत्रफळ २०७.९८ चौरस मीटर | पूर्वेस -१५ मीटरचा रस्ता, पश्चिमेस- प्लॉट नं. ६ व ७ चा भाग, दक्षिणेस-प्लॉट नं. २, उत्तरेस- प्लॉट नं. ४ |
| ६ | माधवराव किशनराव देवकत्ते (मयत) | १) वैशाली महादेव देवकत्ते २) ओंकार महादेव देवकत्ते न. ३) मृणाली महादेव देवकत्ते ४) अन्नपूर्णा किशनराव देवकत्ते | जमीन गट नं.मी. क्र.४४६२ प्लॉट नं. २२ ज्याची साईज ४० बाय ४० | मृत्यू प्रमाणपत्र व न्यायालयीन वारस प्रमाणपत्र |
| ७ | प्रदीप वामनराव जाधव | दिपक धोंडीराम पाटील | जमीन गट नं. ५०५/१/१ ज्याचा प्लॉट नं. ६ पूर्व पश्चिम दक्षिण बाजु - ८ मी पूर्व पश्चिम उत्तर बाजु १२ मी दक्षिण उत्तर बाजु - १२ मी विक्रीचे एकूण क्षेत्रफळ १२० चौरस मीटर | पुर्वेस - प्लॉट नं. ५, पश्चिमेस- तांबोळी यांची जमीन, दक्षिणेस-प्लॉट नं. ४ विवेकानंद भोरे यांचा, उत्तरेस ६ मीटरचा अंतर्गत रस्ता |
| ८ | शोभा विनोद सूर्यवंशी | उत्कर्ष उमाकांतराव अजनसोंडकर | जमीन गट नं. २७९ मधील प्लॉट नं.११, पूर्व-पश्चिम-१२.१९ मीटर, दक्षिण-उत्तर-१६.६० मीटर, एकूण क्षेत्रफळ २०२.३५ चौरस मीटर. | पूर्वेस -९ मीटरचा रस्ता, पश्चिमेस- प्लॉट नं. १, दक्षिणेस-९ मीटरचा रस्ता, उत्तरेस-प्लॉट नं. १० |
| ९ | वैजनाथ तुकाराम महालिंगे (मयत) | १) बालाजी वैजनाथ महालिंगे २) निलावती वैजनाथ महालिंगे ३) पांडुरंग वैजनाथ महालिंगे ४) बाबासाहेब वैजनाथ महालिंगे ५) तुकाराम वैजनाथ महालिंगे ६) सुनीता जणार्धन कांबळे ७) अनीता गोरख गायकवाड ८) निर्मला वैजनाथकुमार कांबळे | न. पं. मी. क्र.१४५० | मृत्यू प्रमाणपत्र व न्यायालयीन वारस प्रमाणपत्र |
| १० | बहादूर महेताब पठाण | १) हुसेन बहादूरखाँ पठाण २) इस्माईल बहादूर पठाण ३) हाकानी बहादूर पठाण ४) इब्राहीम बहादूर पठाण ५) रुकियाबी बहादूर पठन ६) शहाजानबी इसाक शेख ७) यास्मिन इसाक सय्यद | न. पं. मी. क्र.१५७९ | मृत्यू प्रमाणपत्र व न्यायालयीन वारस प्रमाणपत्र |
| ११ | अख्तरबाबु आजमसाब कोतवाल | नसीमा हिदायत शेख | न. पं. मी. क्र.३२५५ पूर्व-पश्चिम-९.२० मीटर, दक्षिण-उत्तर १३ मीटर = ११९.६० चौरस मीटर. | पूर्वेस - लहू संजय मानपाडे यांची नं.प.मि. क्र. ३२५५ पैकी जागा, पश्चिमेस- ६ मीटरचा रस्ता, दक्षिणेस-वागलगावे यांची जागा, उत्तरेस- ६ मीटरचा रस्ता |
| १२ | मुक्तार सय्यद पटेल | बेबीफातेमा अहमद शेख | जमीन गट नं. ४०१/१/३ मधील प्लॉट नं.१२ पूर्व बाजू १२.०० मी. पश्चिमेस-१२.०० मी., दक्षिण-७.५० मी., उत्तर-७.५० मी. विक्रीचे एकूण क्षेत्रफळ ९०.०० चौरस मीटर. | पूर्वेस -प्लॉट नं.१३, पश्चिमेस-प्लॉट नं.११, दक्षिणेस-९ मीटरचा अंतर्गत रस्ता, उत्तरेस-दापकेवाले यांची जमीन. |
| १३ | महादेवी काशिनाथ गादगे | १) मोमीन रेशमा मुबारक २) साजिद अल्लावदिन सय्यद | जमीन गट नं. ५१८/१/२ प्लॉट नं. ४ अकृषी झालेला पुर्व पश्चिम दक्षिण - १०.८० मीटर पूर्व पश्चिम उत्तर १४.१७ मीटर दक्षिण उत्तर पूर्व- ११.६६ मीटर दक्षिण उत्तर पश्चिम - ११.१४ विक्रीचे एकूण क्षेत्रफळ - १३९.६९ चौरस मीटर | पुर्वेस - प्लॉट नं. ५ पश्चिमेस प्लॉट नं. ३ दक्षिणेस - ९ मीटरचा अंतर्गत रस्ता उत्तरेस हाळे यांची जमीन |
| १४ | इर्शाद शब्बीर शेख | महादेवी काशिनाथ गादगे | जमीन गट नं. ५१८/१/२ प्लॉट नं. ४ अकृषी झालेला पुर्व पश्चिम दक्षिण - १०.८० मीटर पूर्व पश्चिम उत्तर १४.१७ मीटर दक्षिण उत्तर पूर्व- ११.६६ मीटर दक्षिण उत्तर पश्चिम - ११.१४ विक्रीचे एकूण क्षेत्रफळ - १३९.६९ चौरस मीटर | पुर्वेस - प्लॉट नं. ५ पश्चिमेस प्लॉट नं. ३ दक्षिणेस - ९ मीटरचा अंतर्गत रस्ता उत्तरेस हाळे यांची जमीन |
| १५ | नागोराव अंबाजी गुंडेवाड | शिवकुमार शंकरराव गादगे | न. पं.मी. क्र. २०३८ पूर्व पश्चिम ३० फुट दक्षिण उत्तर - ४० फुट विक्रीचे एकूण क्षेत्रफळ - १२०० चौरस फुट १११.५२ चौरस मीटर | पूर्वेस - जागा क्र. ५६ पश्चिमेस - जागा क्र. ५४ साधना अर्जुन मद्रेवार यांची मिळकत दक्षिणेस - पाटील कुटुंबियांची मिळकत उत्तरेस - लातूर- नांदेड रोड |

**स्वाक्षरित**

**मुख्याधिकारी**

**नगर पंचायत, चाकूर**

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## पत्रकार दिनानिमित्त पत्रकार बांधवांचा परंड्यात सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.६ जानेवारी -**
मराठी पत्रकार दिनानिमित्त परंडा तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांचा भाजपा नेते मा.आ. सुजितसिंह ठाकूरसाहेब यांनी संपर्क कार्यालय, परंडा येथे सत्कार करुन मराठी पत्रकार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी भाजपा तालुकाध्यक्ष अरविंद रगडे, ॲड. संतोष सुर्यवंशी, रमेशसिंह परदेशी, ॲड. जहीर चौधरी, तानाजी पाटील, निशिकांत क्षिरसागर, अविनाश विधाते, समरजीतसिंह ठाकूर, अकिब पठाण यांच्या पत्रकार बांधव उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### जिल्हा माहिती कार्यालय येथे बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन

**धाराशिव, दि.६ जानेवारी -**
दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र दर्पण ची सुरुवात केली. ६ जानेवारी हा दिवस पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसानिमित्त आज जिल्हा माहिती कार्यालय येथे आयोजित कार्यक्रमात बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन करण्यात आले. जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे यांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला. यावेळी पत्रकार धनंजय रणदिवे, विभीषण लोकरे, राजू गंगावणे, प्रवीण पवार, जिल्हा माहिती कार्यालयाचे वरिष्ठ लिपिक नंदू पवार व आशा बंडगर, वाहन चालक मोहन कोळी कनिष्ठ लिपिक दिलीप वाठोरे, चित्रा घोडके व अनील वाघमारे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.



### व्हॉईस ऑफ मीडियाच्यावतीने पत्रकार दिन साजरा

**धाराशिव, दि.६ जानेवारी -**
आद्य पत्रकार, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त व्हॉईस ऑफ मीडियाच्यावतीने जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन दि.६ जानेवारी रोजी करण्यात आले. यावेळी जांभेकर यांच्या कार्यावर जिल्हाध्यक्ष हुंकार बनसोडे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास व्हॉईस ऑफ मीडियाचे जिल्हाध्यक्ष हुंकार बनसोडे, जिल्हा सरचिटणीस आकाश नरोटे, धाराशिव तालुकाध्यक्ष कुंदन शिंदे, कार्याध्यक्ष अल्ताफ शेख, सरचिटणीस सचिन वाघमारे, सलीम पठाण, कलीम मुसा सय्यद, अमजद सय्यद, अजर शेख, जफर शेख, किरण कांबळे, प्रशांत सोनटक्के, प्रशांत मते, विशाल जगदाळे, सुरेश चव्हाण, विनोद कोकाटे, बळीराम खटके आदी उपस्थित होते.

### विलासराव देशमुखांविषयी वादग्रस्त वक्तव्य; डॉ. प्रतापसिंह पाटील यांचा तीव्र निषेध

**धाराशिव, दि.६ जानेवारी -**
लातूर येथे काँग्रेसचे दिवंगत नेते व माजी मुख्यमंत्री स्वर्गीय विलासराव देशमुख यांचे नाव घेऊन केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावर राज्यभर संताप व्यक्त होत आहे. या वक्तव्याचा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) धाराशिव जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी तीव्र शब्दांत निषेध केला आहे. डॉ. पाटील म्हणाले की, स्व. विलासराव देशमुख हे सर्वमान्य, संयमी आणि विकासाभिमुख नेते होते. अशा थोर नेत्यांविषयी अशोभनीय वक्तव्य करणे दुर्दैवी असून, सध्याचे राजकारण खालच्या पातळीवर जात असल्याचे दर्शवते. त्यांनी या वक्तव्यामुळे राज्यातील जनभावना दुखावल्या असून तीव्र नाराजी निर्माण झाल्याचे नमूद केले.





### प्रतिभा निकेतन विद्यालय मुरूम येथे आचार्य बाळशास्त्री जांभेकर जयंती साजरी

**मुरूम, दि.६ जानेवारी -**
उमरगा तालुक्यातील मरूम येथील प्रतिभा निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, मुरूम येथे दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती मंगळवारी (दि.६) उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे प्राचार्य उल्हास घुरघुरे यांच्या हस्ते आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानिमित्ताने उपस्थित पत्रकारांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमास फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सादक वली, रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, राजेंद्र कारभारी, जमीर शिकलकर, राजेंद्र घोडके, महेश निंबरगे, रामलिंग पुराणे, अमोल गायकवाड, अजिंक्य मुरूमकर, जगदीश सुरवसे, बालाजी व्हनाजे, नाहीरपाशा मासूलदार, हुसेन नुरसे, डॉ. नागोराव बोईनवाड, डॉ. शिला स्वामी, प्रा. वैष्णवी पाटील, डॉ. रवींद्र गायकवाड, डॉ. प्रतापसिंग राजपूत आदी मान्यवर उपस्थित होते.

# जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने दर्पण दिन उत्साहात साजरा

**पत्रकारांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यासाठी स्व. व्यंकटेश हंबीरे पत्रकारिता पुरस्कार सुरु करणार : संतोष हंबीरे**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ जानेवारी -**
आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केलेल्या दर्पण या मराठी पत्रसृष्टीतील पहिल्या अनियतकालिकाच्या निमित्ताने दर्पण दिन आज ६ जानेवारी रोजी जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले.

यावेळी जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष देविदास पाठक यांनी पत्रकार बांधवांना दर्पण दिनाच्या शुभेच्छा देत आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या पत्रकारितेतील विविध पैलूंवर प्रकाश टाकला. त्यांनी बदलती पत्रकारिता, त्यानुसार होत चाललेले बदल, तसेच धाराशिव जिल्ह्याच्या विकासात पत्रकारांची भूमिका याविषयी जिल्हा पत्रकार संघाच्या उपक्रमांची माहिती दिली.

कार्यक्रमास जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे आणि कार्यालयीन कर्मचारी नंदू पवार उपस्थित होते व त्यांनी सर्वांसह आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून सर्व पत्रकारांना शुभेच्छा दिल्या.

जेष्ठ पत्रकार राजाभाऊ वैद्य यांनी पत्रकारांना दर्पण दिनाच्या शुभेच्छा देत, धाराशिव जिल्ह्याच्या विकासासाठी पत्रकारांनी एकजूट दाखवण्याचे आवाहन केले. तसेच, दैनिक संघर्षचे संपादक संतोष हंबीरे यांनी धाराशिव जिल्ह्यातील विकासात्मक पत्रकारितेसाठी काम करणाऱ्या पत्रकारांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्याची गरज व्यक्त केली. त्यांनी स्व. व्यंकटेश हंबीरे पत्रकारिता पुरस्कार सुरू करण्याची सूचना देखील केली. जिल्हा पत्रकार संघाचे सचिव रवींद्र केसकर यांनी मागील वर्षभरात पत्रकारांसाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमांची माहिती देत, आगामी काळातही विविध उपक्रम जिल्हा पत्रकार संघाच्या माध्यमातून राबविण्यात येतील, असा संदेश दिला. कार्यक्रमास पत्रकार संघाचे उपाध्यक्ष गोविंदसिंह राजपूत, तालुकाध्यक्ष मच्छिंद्र कदम, जिल्हा कार्यकारणी सदस्य तसेच दैनिक आरंभ मराठीचे संपादक चंद्रसेन देशमुख, टीव्ही नाईनचे जिल्हा प्रतिनिधी श्रीराम क्षीरसागर, दैनिक लोकमतचे जिल्हा प्रतिनिधी चेतन धनुरे, दैनिक सकाळचे जिल्हा प्रतिनिधी राजेंद्रकुमार जाधव, सुधीर पवार, प्रशांत कावरे, शितल वाघमारे, बाळासाहेब मुंदडा, कालिदास म्हेत्रे, दैनिक तरुण भारतचे धाराशिव आवृत्ती उपसंपादक विपीन वीर, लोकशाही वृत्तवाहिनीचे धाराशिव जिल्हा प्रतिनिधी काकासाहेब कांबळे, तसेच अजय पारवे, किशोर माळी, आकाश नरोटे, सलीम पठाण, रहीम शेख, जुबेर शेख आदी पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमातून पत्रकारितेच्या महत्त्वाची जाणीव निर्माण झाली आणि पत्रकार बांधवांच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

## येरमाळा पत्रकार संघाच्या वतीने महिला पत्रकार पुरस्कार सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.६ जानेवारी -**
पत्रकार दिनानिमित्त येरमाळा पत्रकार संघाच्या वतीने विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण आणि तानुबाई बिर्जे विशेष महिला पत्रकार पुरस्कार सोहळा दि. ६ जानेवारी रोजी येरमाळा पत्रकार बहुउद्देशीय सामाजिक संस्था संचालित अभ्यासिका कार्यालयाच्या प्रांगणात उत्साहात पार पडला.



या कार्यक्रमात धाराशिव येथील तीस वर्षे पत्रकारितेचा अनुभव असलेल्या शिला उंबरे यांचा सन्मान तानुबाई बिर्जे महिला पत्रकार पुरस्कार देऊन करण्यात आला. यावेळी रत्नदीप बारकुल (निरीक्षक वैद्यमापन शास्त्र, राजपत्रित), वैभव कवडे (राज्यकर निरीक्षक अधिकारी), जयदेवी कांबळे (पुरवठा निरीक्षक, तहसील कार्यालय कळंब), महिला ज्येष्ठ पत्रकार शीला उंबरे, माजी सभापती विकास बारकुल यांची प्रमुख उपस्थिती होती.

येरमाळा पत्रकार संघाच्या वतीने दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त विविध शाळांमध्ये घेतलेल्या स्पर्धांचे बक्षीस वितरण देखील करण्यात आले. भविष्यात मराठवाड्यासह राज्यातील महिला पत्रकारांना तानुबाई बिर्जे पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

कार्यक्रमादरम्यान येरमाळा पत्रकार अभ्यासिका इमारतीचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे सांगितले गेले असून, काही दिवसांत विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका उपलब्ध होणार आहे. कार्यक्रमास सरपंच प्रिया बारकुल, वैद्यकीय अधिकारी डॉ. सुधाकर बिरादार, सहायक पोलीस निरीक्षक तात्याराव भालेराव, डॉ. पल्लवी तांबारे (संचालक येडाई व्यसनमुक्ती फाउंडेशन), सचिन पाटील (संस्थापक विद्यानिकेतन विद्यालय येरमाळा), प्राचार्य सुनील पाटील (ज्ञानोद्योग विद्यालय येरमाळा), सतोष तौर, सुधीर पायाळे, तसेच विद्यार्थी, शिक्षक, पत्रकार, आशा कार्यकर्ती, अंगणवाडी सेविका व मदतनीस, ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दत्ता बारकुल, सूत्रसंचालन प्रा. महादेव गपाट यांनी केले तर आभार सचिन बारकुल यांनी मानले.

याचसोबत स्व. प्रमोद महाजन शेती पुरक सेवा सहकारी संस्था, मलकापूर ता. कळंब यांच्या वतीने येरमाळ्यातील पत्रकारांचा सत्कार संस्थेचे चेअरमन सुधीर पायाळे, संतोष तौर, सुंदर लोमटे यांच्या हस्ते करण्यात आला.

## बोरखेडा गावातील रस्ता, शेतरस्ते व स्मशानभूमीचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ जानेवारी -**
बोरखेडा गावाच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून गावातील रस्ता, शेतरस्ते व स्मशानभूमी या विकासकामांचे भूमिपूजन भाजपा नेते श्री. नितीन काळे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. गावकऱ्यांच्या दैनंदिन सोयीसुविधा, स्वच्छता व मूलभूत गरजा लक्षात घेऊन ही विकासकामे मार्गी लावण्यात आली आहेत.

ही सर्व विकासकामे आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या माध्यमातून मंजूर झालेल्या निधीतून करण्यात येत असून, यामुळे बोरखेडा गावाच्या विकासाला भक्कम पाठबळ मिळाले आहे. तसेच आगामी काळात गावामध्ये ५० लाख रुपयांपेक्षा अधिक रकमेची विविध विकासकामे लवकरच सुरू होणार असून, त्यामुळे पायाभूत सुविधा अधिक सक्षम होतील व विकासाला नवी गती मिळेल.

लोकसहभाग, विश्वास आणि विकास यांचा संगम साधत बोरखेडा गाव प्रगतीच्या नव्या वाटेवर वाटचाल करत असल्याचे मत यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. गावाचा विकास, हीच खरी सेवा या भावनेतून ही कामे राबविण्यात येत असल्याचे नमूद करण्यात आले.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून बालाजी गावडे लाभले. तसेच नितीन काळे, नितीन शेरखाने, साधु पुरी महाराज, रामेश्वर पाटील, प्रेमनाथ पाटील, जगनाथ सुरवसे, हनुमंत कवडे, दिलीप गायकवाड यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत जिल्हाभर जनजागृती कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ जानेवारी -**
रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव यांच्या वतीने दि.१ जानेवारी ते ०५ जानेवारी २०२६ या कालावधीत जिल्ह्यात विविध जनजागृतीपर कार्यक्रम राबविण्यात आले.

दि.५ जानेवारी रोजी येडशी टोल नाका येथे मोटार वाहन निरीक्षक सुनील शिंदे व सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक विशाल भगरे यांनी टोल नाका कर्मचारी, वाहतूक पोलीस कर्मचारी व वाहनचालकांना रस्ता सुरक्षेबाबत प्रबोधन केले. यावेळी बॅनर प्रदर्शित करून माहितीपत्रकांचे वाटप करण्यात आले. तसेच मोटार वाहन निरीक्षक सुशांत धुमाळे व सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक सिद्धेश्वर मस्के यांनी वाहन चालविताना मोबाईलचा वापर टाळणे, दुचाकीस्वारांनी हेल्मेट परिधान करणे, चारचाकी वाहनधारकांनी सीट बेल्ट वापरणे, अपघातग्रस्तांना मदत करणे तसेच मद्यपान करून वाहन न चालवण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. पारगाव टोल नाका येथे मोटार वाहन निरीक्षक सचिन बंग व सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक शिवाजी बहीर यांनी रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत वाहनचालकांना रस्ता सुरक्षेसंबंधी माहिती पुस्तिकांचे वाटप केले. यावेळी मोबाईलचा वापर टाळणे, हेल्मेट व सीट बेल्टचा वापर, अपघातग्रस्तांना मदत करणे आणि मद्यपान करून वाहन न चालवणे याबाबत सूचना देण्यात आल्या. तसेच बॅनर प्रदर्शित करून माहितीपत्रकांचे वितरण करण्यात आले.

तलमोड टोल नाका येथे स्टिकर व बॅनरद्वारे प्रबोधन तलमोड टोल नाका येथे मोटार वाहन निरीक्षक उदयकुमार केंबळे, विकास डोंगरे व सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक कुलदीप पवार यांनी टोल नाका कर्मचाऱ्यांसोबत रस्ता सुरक्षेचे स्टिकर्स लावले. यावेळी बॅनर प्रदर्शित करून माहितीपत्रकांचे वाटप करण्यात आले व वाहनचालक तसेच नागरिकांना रस्ता सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

## उमरगा तालुक्यात दर्पण दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.६ जानेवारी -**
तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांच्या वतीने दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्मदिवस दर्पण दिन म्हणून मंगळवारी (ता. ६) शासकीय विश्रामगृह येथे उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार बालाजी माणिकवार होते. प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ पत्रकार मारुती कदम, नारायण गोस्वामी, बालाजी वडजे, महेबुब पठाण उपस्थित होते.

कार्यक्रमात शरद गायकवाड, माणिकवार, कदम यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच अविनाश काळे, समिर सुतके, प्रा. युसुफ मुल्ला, प्रदीप भोसले, नसरुद्दीन फकीर, विठ्ठल चिकुंद्रे, विशाल देशमुख, आकाश पोतदार, लक्ष्मण पवार, महादेव पाटील, माधव सूर्यवंशी, नंदकुमार जाधव, रोहित गुरव, आदीनाथ भालेराव, गुणवंत पवार, दत्ता नांगरे, आकाश पोतदार, संभाजी पाटील, अमोल गायकवाड, बालाजी साने, तानाजी घोडके आदी पत्रकार उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गुंडू दुधभाते यांनी केले, सूत्रसंचलन अमोल पाटील यांनी केले तर आभार गो.ल. कांबळे यांनी मानले.

# पत्रकार हा समाजमनाचा आरसा असतो : डॉ. जितेंद्र कानडे

**श्री श्री गुरुकुलच्या वतीने मराठी पत्रकार दिनानिमित अणदूर मधील २० पत्रकारांचा सन्मान**

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.६ जानेवारी -**
आजच्या काळात पत्रकारितेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले असून ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेला खऱ्या अर्थाने न्याय मिळवून देण्याचे महत्त्वाचे कार्य पत्रकार करीत असतात. पत्रकारिता करणे ही सहज व सुलभ गोष्ट नसून पत्रकार हा समाजमनाचा आरसा आहे, असे प्रतिपादन श्री श्री गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष डॉ. जितेंद्र कानडे यांनी केले.



ते श्री श्री गुरुकुल शाळेच्या वतीने आयोजित मराठी पत्रकार दिनानिमित्त अणदूर येथील पत्रकारांच्या सन्मान सोहळ्यात अध्यक्षस्थानावरून बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

पुढे बोलताना डॉ. कानडे म्हणाले की, आज शाळा ज्या उंचीवर पोहोचली आहे त्यामागे अणदूरमधील पत्रकारांचे मोलाचे योगदान आहे. त्या योगदानाची जाणीव ठेवून, आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना पत्रकार व पत्रकारितेचे महत्त्व समजावे या उद्देशाने हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. पत्रकार हा लोकशाहीचा चौथा खांब असून समाजात त्यांना मोठा मान-सन्मान आहे, असेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमात अणदूर येथील राजेंद्र स्वामी, अजय अणदूरकर, दयानंद काळुंके, चंद्रकांत गुड्डु, चंद्रकांत हगलगुंडे, शिवशंकर तिरगुळे, गुरुनाथ कबाडे, सचिन तोग्गी, संजीव आलूरे, नागेश करपे, लक्ष्मण नरे, लक्ष्मण दुपारगुडे, आकाश आलकुंटे, आर. एस. गायकवाड, किरण कांबळे, राहुल कांबळे, राहुल अंकुश कांबळे, प्रसन्न कंदले आदी सुमारे २० पत्रकारांचा शाल, पुष्पगुच्छ, पेन, डायरी व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी पत्रकार राजेंद्र स्वामी, दयानंद काळुंके, शिवशंकर तिरगुळे, गुरुनाथ कबाडे आदींनी पत्रकारितेवर सखोल विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार तथा मुख्याध्यापक लक्ष्मण नरे यांनी केले, सूत्रसंचालन बंडगर यांनी केले तर आभार भुजबळ यांनी मानले.

कार्यक्रमास डॉ. हरिदास मुंडे, डॉ. रुपाली कानडे, शालेय विद्यार्थी व शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. वंदे मातरम् नंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## अवैध मद्य विक्रीप्रकरणी दोन गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ जानेवारी -**
वाशी पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध मद्यविक्रीविरोधात कारवाई करत पोलिसांनी दोन वेगवेगळ्या ठिकाणी मद्य जप्त करून दोन व्यक्तींविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

पहिल्या प्रकरणात आरोपी दिपक अंकुश चव्हाण (वय ३१, रा. पाखरुड ता. भुम जि. धाराशिव) याच्याकडे दि. ५. जानेवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास पाखरुड शिवारात त्याच्या पत्र्याच्या शेडलगत अवैध विक्रीच्या उद्देशाने ठेवलेल्या अंदाजे ९६० रुपये किमतीच्या देशी-विदेशी दारूच्या १२ सिलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तज्ज्ञ शिक्षकांच्या तात्पुरत्या नियुक्त्या; ९ जानेवारीला मुलाखत

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ६ जानेवारी :** युपीएससीमार्फत होणाऱ्या कंम्बाईंड डिफेन्स सर्व्हिसेस एक्झामिनेशन (सीडीएस) २०२६ च्या तयारीसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे तज्ज्ञ शिक्षकांची तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्यात येणार आहे. या शिक्षकांना प्रति तास रुपये ३०० असे मानधन दिले जाणार आहे. तरी पात्र प्राध्यापकांनी ९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी साडेदहा वाजता मुलाखतीसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, विभागीय आयुक्त कार्यालय परिसर, नाशिक रोड, नाशिक येथे उपस्थित राहावे.

प्रशिक्षणाचा कालावधी सीडीएस-६६ कोर्ससाठी १९ जानेवारी २०२६ ते ३ एप्रिल २०२६ आणि सीडीएस-६७ कोर्ससाठी १५ जून २०२६ ते २८ ऑगस्ट २०२६ असा दोन टप्प्यात राहील. इंग्रजी, गणित, सामान्य ज्ञान-(सामान्यज्ञान, भूगोल, इतिहास, भारतीय राजकारण) आणि सामान्य विज्ञान या विषयांसाठी तज्ज्ञ शिक्षकांची आवश्यकता आहे. यासाठी संबंधित अभ्यासक्रमाशी निगडित पदवीधर किंवा पदव्युत्तर असणे आवश्यक आहे. तसेच स्पर्धा परीक्षांच्या तयारीबाबत कमीत कमी दोन वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असणे बंधनकारक आहे.



# निर्भीडता, समाजहित या मूल्यांशी निष्ठा राखणे हीच खरी पत्रकारिता : अमोल तांबे

**त.भा. वृत्तसेवा,**

**रेणापूर,** ६ जानेवारी : सत्य, निर्भीडता आणि समाजहित या मूलभूत मूल्यांशी निष्ठा राखणे हीच आजच्या पत्रकारितेची खरी गरज असल्याचे प्रतिपादन पोलीस अधिक्षक अमोल तांबे यांनी केले.

मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त रेणापूर तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने मंगळवार, दि. ६ जानेवारी रोजी येथील रेणूका देवी मंदिर सभागृहात पत्रकारांच्या सन्मानार्थ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलीस अधिक्षक तांबे बोलत होते. मंचावर तहसिलदार प्रशांत थोरात, ग्रामीण रुग्णालयाच्या अधिक्षका डॉ. अनिता अलगुले, जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप, महावितरणचे उपकार्यकारी अभियंता सी. बी. काळे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्रीधर रेड्डी, ज्येष्ठ पत्रकार विठ्ठल कटके, चंद्रकांत कातळे, पत्रकार संघाचे अध्यक्ष नामदेव शिंदे, प्राचार्य सिध्देश्वर मामडगे, ॲड. तानाजी कणसे, ॲड. प्रशांत अकनगिरे, उटगे गुरुजी, सरपंच रमेश कटके यांच्यासह यांची प्रमुख उपस्थिती होती.



पोलीस अधीक्षक तांबे यांनी यावेळी बोलताना, विज्ञानाच्या युगात पत्रकारितेत फार मोठा बदल आहे. तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे डिजिटल मीडिया, सोशल मीडिया, वेब पोर्टल्स यांचा प्रभाव दिवसेदिवस वाढत आहे. बातम्या क्षणात पोहोचत असल्या तरी त्यामध्ये सखोलता, सत्यता व सामाजिक बांधिलकी कमी होत असून टीआरपी, व्ह्यूज आणि जाहिरातींच्या स्पर्धेत अनेकदा सनसनाटीपणा, अफवा व अप्रमाणित माहितीला प्राधान्य दिली जात असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन करण्यात आले . तर श्रीराम विद्यालयाच्या महादेव बन यांनी स्वागत गित सादर केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तालुक्यांतील पत्रकारांचा पेन, डायरी पुष्पगुच्छ देवुन सन्मान करण्यात आला.

यावेळी तहसिलदार थोरात व ग्रामीण रुग्णालयाच्या अधिक्षका डॉ अलगुले यांनी मनोगत व्यक्त करताना पत्रकार दिनाच्या शुभेच्छा दिल्या . कार्यक्रमाचे प्रास्ताविक चंद्रकांत कातळे यांनी केले. सूत्रसंचलन अमृतेश्वर स्वामी यांनी तर आभार निजाम शेख यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सिद्धार्थ चव्हाण, रफीक शिकलकर, ईश्वर बद्दर, कोंडीराम काळे, भरत भोसले, बालाजी कटके, शिवाजी येमते, सुधाकर दहिफळे यांनी परिश्रम घेतले.

## मुख्यमंत्र्यांची आज लातुरात प्रचार सभा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ६ जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपा उमेदवारांच्या प्रचारासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे बुधवार दि. ७ जानेवारी रोजी लातूर येथे येत आहेत. सकाळी ११ वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथील मैदानावर मुख्यमंत्र्यांची प्रचार सभा होणार आहे.



मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या प्रचार सभेस जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले, माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष बस्वराज पाटील मुरुमकर, आ. रमेश कराड, कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, आ. अभिमन्यू पवार, माजी खा. सुनिल गायकवाड यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

या सभेत मुख्यमंत्री लातूरच्या विकासाचा रोडमॅप सादर करणार आहेत. लातूर मनपा क्षेत्रातील भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते, नागरिक आणि मतदारांनी यासभेस मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन निवडणूकप्रमुख आ. संभाजी पाटील निलंगेकर, डॉ. सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर व शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले आहे.

## २५ अंध युवक-युवतींना मसाज प्रशिक्षण प्रमाणपत्राचे वितरण

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ६ जानेवारी :** सामाजिक उत्तरदायित्व कार्यक्रमांतर्गत अंध युवक - युवतींसाठी आयोजित मसाज प्रशिक्षण शिबिरातील २५ प्रशिक्षणार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.बुधोडा, ता. औसा येथील ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान संचलित स्वाधार अंध-अपंग प्रशिक्षण व पुनर्वसन केंद्रात ऍटलास कॉपको (इंडिया) लि . यांच्यावतीने हे प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले.

यावेळी बोलताना प्रतिष्ठानचेअध्यक्ष हरिश्चन्द्र सुडे यांनी या शिबिराच्या माध्यमातून दिव्यांगांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा हा प्रयत्न असल्याचे सांगितले. आज समाजात अनेक अंध तरुण बेरोजगार आहेत.

दिव्यांग व्यक्ती हे समाजाकडून घेणारे नव्हे तर भरभरून देणारे व्हावेत, हाहीया उपक्रमागचाप्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी प्रशिक्षण घेतलेल्या २५ जणांना प्रमाणपत्र व व्यवसाय किट तसेच पुनर्वसन निधी म्हणून प्रत्येकी पाच हजार रुपयांचा धनादेश देण्यात आलं.या ऍक्युप्रेशर व मसाज चिकित्सा प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून आतापर्यंत महाराष्ट्रातील ५०० हुन अधिक अंध दिव्यांगांना अशा प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

याप्रसंगी दत्तात्रय पवार, शांतीलाल सुबा, हरिकिशोर उपाध्याय यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कमलाकर बावगे यांनी केले. सूत्रसंचालन हरीश काळे यांनी केले तर आभार प्रदर्शन आकाश साबळे यांनी केले

## आशा स्वयंसेविकांना आ. कराडांनी दाखवला आशा चित्रपट

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ६ जानेवारी :** ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या आशा स्वयंसेविकांच्या कार्यावर प्रकाश टाकणारा त्यांची कहाणी मांडणारा राज्य शासनाचा सर्वोत्कृष्ट पुरस्कार प्राप्त आशा हा सिनेमा आ. रमेशआप्पा कराड यांच्या वतीने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील चारशे आशा स्वयंसेविकांना मंगळवारी दाखवण्यात आला. यावेळी युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड हे आवर्जून उपस्थित होते. सिनेमागृहातून चित्रपट पाहून बाहेर आल्यानंतर ऊर्जा मिळाल्याचे प्रत्येक आशा स्वयंसिकांच्या चेहऱ्यावर दिसून येत होते.

ग्रामीण भागातील महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यामध्ये आशा स्वयंसेविकांचे मोठे योगदान असून त्यांचे कार्यावर प्रकाशझोत टाकणारा आणि ग्रामीण भागाचे वास्तव सांगणारा आशा हा सिनेमा नुकताच प्रदर्शित झाला या सिनेमात अभिनेत्री रिंकू राजगुरू यांनी आशा स्वयंसेविकेच्या भूमिकेला न्याय दिला असून पगारीसाठी नव्हे तर स्वतःच्या समाधानासाठी काम करणाऱ्या (मालती) आशा हिच्या चेहऱ्यावर संयम, डोळ्यात तगमग आणि आतून असणारी जिद्द दिसून आली. चालत रहा पुढे हे गीत प्रेक्षकांना ऊर्जा देऊन जाते.

चित्रपट सुरू होण्याअगोदर उपस्थित आशा स्वयंसेविका यांच्याशी संवाद साधताना युवा नेते ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, आशा स्वयंसेविकांचे समाजातल्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणारे मोठे कार्य आहे या कार्याची आ. रमेशआप्पा कराड यांनी वेळोवेळी दखल घेतली असून प्रेरणा मिळावी यासाठीच आशा चित्रपट दाखविण्याचा सुयोग त्यांनी घडून आणला आहे असे बोलून दाखवले.

याप्रसंगी भाजपाचे वसंत करमूडे, चंद्रकांत कातळे, भाऊसाहेब गुळबिले, ओम चव्हाण, राम भताने, दिलीप पाटील, तालुका संघटक आढळकर, रेखा कौटबे, जयश्री थोरमोटे यांच्यासह अनेकांची




सुरेखा पुरी, अनुसया फड, शीला आचार्य यांच्यासह स्वयंसेविका जिल्हा समूह संघटक संगीता डावरे, श्रीमती बालिका बिराजदार, उपस्थिती होती. यावेळी तब्बल चारशे आशा स्वयंसेविकांनी चित्रपट पाहण्याचा आनंद घेतला.

## 'केशवराज'मध्ये दर्पण दिनानिमित्त पत्रकारांचा सन्मान

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ६ जानेवारी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि. ०६ जानेवारी २०२६ मंगळवार रोजी आद्यपत्रकार बाळशास्त्री जांभेकर जयंती तथा दर्पण दिनानिमित्त पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. सकाळच्या सत्रात या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक मराठवाडा नेता या वृत्तपत्राचे मुख्य संपादक रामेश्र्वर बद्दर व दैनिक लातूर समाचारचे कार्यकारी संपादक शिवाजीराव जडे तर दुपार सत्रात कार्यक्रमाचे अध्यक्ष केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा विद्यालयाचे उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, प्रमुख पाहुणे छएथड १८ लोकमत इलेक्ट्रॉनिक्स मीडियाचे पत्रकार शशिकांत पाटील, खबर से हकीकत साप्ताहिकाचे संपादक शिरीषकुमार शेरखाने तसेच पत्रकार बसवेश्र्वर पसारे, सुधीर चेरेकर यांची मंचावर उपस्थिती होती.

या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता आणि मराठी वृत्तपत्राचे




जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. यानंतर दैनिक मराठवाडा नेताचे मुख्य संपादक रामेश्र्वर बद्दर, छएथड १८ लोकमत इलेक्ट्रॉनिक्स मीडियाचे पत्रकार शशिकांत पाटील, खबर से हकीकत तक साप्ताहिकाचे संपादक शिरीषकुमार शेरखाने, लातूर समाचारचे कार्यकारी संपादक शिवाजीराव जडे, पत्रकार बसवेश्र्वर पसारे, सुधीर चेरेकर यांचा विद्यालयाच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी सकाळ सत्रातील प्रमुख पाहुणे दैनिक मराठवाडा नेता वृत्तपत्राचे मुख्य संपादक रामेश्र्वर बद्दर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम करावे, ग्रंथांचे वाचन करावे, सामान्य ज्ञान वाढवावे व स्वतःचे ध्येय निश्चित करून त्याप्रमाणे वर्तन करावे असे सांगितले. दुसरे प्रमुख पाहुणे लातूर समाचारचे कार्यकारी संपादक शिवाजीराव जडे यांनी बाळशास्त्री जांभेकर यांचा जीवनपरिचय सांगून, दर्पण वृत्तपत्राविषयी माहिती सांगितली. तर दुपार सत्रातील प्रमुख पाहुणे शशिकांत पाटील यांनी विद्यार्थ्यांना सत्य घटनेवर आधारित उदाहरणे सांगून पत्रकारितेचे महत्त्व सांगितले तसेच दुसरे प्रमुख पाहुणे शिरीषकुमार शेरखाने यांनी पत्रकारिता व्यवसायात काम करत असताना येणारे अनुभव सांगून दर्पण दिनाचे महत्त्व सांगितले.

अध्यक्षीय समारोपात विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी समाजात जागृती निर्माण करण्याचे काम बाळशास्त्री जांभेकर यांनी केले असे सांगितले. समाजाचे प्रतिबिंब दाखवण्याचे कार्य पत्रकार करतात. सकाळ सत्रातील या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व स्वागत वनमाला कलुरे यांनी केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन विपुला उरगुंडे यांनी केले तर शैला कुलकर्णी यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. दुपार सत्रातील कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व स्वागत मनिषा पाटील यांनी केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन दिपाली मुचाटे यांनी केले तर कल्पना कडेपूरकर यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

प्रसिद्धी विभागांतर्गत संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, सहप्रमुख मीरा चामवाड, प्रसिद्धी विभाग प्रमुख वनमाला कलुरे, सहप्रमुख मनिषा पाटील तसेच व्यवस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## महसूलच्या २० सेवा ऑनलाईन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ६ जानेवारी :** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या शासकीय सेवा नागरिकांना ठराविक कालमर्यादेत आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग कार्यरत आहे.

नागरिक आता 'आरटीएस महाराष्ट्र' मोबाईल प किंवा 'आपले सरकार' वेब पोर्टलच्या माध्यमातून उपलब्ध सेवांची माहिती पाहू शकतात आणि ऑनलाइन अर्जही करू शकतात. सेवा देण्यात विलंब झाल्यास किंवा नाकारल्यास प्रथम व द्वितीय अपील संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्याकडे तर तृतीय अपील आयोगाकडे करता येते. महसूल विभागांतर्गत उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, सॉल्व्हन्सी प्रमाणपत्र आदी एकूण २० अधिसूचित सेवा या कायद्यांतर्गत उपलब्ध आहेत. या सेवा १ ते २१ दिवसांच्या कालमर्यादेत पूर्ण केल्या जातात. नागरिकांनी 'आपले सरकार' पोर्टलवर लॉग-इन करून सेवा निवडणे, आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आणि अर्ज सादर करणे अपेक्षित आहे.


अर्ज सादर झाल्यानंतर मिळणाऱ्या एसीके क्रमांकाच्या आधारे अर्जाची स्थिती ऑनलाइन ट्रॅक करता येते. छाननी व पडताळणीनंतर मंजूर प्रमाणपत्र थेट ऑनलाइन उपलब्ध करून दिले जाते. ऑनलाइन अर्ज करणे शक्य नसलेल्या नागरिकांसाठी 'आपले सरकार सेवा केंद्रां'मार्फतही ही सुविधा उपलब्ध आहे. या केंद्रांद्वारेही सर्व सेवा ऑनलाइन पद्धतीनेच दिल्या जातात.

## आयएमए स्वस्थ नारी अभियान चेअरमनपदी डॉ.सुरेखा काळे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ६ जानेवारी :** लातूरच्या आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनियकार्याबद्दल येथील डॉ. सुरेखा दिनकर काळे यांची इंडियन मेडिकल असोसिएशनच्या स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान चेअरमनपदी निवड करण्यात आली आहे.

डॉ. सुरेखा काळे यांनी यापूर्वी लातूर आयएमएच्या अध्यक्ष म्हणूनही नेत्रदीपक कार्य केले



आहे. तसेच त्या लातूर वूमेन विंगच्या अध्यक्षा, मिशन पिंक मराठवाडा को-ऑर्डिनेटर, वुमन विंग प्रदेश उपाध्यक्षा म्हणूनही त्यांनी उत्कृष्ट कार्य केले आहे. स्त्रियांचे आरोग्य, समुपदेशन, कॅन्सर जनजागृती, रक्तक्षय या विषयांवर कार्य करून त्यांनी महिलांमध्ये जनजागृती आणि प्रबोधन केले आहे. सदर निवड आयएमएचे प्रदेशाध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी यांनी केली आहे. या निवडीबद्दल आरोग्य क्षेत्रातूनअभिनंदन करण्यात येत आहे.

## लातूर जिल्ह्यात तीन स्थानिक सुट्ट्या जाहीर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ६ जानेवारी :** जिल्ह्यासाठी २०२६ मधील तीन स्थानिक सुट्ट्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी ०५ जानेवारी, २०२६ रोजीच्या अधिसूचनेनुसार जाहीर केल्या आहेत. यानुसार २८ ऑगस्ट २०२६ (शुक्रवार) रोजी रक्षाबंधन, १८ सप्टेंबर २०२६ (शुक्रवार) रोजी ज्येष्ठागौरी पूजन, ६ नोव्हेंबर २०२६ (शुक्रवार) रोजी धनत्रयोदशी निमित्त लातूर जिल्ह्यात स्थानिक सुट्टी राहणार आहे.

## इज्तेमाचा समारोप

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ६ जानेवारी :** लातूर बारही रोडवरील मुरुड अकोला येथे आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय इज्तेमाचा समारोप उत्साहपूर्ण वातावरणात झाला.सामाजिक समता, शांतता, सलोखा वाढीस लागावायाकरिता सदर सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात सायंकाळच्या सुमारास सामूहिक नमाज पठन करण्यात आले. त्यावेळी हजारोंच्या संख्येने मुस्लिम समाज बांधव उपस्थित होते. मोहम्मद पैगंबर यांनी दिलेल्या शिकवणीचे अनुकरण करा, दिवसातून पाचवेळा नमाज पठण करा, आपल्या वर्तनातून कुटुंबाबरोबरचआपला शेजारीही दुखावला जाणार नाही याची काळजी घ्या. सत्य मार्गाने चला,असा संदेश यावेळी देण्यात आला. या इज्तेमामध्येलातूर तालुक्यातील मुरुड, जोडजवळा, लातूर परिसरातीलमुस्लिमसमाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी समाज बांधव सहभागी झाले होते.

## जाहीर प्रगटन

चाकूर तालुक्यातील विशेषतः मौजे नळेगाव परिसरातील तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार माधवराव नागनाथ तोंडारे वय : ५० वर्ष, धंदा : व्यापार रा. नळेगाव, ता. चाकूर, जि. लातूर यांनी दिलेल्या माहितीवरुन व दाखविलेल्या कागदपत्रावरुन व अधिकृत केल्यावरून सदरचे जाहीर प्रगटन देण्यात येते की,

माझे पक्षकार यांनी अनिल गोपाळदास पल्लोड, वय : ५० वर्ष, धंदा : व्यापार/शेती रा. अभिजीत अपार्टमेंट, मोती नगर, लातूर यांच्या मालकी व ताब्यातील मौजे नळेगाव, ता. चाकूर जि. लातूर येथील गट नं. ६७०/२/१ मधील एकूण क्षेत्र ३ हे. २४ आर असून त्यापैकी १ हे. ०० आर जमीन ज्याची चतुःसीमा खालीलप्रमाणे पूर्वेस-अमोल बुदरे, अजित बुदरे व ॲड. तोंडारे यांची जमीन, पश्चिमेस -स्मशानभूमी, दक्षिणेस-शेषराव पाटील यांची जमीन, उत्तरेस-पाणंद रस्ता येणेप्रमाणे वरील चतुःसिमेच्या आतील ०१ हे. ०० आर जमीन माझे पक्षकार यांना विद्यमान जमीन मालकांसोबत कायम विक्री करण्याचा लेखी ठराव करून सदर ठरावापोटी विद्यमान जमीन मालकांनी माझे पक्षकाराकडून इसार रक्कम म्हणून काही रक्कम स्विकारलेली आहे व उर्वरित रक्कम देवून लवकरच जमिनीचे खरेदीखत करून घेणार आहेत. सदरील जमीन ही निर्विवाद व बोजारहित असलेची खात्री माझे पक्षकारांना दिलेली आहे.

तरी सदरील वर्णनीय जमिनीबाबत कोणाचा उजर , हरकत, गहाणखत , तारण, ठरावपत्र, लिज , बक्षीसपत्र , दानपत्र, पोटगी हक्क, कोर्ट डिक्रि , आधारे बोजा वा इतर कसल्याही प्रकारचा हक्कसंबंध व अधिकार असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासून ७ ( सात ) दिवसाचे आत माझे खालील नमूद कार्यालयीन पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रासह लेखी उजर दाखल करून पोच घ्यावी. जर वरील मुदतीत कोणाचा उजर नाही आला तर सदरील जमीन ही निर्विवाद व निर्जोखमी आहे असे माझे पक्षकार समजतील व त्यानंतर जमीन मालकासोबतचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर आलेला उजर माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी. सबब हे जाहीर प्रगटन

जाहीर प्रगटन देणार : **माधवराव नागनाथ तोंडारे, रा. नळेगाव, ता. चाकूर, जि . लातूर**
**तर्फे ॲड. आर. एन. तोंडारे,**
**रेड्डी बिल्डिंग, बुलढाणा बँकेजवळ, मेन रोड, नळेगाव , ता. चाकूर, जि लातूर**
**मोबा. नं . ९४२१३ ६८२२९.**